TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192792
UNIVERSAL LIBRARY

Osmania University Library

Call No M 8 3
K45G

Accession No. M 54 2

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below.

# घरट्याबाहेर

( दुसरी आवृत्ति )

लेखक

वि. स. खांडेकर

→←

१९४४

—

किंमत ३ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक :
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१, शनवार, पुणें २.

संचालक :
भ. त्र्यं. देशमुख,
बी. ए., एल्एल्. बी.

प्रथमावृत्ति १९४१
द्वितीयावृत्ति १९४४

१ सर्व हक्क सौ. उषा खांडेकर यांच्याकडे आहेत.

२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. डी. डी. दलाल यांनीं काढलें आहे.

एकमेव विक्रेते :
पंडित अनंत कुलकर्णी,
मु. पो. लोहारा
जि. उस्मानाबाद.

मुद्रक :
बाळकृष्ण नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,
कोल्हापूर.

माझे आवडते नाटककार

कै. गो. ब. देवल

व

कृ. प्र. खाडिलकर

यांस

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड ( आ. दुसरी ) | ३ |
| घरट्याबाहेर ( ,, ) | ३ |
| पहिली लाट ( ,, ) | ३ |
| स्त्री आणि पुरुष | २ |
| कालचीं स्वप्नें | ३ |
| आजचीं स्वप्नें | ३ |
| कलिका | २। |
| मृगजळांतील कळ्या | २॥ |
| सायंकाल ( आ. २ री ) | २॥ |
| अविनाश | १॥। |
| मंदाकिनी | १॥। |
| सहा भाषणें | २ |
| फुलें आणि कांटे | २। |
| हिरवा चांफा ( आ. तिसरी ) | ५ |
| दोन ध्रुव ( ,, ) | ५ |
| पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) | ३ |
| क्रौंचवध ( ,, ) | ५ |
| पांढरे ढग ( ,, ) | ४। |
| जळलेला मोहोर | ३ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | २ |
| नागकन्या | २ |
| माझी नभोवाणी | २ |
| नवे संसार ( जप्त ) | ४ |
| चंदनवाडी | ६॥ |
| व्यक्तिरेखा | २। |

## ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| दाल्या भाग १ ला ( आ. दुसरी ) | ४ |
| दाल्या भाग २ रा | ३ |
| निवाडे भाग १ ला | २॥ |
| निवाडे भाग २ रा | ४ |
| चकमकी | १॥ |
| बऱ्याचा नवरा | १॥ |
| अनेक आशीर्वाद | ३॥ |
| दाजी भाग १ ला | ३॥ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| आणखी चिमणराव (आ. २ री ) | ४ |
| नवें भारूड | २ |
| स्टेशनमास्तर | २ |
| नटश्रेष्ठ | -॥।- |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| आस्तिक ( ,, ) | ३ |
| सोन्यामारुति ! ( ,, ) | २ |
| गोड निबंध भाग १ ला | ३ |
| गोड निबंध भाग २ रा | ३ |

## दत्तु बांदेकर

| | |
|---|---|
| सख्याहरी ( आ. दुसरी ) | १॥ |
| नवी आघाडी | १॥ |
| तूं आणि मी | २। |
| नजरबंदी | २। |

**प्र. के. अत्रे**

साखरपुडा १॥

ललितवाङ्मय ३॥

**द. र. कवठेकर**

अपुरा डाव ३

रेशमाच्या गांठी ३

**वा. म. जोशी**

स्मृति-लहरी २

विचार-लहरी २।

विचार-विहार ४

**पु. य देशपांडे**

नवें जग ! २॥

**भाई बेके**

रॉयचरित्र १॥

**वि. स. खांडेकर** (परिचयलेखक)

काव्यज्योति १

**आनंदीबाई जयवंत**

पारंब्या २

**लक्ष्मणराव सरदेसाई**

ढासळलेले बुरुज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी.**

व्यक्तिचित्रें २॥

**ना. ह. आपटे**

फसगत १॥

साजणी ५

**शकुंतला परांजपे**

भिल्लिणीचीं बोरें ३

**कृष्णाबाई मोटे**

मीनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

चलतीं नाणीं २

**रा. श्री. जोग**

सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

**ना. म. पटवर्धन**

हितपत्रें ३

वा. म. जोशी यांचें चरित्र ४।

**वि. वि. बोकील**

बेबीची बहीण ३

**सत्यग्राही**

ग्रह आणि तारे ४॥

**अनंत काणेकर**

पिकलीं पानें (आ. दुसरी) १॥

धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ,, ३

**काकासाहेब कालेलकर**

ब्रह्मदेशाचा प्रवास १॥

**य. दि. पेण्ढरकर**

प्रापंचिक पत्रें ३

घायाळ २

**वि. म. भुस्कुटे**

स्टॅलिन ३॥

**कमलाबाई टिळक**

आकाशगंगा २॥

**रामतनय**

साखरगोटी ५

**ह. रा. महाजनी**

आपलें आर्थिक नियोजन ५

# देशमुख आणि कंपनीचीं

## आगामी प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ अश्रु २ तिसरी भूक
३ बुद्ध आणि हिटलर
४ वर्षाकाल ५ चार भिंती
६ छाया
७ चक्रवर्ती ८ बडी मां
९ उद्यांचीं स्वप्नें
१० विसावें शतक ११ कल्पलता
१२ वालुका १३ मंजिऱ्या
१४ मराठीचा नाट्यसंसार
१५ चल रे राणी १६ सुवर्णकण
१७ माझ्या कादंबऱ्या

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस २ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ती उदयन ५ उर्वशी
६ उमरखय्याम ७ विलापिका
८ दोन तपें ९ हें युद्ध

### द. र कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड ३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

### ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई २ शेजारी

### प्र. के. अत्रे

१ दूर्वा आणि फुलें
२ 'मी' कसा झालों

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली ४ गुणाची पोर

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरण-यात्रा

### अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार-कथा
३ लंकावैभव
४ वायफळाचा मळा

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुलीजबाब

### साने गुरुजी

१ गोड निबंध भाग तिसरा

### १ क्षमाबाई राव

### १ आचार्य भागवत

# खांडेकर-वाङ्मय

## कथा-संग्रह

१ पाकळ्या ( तिसरी आवृत्ति )
२ नवचन्द्रिका (दुसरी ,, )
३ सभाधीवरलीं फुलें ( ,, )
४ पूजन ( ,, )
५ पहिली लाट ( ,, )
६ नवा प्रातःकाल ( ,, )
७ घरट्याबाहेर ( ,, )
८ फुलें आणि दगड ( ,, )
९ नवमल्लिका
१० दत्तक व इतर गोष्टी
११ जीवन-कला
१२ ऊनपाऊस १३ दंव-बिन्दु
१४ विद्युत्प्रकाश १५ अबोली
१६ सूर्यकमळें
१७ कल्चर्ड मोतीं
१८ स्त्री आणि पुरुष
१९ पहिल्या वहिल्या
२० कलिका
२१ मृगजळांतील कळया
२२ कालचीं स्वप्नें
२३ आजचीं स्वप्नें

## लघु-निबंध

१ वायुलहरी ( दुसरी आवृत्ति )
२ सायंकाल ( ,, )
३ चांदण्यांत
४ अविनाश ५ मंदाकिनी

## कादंबऱ्या

१ दोन ध्रुव ( तिसरी आवृत्ति )
२ हिरवा चांफा ( तिसरी आ. )
३ उल्का ( दुसरी ,, )
४ दोन मनें ( ,, )
५ पांढरे ढग ( ,, )
६ पहिलें प्रेम ( ,, )
७ कांचनमृग ( ,, )
८ हृदयाची हांक ( ,, )
९ क्रौंचवध ( ,, )
१० रिकामा देव्हारा ( ,, )
११ सुखाचा शोध ( ,, )
१२ जळलेला मोहोर

## विविध

१ रंकांचें राज्य ( नाटक )
२ वनभोजन ( टीका )
३ धुंधुर्मास ( ,, )
४ गडकरी (व्यक्ति आणि वाङ्मय)
५ आगरकर चरित्र
६ सहा भाषणें (अध्यक्षीय भाषणें)
७ फुलें आणि कांटे (लेखसंग्रह)
८ गोकर्णीचीं फुलें ( ,, )

## बोलपट

छाया धर्मपत्नी ( तेलगू )
ज्वाला अमृत
देवता संगम

सुखाचा शोध तुझाच
माझं बाळ बडी मां

लग्न पहावें करून | मूळ कथानक
सरकारी पाहुणे | प्रो. चिं. वि. जोशी

# एक संदेश—

'देणें आणि दुखणें कुणालाहि नको असतें' ही म्हण फार जुनी आहे. या म्हणीला अपवाद असणाऱ्या असामान्य लोकांत मी माझी गणना कधींच करीत नाहीं; पण देण्यादेण्यांत आणि दुखण्यादुखण्यांतसुद्धां फरक असतोच कीं! मलेरियाचा १०५ डिग्री ताप सोसायला मी तयार होईन; पण रात्रभर डोळा न लागूं देणारा—किंबहुना माणसाला कोणत्याहि स्थितींत क्षणभरहि स्वस्थ बसूं न देणारा—दमा माझ्या दारांत येऊन उभा राहिला, तर मी त्याला हात जोडून म्हणेन, 'बाबा, तूं रे कशाला आलास? तुझ्याऐवजीं एखादा यमदूत आला असता, तरीसुद्धां मीं त्याचं आनंदानं स्वागत केलं असतं!'

जी गोष्ट दुखण्यांची तीच देण्याची. कांहीं कांहीं गोष्टी देणें फार सोपें असतें. उदाहरणार्थ— शिव्या आणि उपदेश. या दोन गोष्टींपेक्षां व्याख्यान देणें थोडें कठिण असलें तरी, हल्लीं पुष्कळांना तें थोडेंफार साधतें; मात्र याच्या-पुढलें दान देण्याचा प्रसंग आला कीं बहुतेकांची बोबडी वळते आणि 'गांडीवं स्रंसते हस्तात् त्वक्चैव परिदह्यते' अशी अर्जुनासारखी स्थिति होऊन ते माघार घेऊं लागतात. तें दान म्हणजे पैसे देणें.

पण द्रव्यदान हीच व्यवहारांतल्या दानाची अंतिम सीमा आहे ही कल्पना अलीअलीकडे मला पटेनाशी झाली आहे. पैसे देण्यापेक्षांहि अधिक अवघड

अशी एक गोष्ट जगांत आहे ! ती म्हणजे संदेश देणें. शाळा-कॉलेजांत किंवा मोठमोठ्या समारंभांस प्रमुख पाहुणा स्वाक्षरी आणि संदेश यांच्या मागण्यांनीं सध्यां अगदीं बेजार होऊन जात असतो. शेंकडों मुलांमुलींना स्वाक्षरी देऊन फार तर हात दुखूं लागेल आणि फाउंटन-पेनमधली शाई खलास होईल; पण या सर्व लोकांना संदेश देणें म्हणजे—

अशा वेळीं भक्तांनीं चौफेर वेढलेले कांहीं साधु वेड्यासारखें वर्तन कां करतात याची पूर्ण कल्पना येते !

संदेश देणें खरोखरीच इतकें सोपें काम आहे का ? संदेश हें अलौकिक जीवन-वृक्षाचें अमृत-मधुर शेंडेफळ असलें पाहिजे. असल्या फळाची अपेक्षा बाभळीपासून अगर पोफळीपासून करणाऱ्या माणसांना काय म्हणावे हें—

त्यांना कांहीं म्हणण्यापेक्षां आपणच संदेश न देण्याचा सत्याग्रह करणें अधिक इष्ट.

हा सत्याग्रह बहुधा यशस्वी होतो; पण काल माझ्या घरीं स्वाक्षरीकरितां आलेल्या एका मुलीनें संदेशाचा इतका विलक्षण हट्ट धरला -‘ संदेश घेतल्या-शिवाय मी जाणार नाहीं ’ अशी सत्याग्रहाची भाषा बोलूं लागली ती. आपल्या अग्न्यस्त्रावर विरुद्ध पक्षानें पर्जन्यास्त्र सोडावें तशी माझी स्थिति झाली. मीं मुकाट्यानें माझी प्रतिज्ञा मोडली आणि तिच्या स्वाक्षरीच्या पुस्तिकेंत लिहिलें—घरट्याबाहेर पडा.

तिनें या शब्दांवरून नजर फिरविली मात्र ! लगेच ती माझ्याकडे आश्चर्यानें पाहूं लागली. तिची दृष्टि म्हणत होती, “ असला कसला हा संदेश बाई ! ”

ती निघून गेल्यावर मलाहि वाटलें— तिला दुसरा एखादा संदेश दिला असता तर बरें झालें असतें. एखादें सुभाषित किंवा एखाद्या सुंदर कवि-तेच्या दोन ओळी—

पण असल्या गोड गोष्टी सुचण्यासारखी त्या वेळीं माझी मनःस्थितीच नव्हती त्याला मी काय करणार ? ‘घरट्याबाहेर’ या कथा-संग्रहाच्या सर्व गोष्टी मुद्रणाकरितां पाठविण्यासाठीं मीं नुकत्याच वाचून संपविल्या होत्या. एखाद्या गाण्याचे सूर कानांत घुमत असावेत त्याप्रमाणें माझ्या मनांत एकसारखा एकच प्रतिध्वनि उमटत होता—‘घरट्याबाहेर, घरट्याबाहेर’! या संग्रहांतील

प्रत्येक गोष्ट लिहितांना माझ्या मनांत ज्या विचारांच्या नि भावनांच्या लाटा उसळल्या होत्या, त्यांचा कल्लोळ मी पुन्हा पाहत आहे असें मला वाटलें. निरनिराळया वेळीं निरनिराळ्या दृश्यांनीं व अनुभवांनीं या कथांचीं बीजें माझ्या मनांत सहजासहजीं टाकलीं असतील; पण काल या सर्व कथा एका बैठकींत वाचून मला वाटलें—या विविध कथांना एकत्र गुंफणारें एक अदृश्य सूत्र आहे. तें सूत्र हेंच आजच्या आपल्या समाजाचें ब्रीदवाक्य व्हायला हवें. तो एकच शब्द गुलामगिरीच्या गर्तेंत पडलेल्या या चाळीस कोटींच्या राष्ट्राला स्वातंत्र्याच्या शिखरावर नेऊन बसविण्याला समर्थ होईल! तो शब्द ' घरट्याबाहेर ' हा होय.

घरटें म्हटलें कीं, उंच झाड नि त्याच्यावरलें पांखरांचें चिमणें घरकुल उभें राहतें. त्या घरट्यांत एकमेकांच्या कुशींत झोपणाऱ्या पिलांचें चित्रहि मनाला रमणीय वाटतें. पण—

पण हेंच घरटें संकुचितपणाचें, वैयक्तिक सुखासीनतेचें, आणि सामाजिक दृष्टीच्या अभावाचें प्रतीक आहे. नाहीं का? आपल्या हिंदी समाजाच्या मध्यमवर्गाच्या मनाचें चित्र काढायला मला कुणी सांगितलें, तर मी एक सुंदर घरटें काढीन. त्या घरट्यांत मऊ मऊ कापूस आणि सुंदर सुंदर गवताच्या काड्याहि मी दाखवीन. पण या घरट्यांत जीं पाखरें असतील तीं मात्र भीतभीतच दूरच्या क्षितिजाकडे पाहतील आणि दूरवर दिसणाऱ्या अमृत फळापेक्षां जवळ दिसणाऱ्या साध्या फळांकडेच तीं उडत जातील. उडतांनासुद्धां तीं आकाशांत भराऱ्या मारणार नाहींत! तर पंख कापलेल्या पांखरांप्रमाणें तीं कशीं बशीं त्या फळांकडे जातील.

ही कल्पना थोडीशी विचित्र असली तरी—

सत्य कल्पनेहूनहि विचित्र असतें!

आपल्या मध्यमवर्गाचें पहिलें ब्रीदवाक्य काय आहे? सुखी संसार! नवरा राजा, बायको राणी आणि या राज्यांत संततिनियमनाच्या साधनांची ओळख झाली असल्यास दोन-तीन नाहीं तर सात-आठ राजपुत्र व राजकन्या! यापलीकडच्या धडपडणाऱ्या आणि तडफडणाऱ्या जगाविषयीं सुखानें संसार करणाऱ्या या लोकांपैकीं कितीकांना जिव्हाळा असतो? आपल्या

इतकींच सुशील आणि सद्गुणी माणसें आर्थिक विषमतेच्या खाईत होरपळत आहेत नि पशुहूनहि वाईट असें जिणें कंठीत आहेत हें आपल्या उबदार घरट्यांत चोंचींत चोंच घालून प्रेम समाधीत गुंग होणाऱ्या सुखवस्तु लोकांना कसें कळणार? 'घरट्याबाहेर' व 'दरी आणि डोंगर' या दोन गोष्टी याच अनुभवांवर आधारलेल्या आहेत. 'पहिला दोहरा' या गोष्टींत मध्यमवर्गाच्या कुटुंबांत प्रीतीला आसक्तीचें स्वरूप कसें आलेलें असतें आणि खालच्या वर्गांत परिस्थितीच्या प्रभावामुळें तीच प्रीति भक्तीचें स्वरूप कसें धारण करतें याचें चित्र आढळेल.

आपलें घर हेंच जग मानण्यांत जो प्रतिगामी दृष्टिकोन व्यक्त होतो, तोच देव आणि धर्म यांच्यावर अंधश्रद्धा ठेवण्यानेंहि होतो. गांधारीच्या पोटीं आलेल्या दुर्योधन-दुःशासनाप्रमाणें या अंधश्रद्धेच्या पोटीं अनेक अरिष्टें जन्माला येतात. दैववाद, जातिभेद, अस्पृश्यता हीं समाजाचा बुद्धिभंग करणारीं आणि राष्ट्राचें रक्त शोषणारीं सारीं अपत्यें देवावरल्या अंधश्रद्धेचीच आहेत. 'घरट्याबाहेर' च्या जगाकडे पाहतांच भयभीत होऊन दुबळ्या पांखरांनीं ज्याप्रमाणें घरट्यांचा आश्रय करावा, त्याचप्रमाणें आजच्या जगांतली भौतिक प्रगति आणि यांत्रिक चमत्कार पाहून भांबावलेल्या हिंदी समाजाच्या बुद्धीला आस्तिकतेच्या घरट्यांतली ऊबच अधिक बरी वाटते. पण आजच्या जगाच्या शर्यतींत आपल्या राष्ट्राला मागें पडायचें नसेल, तर क्षणाचाहि विलंब न लावतां त्यानें या घरट्याबाहेर पडलें पाहिजे. 'प्रार्थना', 'देवदूत' व 'पांगळ्यांचें दुःख' या गोष्टींत आजच्या सामाजिक जीवनाची ही बाजू चित्रित केलेली दिसून येईल.

स्त्रीपुरुषांच्या प्रेमाविषयीं आणि त्यांच्या सामाजिक व्यवहाराविषयीं परंपरागत संकुचित कल्पना हेंहि आजच्या मध्यमवर्गाचें एक आवडतें घरटें आहे. एक पुरुष आणि एक स्त्री हसत-खेळत असलेली दिसली, कीं ती पतिपत्नी नसून व्यभिचार करणारीं उडाणटप्पू माणसेंच असलीं पाहिजेत, प्रेमाच्या मार्गांत भोग हीच मोहाच्या पुढली पायरी आहे, शरीरविक्रय करणाऱ्या वेश्येला अंतःकरण असणें हें फणसाला फूल येण्याइतकेंच अशक्य आहे, इत्यादि कल्पना कवटाळून बसलेले लोक मध्यमवर्गांतच अधिक

आदळतात. जुन्या सनातन टीकाकारांच्या चष्म्यांतूनच ते जीवनाच्या या महत्त्वाच्या अंगाकडे पाहत असतात. पण या बाबतींत त्यांची दृष्टि किती संकुचित व सदोष असते हें ' दुसरी बायको, ' ' सरस्वती ' आणि ' अनामिका ' या गोष्टींत सूचित केलें आहे.

एखाद्या पांखरानें धीर करून आपल्या घरट्याबाहेर पडावें पण बाहेरच्या सोसाट्याच्या वाऱ्याला भिऊन पहिल्या घरट्यापेक्षांहि अधिक संकुचित अशा दुसऱ्या घरट्याचा आश्रय करावा, त्याप्रमाणें संक्रमणकाळांत मध्यमवर्गांतल्या उथळ मनाच्या माणसांची स्थिति होते. जुन्या रूढिग्रस्त वैयक्तिक जीवनाचा त्यांनीं त्याग केला तरी, नव्या बुद्धिवादी त्यागपूर्ण सामाजिक आयुष्यक्रमाचा स्वीकार तीं करूं शकत नाहींत. त्यांचा दुबळेपणाच त्यांना नडतो. प्रवाहाविरुद्ध पोहायला जी विशिष्ट शक्ति अंगीं असावी लागते ती नसल्यामुळें हीं माणसें प्रवाहपतित होतात. सामाजिक जीवनाचा मुख्य आधार भावनाशीलता हा आहे. पण वैयक्तिक सुखाच्या मागें लागल्यामुळें त्यांचा हा आधारच सुटतो आणि जास्तींत जास्त चैन करणाऱ्या श्रीमंत बाहुल्या, एवढेंच त्यांचें जगाच्या दृष्टीनें अस्तित्व उरतें. ' पतित ' या गोष्टींत हें चित्र मीं रेखाटलें असून, असल्या दुबळेपणांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणतरुणींचें चित्रण ' स्वप्न आणि जीवन ' व ' नवें जग ' या गोष्टींत केलें आहे. ज्या नव्या जगाकडे आपण चाललों आहों, त्यांत खोल भावनांना उच्च मानाचें स्थान निश्चित आहे, पण स्वप्नाळूपणाला मात्र तिळभर सुद्धां जागा नाहीं.

मध्यमवर्गाच्या मानसिक विकासाच्या आड येणारीं हीं जीं विविध घरटीं आहेत, त्यांच्यातून बाहेर पडलेल्यांची एक कथा या संग्रहांत आहे. ' भग्नमूर्ति ' या कथेच्या नायकानें कौटुंबिक सुखाच्या घरट्यांतून सामाजिक सुखाच्या क्षितिजापर्यंत उड्डाण केलें आहे हें कुणालाहि नाकारतां येणार नाहीं. समाजसेवेच्या मार्गापेक्षां तो मार्ग चोखाळायला लागणारें धैर्य व त्याग ह्याच महत्त्वाच्या गोष्टीं असून त्या अजून आपल्या समाजांत दुर्मिळ आहेत. मिशनरी लोकांचीं इस्पितळें व शहरांतले हिंदी डॉक्टरांचे शेंकडों खाजगी दवाखाने यांची तुलना केली म्हणजे अजून आपलें सामाजिक मन किती निद्रित आहे याची पूर्ण कल्पना येते.

‘ भग्नमूर्ति ’ या कथेंतला नायक ‘ काशीनाथ ’ हा आजच्या विचारशील तरुणांचा प्रतिनिधि आहे. त्याचें सामाजिक मन जागृत झालें आहे. प्रीति ही आयुष्यांतली अत्यत आनंदाची गोष्ट असली, तरी तिच्यासाठीं मनुष्यानें आपल्यांतील माणुसकी कमी करून घ्यावी, इतकी कांहीं तिची किंमत नाहीं हें तो ओळखतो. कर्तृत्व—सामाजिक कर्तृत्व-हेंच आजच्या आणि उद्यांच्या तरुण पिढीचें ध्येय आहे. ज्या ज्या गोष्टी या कर्तृत्वाच्या आड येतील-त्या त्या लाथाडून पुढें गेल्याशिवाय त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होणार नाहीं.

पंख न फुटलेल्या चिमुकल्या पांखरांचें घरटें रक्षण करतें. पण पंख फुटलेल्या पांखरांना तेंच घरटें पिंजऱ्यासारखें होतें. कुटुंब, घर, देव, धर्म, प्रेम, शिक्षण, शेती, उद्योग-धंदे इत्यादिक विषयींच्या हिंदी समाजाच्या आजच्या कल्पनांचीहि हुबेहुब हीच स्थिति आहे. मानवजातीच्या बाल्यांत या सर्व कल्पना सुंदर होत्या; इतकेंच नव्हे तर समाजाचें संरक्षण करण्याचें आणि सामर्थ्य वाढविण्याचेंच काम त्यांनीं केलें आहे. पण विसाव्या शतकाच्या मध्यभागीं येऊन पोंचलेल्या आणि यंत्रयुग व युद्धयुग यांच्या चक्रव्यूहांत सापडलेल्या आजच्या समाजाला या जुन्या कल्पनांचा काडीमात्र तरी उपयोग आहे का ? आमच्या जुनाट कुटुंबपद्धतीमुळें तरुणांची महत्त्वाकांक्षा सहसा प्रज्वलित होत नाहीं. वडिलोपार्जित मिळकतीचा पांगुळगाडा घेऊनच संसारमार्ग आक्रमण करण्याचेंच बहुतेकांचें धोरण असतें. त्यामुळें सदोष शिक्षणपद्धति व वाढती बेकारी यांच्या कात्रींत सांपडलेली तरुण मंडळी ऐतखाऊपणा, भटकेपणा आणि रिकामी बडबड यांच्यापलीकडे कांहींच साध्य करूं शकत नाहींत. असल्या अनेक लोकांचा भार अंगावर घेणाऱ्या पुरुषाचें कर्तृत्व कुटुंबाचें अन्नछत्र चालविण्याच्या कामांतच खर्ची पडतें ! सुशिक्षित स्त्रियांनाहि लग्नानंतर याच कौटुंबिक घाण्याला जुंपून घ्यावें लागतें. जेवणाच्या वेळा, जेवणाचे पदार्थ, जेवण तयार करण्याची पद्धति या आमच्या साऱ्या गोष्टी अद्यापिहि सनातन मार्गानेंच—जणूं कांहीं पेशवाई चालू आहे अशा कल्पनेनें चालल्या आहेत. त्यामुळें एखाद्या सावकारानें व्याज म्हणून सारें धान्य नेल्यामुळें शेत पिकवूनहि शेतकरी जसा उपाशी राहतो, तशी मध्यमवर्गातल्या बुद्धिवान् व कर्तृत्ववान् तरुण-तरुणींची सध्या, स्थिति झाली आहे.

त्यांची बुद्धि घराच्या पिंजऱ्यांत अडकून पडली आहे. त्यांचें कर्तृत्व कुटुंबाच्या तुरुंगापलिकडे सहसा जाऊंच शकत नाहीं !

कुटुंबाकडून देवाकडे वळलें तरी तोच अनुभव येतो. पंढरीच्या आषाढी-कार्तिकीच्या यात्रांना हजारों वारकरी दरवर्षी जातात— अगदीं कर्ज काढून जातात ! पण त्या कर्जाचें जबर व्याज भरण्याचा प्रसंग येतो तेव्हां दामाजी-पंतासाठीं विठू महार होऊन भल्या मोठ्या रकमेची भरपाई करणारा विठ्ठल एकाच्याहि मदतीला धावून येत नाहीं ! देवभक्ति हा एक दुबळ्या मनाचा दुःख विसरण्याचा मार्ग आहे ! पण कुठलींहि दुःखें विसरून दूर होत नाहींत—तीं झगडून—प्रसंगीं लढून दूर करावीं लागतात. आमच्या आजच्या वाङ्मयांत माजलेलें प्रणयाचें स्तोम आणि त्याचें कामुकतेला उत्तेजन देणारें चित्रण यांचेंहि मूळ या दुःख विसरण्याच्या कल्पनेंतच आहे. शिपायांनीं पोवाड्याऐवजीं लावण्या म्हणून लढाईपूर्वीची रात्र सुखांत काढल्याचा भास उत्पन्न करून घ्यावा, तशांतला हा प्रकार वाटतो.

दलित वर्गांना आपल्या परिस्थितीचें बरोबर आकलन करतां येत नसले तर त्याला अज्ञान, दारिद्र्य व परंपरागत संस्कार ह्या गोष्टी कारणीभूत आहेत असें म्हणतां येईल. पण मध्यमवर्ग सुद्धां अजून या परिस्थितीकडे पाठ फिरवून उभा आहे— राजकीय व सामाजिक सुधारणेच्या गोष्टी तो तोंडानें बोलत असला तरी वस्तुस्थितीकडे तो डोळेझाक करीत आहे—शिक्षण, कुटुंबव्यवस्था, संपत्तीची वाटणी, स्त्रीपुरुषांचे संबंध इत्यादि बाबतींतला जुना मार्ग खाच-खळग्यांनीं भरलेला असून, समाजाच्या गाड्याला त्यामुळें पदोपदीं भयंकर धक्के बसत आहेत हें जाणूनहि नव्या पाऊलवाटेकडे त्याचे पाय वळत नाहींत—याचें एकच मुख्य कारण आहे !—घरट्याबाहेर न पडण्याची वृत्ति—वैयक्तिक जीवनाची आसक्ति, सामाजिक जीवनाविषयींची उदासीनता.

आणि म्हणूनच कुणालाहि कसलाहि संदेश देण्याची आपली पात्रता नाहीं हें ठाऊक असतांनाहि काल त्या मुलीला मीं जें वाक्य लिहून दिलें तें अतिशय अर्थपूर्ण होतें असें मला वाटतें. 'घरट्याबाहेर पडा' हा नुसता एक संदेश नाहीं. आजच्या परिस्थितींत ज्याची अत्यंत आवश्यकता आहे, असा एकच संदेश आहे तो ! तानाजी पडल्यानंतर कोंडाण्यावरून मावळे

जेव्हां पळूं लागले तेव्हां सूर्याजीनें सारे दोर कापून टाकून त्यांना पळून जाणें अशक्य करून सोडलें. आज महाराष्ट्र–नुसता महाराष्ट्रच नाहीं, तर सारा भारत—त्याच स्थितींत आहे. जीवनाचे सर्व जुने आधार कापले गेले आहेत. आतां मागें वळायला किंवा पळायला जागा नाहीं. ‘कोंडाण्या’-वरच लढायचें आणि तो जिंकून त्याचा ‘सिंहगड’ करायचा एवढेंच काय तें आतां आम्हांला शक्य आहे. ही भविष्यकाळांतली शक्यता भूतकालांत विलीन झालेली—इतिहासाच्या पूजेचा विषय झालेली—पाहण्याचें भाग्य माझ्यासारख्याला लाभेल का ?

खासबाग, कोल्हापूर,<br>१–१–४१ } वि. स. खांडेकर

# घरट्याबाहेर

राजारामानें दचकून डोळे उघडले. आपल्याला दचकून जागें व्हायला काय कारण झालें हें मात्र त्याला कळेना ! त्याला वाटलें, आपल्याला एखादें भयंकर स्वप्न पडलें असावें. त्यानें खूपखूप आठवण करून पाहिली. पण वादळांत जहाजानें जलसमाधि घ्यावी त्याप्रमाणें तें स्वप्न मनाच्या नेणिवेंत कुठल्या कुठें नाहींसें झालें असावें असें त्याला वाटलें. तो स्वतः-शींच हसला. त्याचें मन म्हणत होतें, ' जहाज फुटलं तर त्याचा तुकडा तरी किनाऱ्याला लागतो; पण तें बुडालं म्हणजे मग —'

त्यानें उजवीकडे वळून पाहिलें. त्याच्या आणि कालिंदीच्या मध्यें झोप-लेली अरविंदाची स्वारी लोळत लोळत भिंतीपाशीं गेली होती.

त्यानें हलक्या हातांनीं अरविंदाला उचलून बिछान्यावर ठेवलें आणि त्याच्या अंगावर चादर आणि रग घातला.

लगेच त्याची दृष्टि कालिंदीकडे गेली. फार दिवसांनीं घराच्या खिडकीं-तून चंद्रकोर दिसावी, किंवा अंगणांत मोगरीची वेल अकस्मात् फुलावी, तशी निद्रित कालिंदीला पाहून त्याच्या मनाची स्थिति झाली !

वर्षांनुवर्षें त्याच्या अंगवळणीं पडलेला सकाळचा कार्यक्रम अगदींच निराळा होता—कालिंदीनें स्वयंपाकघरांत पेटविलेल्या स्टोव्हचा आवाज आला कीं राजारामानें या कुशीवरून त्या कुशीवर व्हायचें; आधण किटलींत ओतून

कालिंदी त्याला उठवायला आली, कीं यानें डोळे उघडायचे आणि मग दोघांचें कांहीं तरी मौजेचें बोलणें झाल्यावर राजारामानें चूळ भरण्याकरितां अंथरुणावरून उठायचें ! त्यांच्या त्या ओझरत्या बोलण्यावरूनसुद्धां नवरा-बायकोचें एकमेकांवर किती प्रेम आहे हें कुणालाहि सहज दिसून आलें असतें.

कालिंदी थट्टेनें म्हणायची, " बाजारांत तर साखर महाग होत चाललीय् ! पण इकडची साखरझोप कांहीं कमी होत नाहीं अजून ! " राजाराम उत्तर देई, " ती कधींच कमी होणार नाहीं. युरोपांत महायुद्धच काय, पण अतियुद्ध झालं तरी आमची साखर संपायची नाहीं ! " " ती कशी ? " म्हणून कालिंदीनें प्रश्न केला कीं राजाराम तिला जवळ ओढून तिच्य ओठांकडे स्निग्ध दृष्टीनें पाहत म्हणे, " द्रौपदीच्या स्थालींतून हवं तेव्हां, हव तेवढं अन्न निर्माण होत असे ना ? तुझे ओठहि तसेच आहेत ! त्यांतून हवी तेवढी साखर-" राजारामाचें बोलणें इथपर्यंत आलें कीं, अरविंद नि शशी गाढ झोपले असले तरी कालिंदी म्हणे, " अरु जागा होतोय् वाटतं ! त्यानं हें ऐकलं तर-" राजाराम हसत हसत उत्तर देई, " ऐकलं तर ऐकलं ! काय कळणार आहे लेकाला त्यांत ? "

ही किंवा अशीच कांहीं तरी गोड थट्टा करीत करीत अंथरुणावरून उठायची राजारामला पांच-सहा वर्षे सवय लागली होती. यामुळें अंथरु-णावर गाढ झोंपीं गेलेल्या कालिंदीची मूर्ति पाहून आपण स्वप्नांत तर नाहीं ना, असें त्याला क्षणभर वाटलें. एखाद्या अरण्यांत वाट फुटेल तिकडे जाणाऱ्या प्रवाशाला एखाद्या जाळीच्या आड निजलेली वनदेवता दिसावी तशी ती दिसत होती !

आपल्याला एकदम जाग येण्याचें कारण आतां कुठें राजारामाच्या ध्यानांत आलें. कालिंदी आपल्या मावसबहिणीच्या लग्नाकरितां दुपारच्या गाडीनें आठ-दहा दिवस गांवाला जाणार होती. लग्न झाल्यापासूनच्या सहा वर्षांत एवढ्या दीर्घ विरहाचा हा दुसरा प्रसंग राजारामावर आला होता. पहिला, लग्न झाल्यानंतर एक महिन्यानें कालिंदीची मावशी तिला घेऊन गेली होती तो ! त्या वेळीं विरहाचे ते दहा दिवस त्याला दहा वर्षांसारखे वाटले होते. मग आतांचे दहा दिवस त्याला दहा युगांसारखे वाटूं लागल्यास त्यांत नवल

कसलें ? रात्रीं कालिंदी खुंटीला टांगून ठेवलेल्या दिव्याची वात बारीक करीत असतांना राजारामानें तिला प्रश्न केला होता, " फक्त आठ दिवस तिकडं राहायचं ! आठ म्हणजे आठच हं ! "

" आणि मोजतां मोजतां चूक होऊन आठांचे नऊ झाले तर ? "

"तर ?–तर स्पेशल विमानानं येईन तुझ्या मावशीच्या घरीं आणि मग–"

" मग काय ? "

" विमानाच्या खर्चामुळें राणीसाहेबांची यंदा हिऱ्याच्या कुड्या घ्यायची इच्छा मनांतल्या मनांतच राहील ! "

राजारामाचें हें बोलणें ऐकतां ऐकतां दिवा अगदीं मंद करीत—इतका मंद, कीं तो जाईलच असें राजारामाला वाटलें—कालिंदी हसत हसत म्हणाली होती, " आठ म्हणजे सातच ! मग तर झालं कीं नाहीं ? "

रात्रीच्या त्या संवादाची स्मृति होऊन राजारामानें खुंटीला टांगून ठेवलेल्या दिव्याकडे पाहिलें. ' आठ म्हणजे सात ' असे उद्गार काढतांना कालिंदीनें तो किती मंद केला होता ! पण हळूहळू मोठा होतां होतां, आतां त्याचा प्रकाश खोलींत किती तरी स्पष्ट दिसत होता. राजारामाच्या मनांत आलें, बारीक केलेला दिवा जसा आपोआप मोठा होत जातो, त्याप्रमाणें कालिंदीचा मावशीकडला मुक्कामहि हळूहळू वाढेल. काय नेम सांगावा ? लग्नापूर्वी वर्षभर ती आपल्या मावशीच्याच घरीं होती. तिथल्या तिच्या मैत्रिणी—एक काशी नि दुसरी—दुसरी कुणी तरी कुळवाड्याची मुलगी असावी ! लग्न झाल्यावर पहिल्यापहिल्यांदा त्या दोघींच्या किती तरी आठवणी कालिंदी आपल्याला सांगत असे. त्या दोघी मैत्रिणींची नि हिची आतां जवळजवळ सहा वर्षांनीं गाठ पडणार ! हिच्यापाशीं दोन रत्नें दाखवायला आहेतच त्यांनाहि आपल्या माणिकमोत्यांचें प्रदर्शन करायचें असेल ! मावशीच्या सहवासांत नि मैत्रिणींच्या मुलाबाळांच्या किलबिलाटांत कालिंदी आनंदांत राहील तिकडे. पण इकडे आपण मात्र—बल्लवाचार्य आणि गोंदू गडी हे आपले येत्या आठ दिवसांचे दोस्त !

कालिंदीच्या उशाशीं पडलेल्या गजऱ्याकडे त्याचें लक्ष गेलें त्याला वाटलें काल या फुलांचा कसा घमघमाट सुटला होता. पण आतां त्या सुकलेल्या

फुलांकडे पाहवतसुद्धां नव्हतें. न कळत राजारामाचें मन स्वत:च्या मनाची त्या गजऱ्याशीं तुलना करूं लागलें.

" अगबाई ! " या कालिंदीच्या उद्गारांनीं तो भानावर आला. नाहीं तर तिच्या विरहाच्या कल्पनेनें व्याकूळ झालेलें त्याचें मन किती तरी वेळ असल्याच विचारांच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात राहिलें असतें !

पडल्यापडल्या आपला हात स्निग्धपणानें त्याच्या हातांत देत कालिंदी म्हणाली, " आज अगदीं पूर्वेचा सूर्य पश्चिमेला उगवला म्हणायचा ! "

" पौर्णिमेचा चंद्र एकदम मावळायला लागला, तेव्हां त्याला भेटायला सूर्याला यावं लागलं ! " कृत्रिमपणानें हसत राजाराम उद्गारला.

त्याच्या या एका वाक्यांत केवढें उत्कट काव्य भरलें आहे याची कालिंदीला पूर्ण कल्पना होती. लग्न झाल्या दिवसापासून घर हेंच राजारामाचें जग झालें होतें. कॉलेजमध्यें शिकविण्यांत त्याचे तीन–चार तास जात. तेवढा वेळच काय ती कालिंदी त्याच्याबरोबर नसे. बाकी सकाळपासून संध्याकाळपर्यंत, अष्टौप्रहर, बारा महिने तो नि कालिंदी एकमेकांच्या सहवासाचा आनंद शक्य तितका उपभोगीत असत. अबोलक्या राजारामाला मित्र असे फार नव्हतेच; जे थोडेसे होते तेहि " एक बायको म्हणजे हजार मित्र " असे नवीन सुभाषित तयार करीत त्याच्या घरीं क्वचित् येत व आले तरी चहा पिऊन निघून जात. त्याला क्रिकेटचा थोडाफार षोक होता. पण कुठलीहि मॅच पाहायला तो कालिंदीलाच बरोबर घेऊन जाई आणि त्याचा विरस होऊं नये म्हणून क्रिकेटमध्यें फारसें कांहीं गम्य नसतांना कालिंदीहि त्याच्याबरोबर जाई. बाहेरच्या जगाशीं त्याचा फारसा संबंधच येत नसे. त्याच्या शिकवण्यावर खूष असलेलीं मुलें ' संस्कृतचे प्रोफेसरच सुसंस्कृत असतात ' असें नेहमीं म्हणत व तें ऐकलें कीं राजाराम मनांत अगदीं खूष होई.

पतिपत्नीचें हें प्रेम पाहून राजाराम ज्या छोट्या बंगलींत राहत असे तिचें विद्यार्थ्यांनीं ' घरटें ' असें नामकरण केलें होतें. एखाद्या उंच झाडाच्या फांदीवर मऊ मऊ कापसानें आणि लहान लहान गवताच्या काड्यांनीं सजविलेल्या घरट्यांत एखाद्या पांखराच्या जोडप्यानें आनंदानें चिंवूचिंव् करीत काळ काढावा, एकमेकांच्या चोंचींत चोंच घालून सूर्योदय आणि सूर्यास्त, आटलेली

नदी आणि पूर आलेली नदी लग्नसमारंभ आणि प्रेतयात्रा, किंबहुना जगांतल्या साऱ्या घडामोडी—जणूं कांहीं आपण या जगांतले कुणी नव्हे अशा समजुतीनें पाहाव्या, तसा राजाराम व कालिंदी यांचा संसार गेलीं सहा वर्षें चालला होता. दीर्घ काल टिकलेल्या या सुंदर स्वप्नाचा भंग आज कालिंदीच्या जाण्यानें होणार होता!

कालिंदीचा हात आपल्या हातांत अगदीं घट्ट धरीत राजाराम म्हणाला, " मला एक वचन हवंय्!"

कालिंदी हसत म्हणाली, " रात्रीं आठ दिवसांची मुदत सातावर आणणं झालं होतं. आतां साताचे सहा करायचे असतील! चहाच्या वेळपर्यंत सहाचे पांच होतील, नि दुपारीं गाडी सुटपर्यंत हा आंकडा एकावर आला तर मग मला जायलाच नको!"

तिच्या थट्टेचें कौतुक करीत राजाराम म्हणाला, " तुलासुद्धां मनांतून जायला नकोय्! पण—पण लग्नाच्या पूर्वी एक वर्ष तूं मावशीपाशींच होतीस. या वेळीं तूं गेली नाहींस तर तें बरं दिसणार नाहीं. पण..."

" पण काय? विमानानं जाऊन विमानानं येऊं कीं काय?"

राजाराम गंभीरपणानें म्हणाला, " तूं आठ दिवस रहा; पण दररोज तुझं खूपखूप मोठ पत्र यायला हवं मला."

" मावशीचं गांव अगदीं खेडेगांव आहे हें विसरणं झालं वाटतं? तिथं तीन पैशाचं कार्डसुद्धां वेळेवर मिळायचं नाहीं!"

" इथून पाकिटं नि तिकिटं नेलीं तर सामान अगदीं गुडसून न्यावं लागेल वाटतं!"

कालिंदी हसली, राजारामहि हसला.

* * *

राजारामाच्या बाहुपाशांतून मोकळें होणें कालिंदीलासुद्धां जड गेलें. स्त्रीच्या जीवनांतला सारा सारा आनंद पतीच्या प्रेमळ स्पर्शांत सामावलेला असतो, हा अनुभव तिला अत्यंत उत्कटतेनें आजच आला. उठतां उठतां तिच्या डोळ्यांत पाणी तरळूं लागलें. तें पाणी पाहतांच राजाराम सद्गदित स्वरानें पण हसऱ्या मुद्रेनें म्हणाला, "मी चित्रकार असतों तर फार बरं झालं असतं!"

उशाजवळचा किल्ल्यांचा जुडगा उचलीत कालिंदीनें त्याच्याकडे एक प्रश्नार्थक कटाक्ष टाकला. राजाराम उद्गारला, " चित्राला एक फार चांगला विषय मिळालाय् आज. "

" त्या चित्राचं नांव काय ? "

" घरट्याबाहेर ! "

कालिंदी ऐकूं लागली. राजाराम हसत हसत सांगूं लागला, " किती छान चित्र काढतां येईल या कल्पनेवर ! एका उंच झाडावर एक सुंदर घरटं आहे. एक पाखरूं त्या घरट्याबाहेर पडत आहे. त्याचा जोडीदार घरट्यांतून बाहेर डोकावून पाहात आहे. बाहेर जाणारं पाखरूं मागं वळून पाहतं. आपल्या जोडीदाराकडे पाहतांच त्याचं मन व्याकूळ होतं आणि मग घरट्यापाशीं परत येऊन, चोंचींत चोंच घालून—"

"स्वारी प्रोफेसर आहे तेंच बरं आहे ! चित्रकार झाली असती तर..."

" तर काय झालं असतं ? "

" इकडल्या प्रत्येक चित्रावर ओलेतीसारखीं वादळं झालीं असतीं ! "

* * *

चहा झाल्यावर कालिंदी बांधाबांध करूं लागली. राजाराम तिच्या अंवतीं-भंवतींच घुटमळत होता. ट्रंकेंत मुलांचे इस्त्रीचे कपडे भरीत कालिंदीनें त्याला विचारलें, " आज पुस्तकाचं काम करायचं नाहीं वाटतं ? "

राजारामला तिचा हा प्रश्न अगदीं रुक्षपणाचा वाटला. पण तो कांहीं बोलला नाहीं. लहान मूल बशींतला एखादा गोड पदार्थ संपल्यावर ती बशी जशी चाटूं लागते त्याप्रमाणें आपण तुझ्या सहवासाचा उरलासुरला वेळ अतृप्त दृष्टीनें पदरांत पाडून घेत आहोंत हें तुझ्या लक्षांत कसें आलें नाहीं, हा प्रश्न मात्र त्याच्या मुद्रेवर प्रतिबिंबित झाला होता. पण कालिंदीला त्याला खिजविण्याची लहर आली होती. ती म्हणाली, " पुस्तक लवकर संपलं नाहीं तर मला हिऱ्याच्या कुड्या मिळायला उशीर नाहीं का होणार ? "

राजाराम मुकाट्यानं आपल्या लिहायच्या खोलींत गेला. त्यानें काल लिहिलेले कागद चाळून पाहिले. शाकुंतलांतला दुष्यन्त शकुंतलेचें चुंबन घेण्याचा प्रयत्न करतो तो प्रसंग—व मृच्छकटिकांत वसंतसेना पावसांतून

चारुदत्ताच्या भेटीला जाते तो प्रसंग–या दोन्हींची तुलना नुकतीच सुरू झाली होती.

राजारामानें आपलीं टांचणें हातांत घेतलीं. " रमणरमणींच्या मीलनांतील काव्य " हे शब्द त्यानें वाचले आणि टांचणें दूर ठेवून तो खोलींत येरझाऱ्या घालूं लागला.

* * *

आज पंचरंगी सामन्यांतील हिंदु-मुसलमानांच्या सामन्याचा शेवटचा दिवस होता. समोरच्या घरीं रेडिओ सुरू होतांच राजाराम तेथें गेला. हिंदु खेळूं लागल्यावर तो मध्येंच परत आला. कालिंदीनें विचारलें, "मॅचचं काय झालं ?"

राजारामनें उत्तर दिलें, " शशीचा गरम कोट घेतला आहेस ना ? नाहीं तर थंडी वाजते म्हणून तो रात्रीं रडत असेल ! "

आज स्वारीचें क्रिकेटमध्येंसुद्धां लक्ष नाहीं हें कालिंदीनें ओळखलें; पण त्याचें तिला हसूं आलें नाहीं. सकाळपासून तिचें मन तरी कुठें स्थिर होतें ? राहून राहून तिच्या मनांत येत होतें–त्या खेडेगांवांत शशी नाहीं तर अरविंद आजारी पडला तर डॉक्टरसुद्धां नाहीं मिळायचा ! आणि जिथें उभ्या दिवसांत पतीचें दर्शन व्हायचें नाहीं, तिथें आपल्याला रात्रीं स्वस्थ झोप तरी येईल का ? छे: ! माणसाचें घर हेंच त्याचें जग आहे. या जगाबाहेर जाणें म्हणजे—

स्टेशनावर एकमेकांचा निरोप घेतांना राजाराम आणि कालिंदी इतकीं सद्‌गदित झालीं होतीं, कीं डब्यांतील एक-दोन उतारूंना त्यांचें नुकतेंच लग्न झालें असावें अशी शंका आली. पलीकडे खिडकींतून डोकावून पाहणाऱ्या दोन मुलांकडे नजर जातांच मात्र ते उतारू बुचकळ्यांत पडले.

* * *

राजाराम जड पावलांनींच घरांत शिरला. त्याचें लक्ष भिंतींना लावलेल्या फोटोकडे गेलें. किती तरी दिवसांत त्यानें हे फोटो पाहिले नव्हते. पण आतां मात्र एकेका फोटोपुढें उभा राहून तो न्याहाळून पाहूं लागला. लग्नानंतर थोड्या दिवसांनीं घेतलेला दोघांचा फोटो, रांगत्या अरूचा फोटो, अरु आणि शशी यांचा फोटो आणि सर्वांचा मिळन एक फोटो–हे फोटो क्रमानें पाहतांना

गेल्या सहा वर्षांतलें सारें आयुष्यच त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. उत्तररामचरित्रांत राम आणि सीता आपल्या आयुष्यांतील प्रसंगांचा चित्रपट पाहतांना त्यांत इतकीं कां रंगून जातात याचा उलगडा त्याला या क्षणीं झाला.

पण ते फोटो पाहतां पाहतां त्याच्या मनाची व्याकुळता अधिकच वाढली. तो दुसऱ्या खोलींत गेला. तेथें फोनोग्राफ होता. एखादें गाणें लावावें अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली; पण लगेच त्याच्या कानांत अरूचे बोबडे बोल घुमूं लागले, " हाशत नाचत ज्याऊं ! ज्याऊ च्यला गोकुलाला ! "

त्याला वाटलें, आपल्या घरांतलें गोकुळ आज कुठें तरी दूरदूर गेलें आहे आणि आपण एकटेच सहारासारख्या ओसाड वाळवंटांत—

एखादें पुस्तक वाचीत पडलें तर मनाला विरंगुळा वाटेल म्हणून तो कपाटाकडे वळला. पण कपाट उघडतां उघडतां त्याला एक प्रसंग आठवला आणि पुस्तकाकरितां त्यानें पुढें केलेला हात जागच्या जागींच राहिला.

त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलेलें तें स्मृतिचित्र फार सुंदर होतें.

असेंच एकदां आपण कपाट उघडीत होतों मागून कालिंदी आली नि म्हणाली, " हें पाहिलंत का ? " आपण वळून पाहिलें. तिच्या हातांत एक खोबऱ्याचा तुकडा होता. आपल्याला गोड खोबरें फार आवडतें म्हणून ती तो घेवून आली होती. त्या तुकड्याचें टोक कुणी तरी खाल्लेलें दिसलें. आपण म्हटलें, " दुसऱ्याचं उष्टं आपण खात नाहीं बुवा ! "

कालिंदीनें उत्तर दिलें, " पण शबरीचीं बोरं रामानं खाल्लीं होतीं ! " खोबरें गोड आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां कालिंदीनें तें उष्टावून पाहिलें होतें. त्यामुळेंच त्याला विलक्षण गोडी आली होती.

या आठवणीनें राजारामाला अगदीं बेचैन केलें. कपाटांतलें एकहि पुस्तक न घेतां तो परतला. कालिंदीचें पोंचल्याचें पत्र आपल्याला परवां येणार, तोंपर्यंत आपणाला घरांत भुतासारखें एकटें राहावें लागणार, या कल्पनेनें तो अतिशय उदास होऊन गेला.

* * *

त्याला एकदम आठवण झाली. सहा वर्षांपूर्वी कालिंदी मावशीकडे गेली तेव्हांचीं पत्रें त्यानें जपून ठेवलीं होतीं. उन्हाळ्यांत जशा वाऱ्याच्या झुळुकी

विलक्षण सुखावह वाटतात, त्याप्रमाणें त्या विरहाच्या दिवसांत या पत्रांचीं पारायणें त्याला आनंददायक झालीं होतीं.

अवघीं सात पत्रें होतीं तीं! पण प्रत्येक पत्रांत एक तरी वाक्य असें होतें, कीं जें खडीसाखरेच्या खड्याप्रमाणें मनांत घोळवत घोळवत त्याची गोडी चाखावी.

पहिल्या पत्रांत कालिंदीनें लिहिलें होतें, " काल रात्रीं मी राहून राहून जागी होत होतें. जाग येऊन डोळे उघडले कीं वाटे, अल्लाउद्दिनाच्या गोष्टींत दिवा आहे ना, तसा दिवा माझ्यापाशीं असता, तर तो घासून राक्षस समोर उभा राहतांच मीं त्याला म्हटलें असतें, ' आत्तांच्या आत्तां मला त्यांच्याकडे जायचंय् ! ' हो, त्या राक्षसाला न भितां मीं असा हुकूम सोडला असता — नि त्याच्याबरोबर तुमच्याकडे आलेंहि असतें ! "

दुसऱ्या पत्राचा शेवट असा होता–" आमच्या खेड्यापाड्यांत टेलिफोन कधीं होणार ? तेवढी सोय असती तर दररोज तुमचा शब्द ऐकून तरी माझं मन शान्त झालं असतं. "

तिसऱ्यांत कालिंदी म्हणत होती-" प्रीति ही मोठी वाईट चेटकीण आहे. ती माणसाचें मनसुद्धां बदलून टाकते. आतां मला मावशी कशी परक्यासारखी वाटते ! पूर्वी काशी नि मंजुळा या मैत्रिणी एक दिवस भेटल्या नाहींत तर कसेंसेंच होई. पण आतां त्या समोर बोलत बसलेल्या असल्या तरी माझें मन तुमच्याच आठवणींत गुंग झालेलें असतें. "

राजारामाला वाटलें, हीं जुनीं सात पत्रें नाहींत — ते प्रीतिगीताचे सप्तस्वर आहेत. त्यांच्या मधुर नादांत आपण परवांपर्यंतचा वेळ कसाहि काढूं

* * *

तिसऱ्या दिवशींचें टपाल राजारामानें किती अधीरपणानें पाहिलें.

पण त्यांत कालिंदीचें पत्र नव्हतें. सारी रात्र त्यानें तळमळत काढली. कालिंदीनें पत्र कुणाकडे तरी टाकायला दिलें असावें; पण तें वेळेवर पोस्टांत पडलें नसावें, अशी शेवटीं त्यानें आपली समजूत करून घेतली.

मृग कोरडा गेलेला पाहून चिंतातुर झालेल्या शेतकऱ्यानें पावसाची

वाट पाहावी त्याप्रमाणें त्यानें दुसरे दिवशीं टपालाची वाट पाहिली. पण त्या दिवशीचा पोस्टमनहि निष्ठुरच निघाला.

राजारामाला काळजी वाटूं लागली. शशी किंवा अरु आजारी तर नसेल ना ? का कालिंदीलाच कांहीं होत असेल ? आपण आत्तांच्या आत्तां तार केली तर—

—तर मावशी हसतील ! कालिंदीची थट्टा करतील ! छेः !

उद्यां पत्र आलें नाहीं तर मात्र तार करायचीच, असा निश्चय करून कालिंदीचीं जुनीं पत्रें चाळीत त्यानें मधला दिवस घालविला.

* * *

तहानेलेल्या मनुष्याच्या तोंडाशीं कुणी तरी अमृताचा पेला लावावा तसें त्याला कालिंदीचें पत्र पाहून वाटलें. पत्र खूप मोठें असेल अशी त्याची प्रथम कल्पना होती. पण पाकीट फोडून पाहतांच त्याची निराशा झाली ! पत्राचा आरंभ तर अगदींच अनपेक्षित होता !—

" पत्र पाठवायला दोन दिवस उशीर झाला म्हणून तुम्ही रागावलां असाल. पण खरें सांगूं ? मलाच तुमचा राग आला आहे. "

कालिंदीनें पुढें लिहिलें होतें. " सहा वर्षें तुम्हीं मोठ्या प्रेमानें मला आपल्या घरट्यांत सांभाळलीत, बाहेरचा थंडी-वारा लागूं दिला नाहींत. पण थंडीवाऱ्याला भिऊन बाहेरच्या जगापासूनहि तुम्ही मला दूर ठेवलेंत. तुम्हीहि त्याच्यापासून दूर राहिलांत. या मोठ्या जगांतले तीन धक्के या तीन दिवसांत मला मिळाले. त्या धक्क्यांनीं माझें मन कसें भांबावून, गोंधळून गेलें आहे.

" मी आलें त्याच दिवशीं माझ्या मावसबहिणीचें लग्न मोडलें. वर-पक्षाला हजार-पांचशें रुपये जास्ती देणारा कुणी तरी गरजवंत मिळाला आणि— मावशीचें सांत्वन कसें करायचें ? मुलीचें लग्न एकदां मोडलें कीं— फुटलेली कांचच म्हणायची ती !

दुसरे दिवशीं मी मंजुळेला भेटायला गेलें. तिचा नवरा न्यूमोनियानें आजारी होता. खेडेगांवांतील शेतकऱ्याला लांबून डॉक्टर आणण्याची ऐपत कुठून असणार ? पण तेवढ्यावरच त्याचे हाल संपले नाहींत.

मी मंजुळेच्या झोपडींत गेलें तेव्हां त्याच्या भोंवतालचे लोक त्याचें डोकें चिरून त्यांत झाडपाल्याचें कसलें तरी औषध भरत होते. त्या प्रसंगाची आठवण झाली, कीं अजून कसे अंगावर शहारे येतात !

दारिद्रय आणि अज्ञान यांच्या पायीं विधवा झालेल्या मंजुळेचें सांत्वन मी कुठल्या तोंडानें करूं !

काशीकडे गेलें तों ती दहा दिवसांची बाळंतीण ! घासभर अन्नालासुद्धां महाग झाली आहे ती ! नवऱ्याची भिक्षुकीची वरसल पांच मैलांवरल्या खेडेगांवांत आहे. तो बाळंतिणीला कसली मदत करणार ? सहा वर्षांत सहा मुलें झाल्यामुळें काशीचें शरीर नि मन दोन्ही म्हातारीं झालीं आहेत. ती स्फुंदत मला म्हणाली, 'देव किती निष्ठुर आहे ग ! नको नको म्हणत असतांना तो मला मुलं देतोय्, आणि — ? '

काय उत्तर देणार मी तिला ?—मला लवकरच हिऱ्याच्या कुड्या मिळणार आहेत हें ?

आपल्यासारख्या माणसांच्या घरट्यांत सुदैवानें गारवा आहे; पण त्या घरट्याबाहेर केवढा वणवा पसरला आहे ! या वणव्यांत आपलीं माणसें होरपळून जात असतांना आपण गप्प बसायचें ? छे !

दोनच वाटा मला पुढ दिसताहेत. तो वणवा विझविण्याचा प्रयत्न करावा, नाहीं तर इतरांच्याबरोबर जळून तरी जावें ! "

* * *

राजारामानें तें पत्र दूर ठेवून डोळे मिटले. त्याच्या मिटलेल्या डोळयांपुढें त्या तीन अभागी मुली उभ्या राहिल्या. त्यानें डोळे उघडले. "घरट्याबाहेर, घरट्याबाहेर" असा कालिंदीचा कर्कश स्वर् आपल्या कानांत घुमत आहे असा त्याला भास झाला !

# प्रार्थना

प्राचीन काळची गोष्ट—

त्या वेळीं आभाळांत स्वच्छंदानें उडणाऱ्या पांखरांना विमानांची घरघर ऐकूं येत नसे; आणि पृथ्वीवर फुलणाऱ्या फुलांना आकाशांतून पडणाऱ्या बॉंबगोळ्यांचें भय वाटत नसे.

त्या वेळीं जशीं पांढरपेशांचीं संस्कृति-संरक्षण-मंडळें नव्हतीं, तसे शेत-कऱ्यांचे मोर्चे आणि मजुरांचे संपहि नव्हते.

रानावनांत झोपड्या बांधायच्या, जेवढी जमीन कसतां येईल तेवढी कसून तिच्यांतून पीक काढायचें आणि काम करतांना गात आणि गातांना काम करीत करीत आयुष्यांत रंगून जायचें, एवढेंच त्या वेळीं बहुतेक लोकांना ठाऊक होतें.

या झोपड्यांतून राहणारे शेतकरी सख्या भावाहूनहि अधिक प्रेमानें एक-मेकांशीं वागत. एकाच्या पायांत कांटा बोंचला तर साऱ्यांच्या डोळ्यांत पाणी येई. एकाला मधाचें पोळें मिळालें कीं, प्रत्येक झोपडींतल्या माणसांना भाकरी-बरोबर मध खायला मिळे.

*　　*　　*

वासरांनीं शेतांत शिरून कणसांना तोंड लावलें तरी सारे म्हणत, "थोडं खाऊं देत तीं! त्यांनाहि आपल्यासारखा जीव आहेच कीं!"

पांखरें येऊन पिकलेल्या कणसांवर झडप घालूं लागलीं तरी ते म्हणत, " थोडं नेऊं देत तीं ! त्यांनाहि आपल्यासारखा जीव आहेच कीं ! "

एके दिवशीं अगडबंब जटाजूट धारण करणारा आणि भली मोठी दाढी वाढविलेला एक गंभीर मनुष्य या झोंपड्यांच्याजवळ आला. अगदीं भुकेलेला होता तो ! त्यानें अन्न मागितलें. सारे शेतकरी म्हणाले, " थोडं खाऊं दे हा ! यालाहि आपल्यासारखा जीव आहेच कीं ! "

* * *

दुसरे दिवशीं ते त्याला शेतांत काम करायला बोलवूं लागले. तो साधु म्हणाला—" मी काम करणार नाहीं ! "

सर्वांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं हसत विचारलें, " मग तूं करणार काय ? "

साधु उत्तरला—" प्रार्थना ! "

प्रार्थना या शब्दाचा अर्थ त्या शेतकऱ्यांपैकीं एकालाहि कळला नाहीं.

साधु हसून म्हणाला, " तुम्ही मूर्ख आहांत. अडाणी आहांत ! पाऊस पडल्याशिवाय तुमचें शेत पिकेल का ? "

सारे उद्गारले, " नाहीं ! कधींहि पिकणार नाहीं ! "

" तो पाऊस कोण पाडतो ? " साधूनें प्रश्न केला.

सर्वांनीं उत्तर दिलें, " आभाळ ! "

साधु उपहासानें म्हणाला, " मूर्ख ! अडाणी ! आभाळ पाऊस पाडत नाहीं, देव पाऊस पाडतो. आभाळाच्या आंत तो बसलेला आहे. तो रागावला कीं वीज चमकते, तो हसला कीं चांदणें फुलतें. दररोज त्या देवाची प्रार्थना करा. नाहीं तर तो पाऊस पाडणार नाहीं, तुमचीं शेतें पिकणार नाहींत. "

साधूनें डोळे मिटून दोन्ही हात जोडून मोठे मोठे शब्द म्हणायला सुरवात केली; ते शब्द कांहीं केल्या शेतकऱ्यांना म्हणतां येईनात. त्यांनीं मुकाट्यानें हात जोडून डोळे मिटून देवाची प्रार्थना केली.

* * *

त्या झोंपड्यांत दररोज नेमानें प्रार्थना होऊं लागली.

त्या वर्षी पाऊस अगदीं हवा तसा पडला.

शेतकऱ्यांना वाटलें प्रार्थनेनें देव प्रसन्न झाला.

स्वतःला दोन घास कमी मिळाले तरी हरकत नाहीं, पण साधुमहाराजांची प्रार्थना, पूजा, यज्ञ, हीं सारीं सुरळीत चालावींत म्हणून प्रत्येकानें साधूला जास्तींत जास्त धान्य दिलें.

लवकरच आणखी किती तरी साधु तिथें येऊन झोपड्या बांधून राहिले.

त्या सर्वांची प्रार्थना पाहून शेतकऱ्यांना वाटे—' आतां देव आपल्यावर कधींच कोपणार नाहीं ! '

*　　　*　　　*

पुढल्या तीनचार वर्षांत त्यांच्यावर एकदांहि देवाची अवकृपा झाली नाहीं !

पण देव रागावला नसतांहि त्यांच्यापैकीं प्रत्येकावर मधूनमधून अर्धपोटी राहायची पाळी येऊं लागली. अहोरात्र प्रार्थना करून देवाला प्रसन्न ठेवणाऱ्या त्या सर्व साधूंना, ते मागतील तेवढें धान्य देणें हें प्रत्येकाला आपलें कर्तव्य वाटत होतें. पण—त्या सर्वांची सकाळ-संध्याकाळ चाललेली प्रार्थना ऐकूनहि देव दुप्पट धान्य कां पिकवीत नाहीं ही शंका आतां प्रत्येकाच्या मनांत उत्पन्न होऊं लागली.

*　　　*　　　*

आणि लवकरच असा एक पावसाळा आला कीं—

उन्हाळयाचे दिवस मोजून मोजून संपले होते म्हणूनच त्याला पावसाळा म्हणायचा ! एरव्हीं तो भयंकर उन्हाळाच होता. आभाळांतून एकसारखी निखाऱ्यांची वृष्टि होऊं लागली. त्या निखाऱ्यांनीं जमिनीवरील हिरवळ जळून तिची राखरांगोळी झाली ! वृक्षवेलींचें निष्प्राण सांगाडे पाहून पूर्वी त्यांच्याशीं कुजबुज करणारा वारा उष्ण निःश्वास टाकूं लागला. आपण पृथ्वीवर नसून एका उकळत्या कढईत कोंडले गेलों आहोंत—आणि त्या कढईच्या खालीं वणवा पेटला आहे, असें प्रत्येकाला वाटूं लागलें.

शेतकऱ्यांच्या डोळयांत पाणी उभें राहिलें.

पण आभाळाच्या ?

छेः ! तिथें काळया मेघांची छायासुद्धां दिसत नव्हती.

शेतकरी साधूंना शरण गेले.

साधूंनीं यज्ञ आरंभला.

यज्ञाच्या ज्वाळा आभाळाला जाऊन भिडल्या. पण त्याच्या पलीकडे बसलेल्या देवाला कांहीं त्यांची झळ लागली नाहीं.

साधूंनीं अहोरात्र सामुदायिक प्रार्थना सुरू केली.

त्यांच्या प्रार्थनेचा आवाज आकाशापर्यंत जाऊन पोंचला; पण त्याच्या पलीकडे बसलेल्या देवाला कांहीं तो ऐकूं गेला नाहीं.

* * *

बाहेरची आग शेतकऱ्यांच्या पोटापर्यंत येऊन पोंचली. साधुमंडळी दररोज भोजन झाल्याबरोबर उपाशी शेतकऱ्यांना आशीर्वाद देत होतीच. पण आशीर्वादांनीं जगांतली कुठली आग विझली आहे ?

एक धीट शेतकरी पुढें झाला व म्हणाला, " या साधूंच्या झोपड्यांत अजून खूप धान्य शिल्लक आहे. त्याच्यावर थोडे दिवस आपली गुजराण होईल; पुढचं पुढं ! "

शेतकऱ्यांच्या जमावानें धान्याची मागणी करतांच साधूंचा पुढारी ओरडला, " यंदा नाहीं तर नाहीं; पण पुढल्या वर्षी तरी पाऊस पडायला हवा ! तो पडावा म्हणून देवाची अहोरात्र प्रार्थना व्हायला हवी ! तशी प्रार्थना करायला आमच्या अंगांत शक्ति हवी-आणि अंगांत शक्ति असायला– "

त्याचें तें वक्तृत्व ऐकायला एकहि शेतकरी जागेवर राहिला नाहीं. त्या सर्वांनीं मिळून त्याच्याच झोपडीवर हल्ला चढविला.

दार अडवून उभा राहिलेला तो साधु म्हणाला, " मागं सरा, मागं सरा ! माझ्या अंगाला हात लावलात तर देवाचा कोप होईल ! "

क्षणभर डोळे मिटून त्यानें देवाची प्रार्थना केली. पण एकाहि शेतकऱ्यानें आपले हात जोडले नाहींत.

दुसऱ्या क्षणीं साधु डोळे उघडून पाहतो तों, प्रत्येक शेतकरी आपला कोयता सरसावून झोपडींत शिरण्याकरितां तयार झाला आहे.

साधु गडबडला. थरथर कापत तो म्हणाला, " मला मारूं नका. माझी एकच प्रार्थना आहे. मला—"

क्षणभर डोळे मिटून ते पुन्हा उघडीत आणि इतर साधूंना हाक मारीत तो म्हणाला, " या, या, लवकर या. या सर्वांच्या पायां पडा. यांची प्रार्थना करा ! "

शेतकरी आणि साधु त्याच्याकडे चकित होऊन पाहूं लागले.

साधूंचा तो पुढारी उद्‌गारला, " आतांच मला देवाचा साक्षात्कार झाला. देव आतां आकाशाच्या पलीकडे नाहीं. तो पृथ्वीवर उतरला आहे. या शेतकऱ्यांत त्याचा संचार झाला आहे. "

लगेच त्या साधूनें शेतकऱ्यांना साष्टांग नमस्कार घातला. इतरांनींहि त्याचें अनुकरण केलें.

शेतकऱ्यांनीं हातांतले कोयते दूर भिरकावून दिले !

---

# पतित

ज्याला आत्मचरित्र लिहावयाचें असेल त्यानें त्याची सुरवात करण्यापूर्वी चारदोन आठवडे तरी आगगाडींतून एकसारखा प्रवास करायला हवा ! म्हणजे मागच्या आयुष्यांतल्या एकूणएक आठवणी त्याच्या डोळ्यांपुढें स्पष्ट उभ्या राहतील, नि...

मनांत आलेल्या या विचारानें माझें मला हसूं आलें. पण ग्वाल्हेरपासून तिसऱ्या वर्गाच्या डब्याच्या कोपऱ्यांत, केव्हां होल्डऑलला टेकून, डोळे मिटून, तर केव्हां डब्यांतल्या अनोळखी चेहऱ्यांकडे स्वप्नांत असल्याप्रमाणें पाहून, ज्यानें चोवीस तास आगगाडींत काढले असतील, त्याच्या मनांत असला कांहीं तरी विचार येणें स्वाभाविकच नव्हतें का ? गिरणींतल्या पट्या-प्रमाणें आगगाडीच्या चाकांचा होणारा कर्कश आवाज, प्रत्येक स्टेशनवर ऐकूं येणारा हरतऱ्हेचा गोंगाट, डब्यांतल्या माणसांचें जवळजवळ अर्थशून्य वाटणारें संभाषण; आणि एकाच जागीं बसून आंबून गेलेलें शरीर—या सर्वांचा मनावर किती विचित्र परिणाम होतो ! आपल्या भोंवताली दिसणाऱ्या गोष्टींशीं आपला कांहींच संबंध नाहीं असें या वेळीं वाटूं लागतें. क्लोरोफॉर्म दिल्यावर बेशुद्ध होण्यापूर्वी रोगी ज्या मन:स्थितींत असतो तिचा अशा वेळीं कंटाळलेल्या प्रवाशाला पुरेपूर अनुभव येतो ! नाहीं का ?

उन्हानें फूल मलूल व्हावें तसें या वेळीं माणसाचें मन गळून जातें आणि

मग गत आयुष्यांतल्या गोड आठवणींचें जलसिंचन करून त्याला टवटवीत-पणा आणण्याचा प्रयत्न...

निदान मी तरी डुलक्या घेत घेत तसा प्रयत्न करीत होतों. दहा वर्षांपूर्वी बेळगांवला माझे वडील हृदयक्रिया बंद पडून वारले. साहजिकच आमच्या कुटुंबाला ग्वाल्हेरला असलेल्या चुलत्यांच्या छत्राखालीं जावें लागलें. या दहा वर्षांत मी मुंबईच्या बाजूला फिरकलोंसुद्धां नव्हतों. आग्रा युनिव्हर्सिटीचा बी. ए. झाल्यावर मला ग्वाल्हेरांतच मास्तरकी मिळाली. मग मुंबईच्या बाजूला मौजेशिवाय दुसऱ्या कोणत्या कारणासाठीं यायचें ? पण मौज आणि मास्तरकी यांचें सख्य सहसा असत नाहीं ! माझ्या धाकट्या बहिणीचें लग्न लवकर करण्याचें काकांनीं ठरविलें नसतें तर माझ्या कुंडलींतला मुंबईच्या प्रवासाचा हा योगसुद्धां कुंडलींतच राहिला असता ! पण...

माझा बेळगांवचा शाळासोबती मधुकर साठे याच्या स्थळाचीच प्रथम चौकशी करावी असें आईनें ठरविलें. मधुकराचा नि माझा पत्रव्यवहार अखंड सुरू होताच. बी. ए. झाल्यावर त्यानें मुंबईच्या एका सिनेमा कंपनींत नोकरी मिळविली होती. तिथें तो कसलें काम करीत होता हें मला ठाऊक नव्हतें; पण या नाहीं त्या निमित्तानें त्याचा फोटो वर्तमानपत्रांत पांच-दहा वेळां तरी आला होता. आणि दर वेळीं तो पाहून माझ्या मनामध्यें एक सूक्ष्म प्रकारची मत्सराची छटा उत्पन्न झाली होती. आमच्यासारख्या मास्तरांचा फोटो वर्षांतून एकदाच निघायचा प्रसंग येतो. तो म्हणजे संमेलनाचा. पण असले फोटो वर्तमानपत्रांत कोण छापीत बसणार ? त्यामुळें मधुकराचा फोटो वर्तमानपत्रांत पाहिला कीं माझें मन म्हणे, "हा मध्या लेकाचा मोठा भाग्यवान् आहे !"

इंग्रजी पांचवींत आम्हां दोघांना बरोबरीनें मार्क मिळत होते. पण आज जगाच्या बाजारांत त्याची किंमत...कुठे त्याचीं द्राक्षें नि कुठे माझीं करवंदें ! आज ना उद्या सिनेमा कंपनींत याला चांगलें घबाड मिळणार, याचे पेटबाज फोटो वर्तमानपत्रांत छापून येणार नि कुंडली तशीच चांगली असली तर एखादी सुंदर सिनेमा-नटीसुद्धां स्वारीची बायको होईल ! मग काय विचारायलाच नको ! याचा दोनशें नि बायकोचा दोन हजार मिळून बावीसशे रुपये पगार

दरमहा घरांत येणार! दहा वर्षांपूर्वीचा तो गरीब मधुकर हें उद्यां एक स्वप्नच ठरेल नुसतें!...

मुंबई जसजशी जवळ येत चालली तसतसें मला वाटूं लागलें-सिनेमा-नटीशीं लग्न होण्याशिवाय मधुकराचें हें सारें भविष्य खरें व्हायला आपली कांहीं हरकत नाहीं. आपण बहिणीचें लग्न ठरवायला निघालों आहों. मधुकराच्या दोन हातांची गुप्त रीतीनें वाढ झाली नसली तर आपलें काम हां-हां म्हणतां फत्ते होईल! आणि तसेंच पाहिलें तर मधुकराचें सिनेमानटीशीं लग्न होणें फक्त सिनेमांतल्या गोष्टींतच शक्य आहे! घरदार, जमीनजुमला, कांहीं कांहीं नाहीं त्याला. अंगच्या हुषारीमुळें गरिबीशीं झगडत तो बी. ए. झालाय्, एवढेंच! असल्या भिकाऱ्यावर कुठली सिनेमानटी भाळेल? अप्सरा कधीं मानवावर प्रेम करीत नाहींत!

माझ्या डोळ्यांपुढे मधुकराचें विद्यार्थिदशेंतलें चित्र उभें राहिलें. पुष्कळ दिवस फाटकीं धोतरें नेसून गांधींचा दांडीयात्रेचा रंगीत फोटो विकत घेण्याइतके पैसे आईकडून त्यानें मिळविले होते. त्या फोटोला दररोज ताज्या फुलांची माळ घालायला मिळावी म्हणून, तो पहाटे उठून गावाबाहेरच्या पारिजातकाकडे अगदीं नियमानें जात असे. गांधींच्या फोटोकडे भावनापूर्ण दृष्टीनें पाहत तो म्हणे, "आयुष्यांत फक्त एक संधी मिळाली तरी मी सुखी होईन!"

"कुठली?" मी त्याला विचारी.

तो उत्तर देई, "महात्माजींच्या पायांवर डोकं ठेवायची."

त्याची आई फोटो काढून घ्यायला अगदी नाखूष असे. तेव्हां मधुकर म्हणे, "उद्यां नोकरी लागल्यावर मीच एक कॅमेरा विकत घेणार आहे नि मग तुझे फोटोच फोटो काढून साऱ्या घरांत लावणार आहे! देवपूजेच्या वेळचा, बाळान कांहीं हट्ट घेतला की त्याची समजूत घालण्याच्या वेळचा.."

"नि पोतेरं घालायच्या वेळचा!" आई मध्येंच म्हणे.

"हो-हो! तोदेखील फोटो मी घेणार आहे. सारवल्यावर तूं किती सुंदर रांगोळी घालतेस—आपल्या दारांतली रांगोळी पाहिली की तिच्यापुढे इराणी गालिचासुद्धां फिका वाटूं लागतो मला..." एवढें बोलून तो

गुणगुणूं लागे—

" स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी ! "

मी बोरीबंदरावर आलों तेव्हां हीच आठवण माझ्या मनांत तरंगत होती.

मला वाटलें—मधुकरानें मुंबईला आपलें बिऱ्हाडच केलें असेल. त्याची आईसुद्धां आपल्याला इथेंच भेटेल. माझे वडील वारले त्या दिवशीं किती मायेनें तिनें मला आपल्या पोटाशीं धरलें होतें ! मी माझ्या आसवांनीं तिचा पदर भिजवीत होतों आणि ती आपल्या अश्रूंनीं माझें डोकें न्हाणीत होती. गरीब माणसें मनानें किती श्रीमंत असूं शकतात हें त्या वेळीं मला कळलें होतें असली सासू आपल्या मुलीला अगदीं फुलासारखी सांभाळील अशी खात्री असल्यामुळेंच आईनें मधुकराला आपला जावई करायचें ठरविलें होतें.

खिडकींतून प्लॅटफॉर्मवरल्या गर्दीकडे पहात बोलायला सुरवात कशी करायची याचा मी विचार करीत होतों. " कसं काय जावईबुवा ? " असा प्रश्न बरा दिसेल, की " तूं आपली एक आवडती वस्तु आमच्या घरीं विसरून गेला आहेस. दहा वर्षें झालीं त्याला ! ती परत घेऊन जायला तूं ग्वाल्हेरला कधीं येणार ? " अशी सुरवात केली तर बरें दिसेल ?

पण काय बरें दिसेल, हें निश्चित करण्याची पाळीच माझ्यावर आली नाहीं ! प्लॅटफॉर्मच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत मीं फेरी घातली. पण मधुकराचा कुठेच पत्ता नव्हता !

तहानेलेल्या मनुष्याने गार पाणी मिळेल या आशेनें मडक्यापाशीं जावें नि त्या मडक्यांत पाणीच नसावें तशी माझ्या मनाची स्थिति झाली !

स्टेशनवर येण्याविषयी क्रमाने तीन पत्रांत मीं मधुकराला लिहिलें होतें. पण. . .

माझ्या मनांत आलें, मधुकर आता बडा मनुष्य झाला आहे ! एका मास्तराचें स्वागत करण्याकरितां स्टेशनवर येण्याची तसदी तो कशाला घेईल ?

पण लगेच दुसरें मन म्हणालें, मधुकरासारखा भावनाशील मनुष्य आपल्या बालमित्राशीं असा वागेल ? छे ! तें शक्य नाहीं ! त्याची गांधीजीं-वरली भक्ति, आईवरली भक्ति—भावनाशील मनुष्य जीवनप्रवाहांत पोहत जातो ! तो प्रवाहपतित कधीच होणार नाहीं.

हो, त्याला एकदम तापवीप आला असेल! गतवर्षांपासून मुंबईला मलेरियानें पुन्हा वर डोकें काढलेंय् असें कुणी तरी परवाच म्हणत होतें कीं! कदाचित् कंपनीनें त्याला कुठल्या तरी कामाकरितां परगावीं पाठविलें असेल! या सिनेमा कंपन्यांचा काय नेम आहे? राजा, स्त्री आणि लहान मूल या तिघांचाहि लहरीपणा सिनेमा सृष्टींत एकवटलेला असतो म्हणे!

मधुकरचा पत्ता मला ठाऊक होताच. व्हिक्टोरिया करून मी थेट त्याच्या बिऱ्हाडीं आलों.

घंटा वाजवितांच एक गडी बाहेर आला. त्याने विचारलें. ' कोन हवंय्?"

" मधुकर! "

" साहेब बाहेर गेल्याती. "

" साहेबांची आई तरी-"

" साहेबांची आई मरूनश्यान —"

आपण पत्ता तर चुकलों नाहीं ना, असें वाटून मीं दाराजवळच्या पितळी पाटीकडे पाहिलें. मधुकराचीच जागा होती ती! माझ्या मनांत आलें— त्याची आई एकदम आजारी पडून...

" साहेब येतील इतक्यांत " असें त्या गड्याने सांगितल्यामुळे मी सामान घेऊन आंत गेलों. समोरच ताज्या गुलाबांचा हार घातलेला एक भव्य फोटो होता. मीं उत्सुकतेनें पुढं होऊन पाहिलें. तो फोटो गांधींचा नव्हता— ग्रेटा गार्बोचा होता.

ग्रेटा गार्बोविषयी माझें मत वाईट आहे असें मुळीच नाही. ' क्वीन ख्रिस्तीना ' मधलें तिचें काम मला फार फार आवडलें होतें. तो चित्रपट पाहतांना तिच्यासाठी मी रडलोंसुद्धा होतों.

पण गुलाबांच्या हाराने अलंकृत झालेला तिचा फोटो पाहून मात्र मला कसेसेंच वाटलें! भिंतीवर टांगलेलीं लहान मोठीं सर्व चित्रें मीं न्याहाळून पाहिलीं. त्यांतील कांही कांही परदेशी चित्रें फारच सुंदर होतीं. एका चित्रांत एका माळरानावर एक उंचच्या उंच वृक्ष एकाकी उभा होता. त्याच्याकडे दृष्टि जातांच गांधींच्या दांडीयात्रेच्या फोटोचा अभाव मला मोठ्या तीव्रतेने जाणवला. दुसऱ्या चित्रांत आपल्या पिलांसाठी जिवावर उदार होऊन

लढणाऱ्या कोंबडीचें दृश्य होतें. त्या चित्रकाराच्या कलेची वाहवा करीत असतांना माझें मन म्हणालें, " मधुकरच्या आईचा फोटो इथं कुठंच दिसत नाही हें कसं ? "

माझें मन गोंधळून गेलें. इंग्रजी शाळेंत गांधींच्या फोटोची पूजा करणाऱ्या मधुकराने आज कट्टर देशभक्त व्हायला हवें होतें असें कांही नाही ! पण–एकाच मुलीचे ठिकठिकाणीं लावलेले निरनिराळया बैठकींतले ते पांच-सहा फोटो...ती मुलगी बहुधा सिनेमानटीच असावी !...बुटांचे पांच-सहा जोड नि इस्त्री केलेल्या कपड्यांची भलीमोठी रास...टेबलावर पडलेल्या पुस्तकाचें तें नांव...'फॉलिंग इन् लव्ह अगेन...' ॲशपॉटमधला राखेचा ढीग...त्या राखेकडे पाहतां पाहतां माझ्या मनांत एक विलक्षण कल्पना येऊन गेली ! आपल्यासमोर जी राख दिसतेय् ती सिगारेटची नाहीं; दहा वर्षांपूर्वीच्या मधुकराच्या मनांत ज्या भावना होत्या त्यांची राख आहे ती ! मला वाटलें–इंग्रजी शाळेंतला तो ध्येयवादी भावनाशील मधुकर कुठे तरी नाहीसा झाला; आणि त्याची जागा चैनीची चटक लागलेल्या आणि आपल्याच मिजाशींत गुरफटून गेलेल्या मधुकराने घेतली. तो मधुकर आपला मित्र होता— हा मधुकर नव्हे !

या विचारांबद्दल स्वतःच्या मनाचा मला असा राग आला ! मधुकर स्टेशनावर आला नाही म्हणून मला घुस्सा येणें स्वाभाविक होतें. पण तेवढ्यावरून मधुकर अगदी पार बदलून गेला आहे असा तर्क करणें अनुदारपणाचें नव्हतें का ? प्रत्येकाच्या आयुष्याच्या प्रवाहाला अनंत वळणें घेऊन जावें लागतें. मग सिनेमाच्या धंद्यांत आल्यावर सूटबूट, सिगारेट, सिनेमा-नटींच्या फोटोंची आवड इत्यादि गोष्टी मधुकराच्या आयुष्यांत आल्या तर त्यांत नवल कसलें ?

टेबलाखालच्या टोपलींतून कागदाचे दोनतीन कपटे उडत उडत माझ्याकडे आले. मीं ते कुतूहलानें उचलले आणि वाचूं लागलों–पहिल्या कपट्यावर अक्षरें होतीं, "प्रिय सुने..." मीं भिंतीवरल्या त्या मुलीच्या फोटोकडे पाहिलें. हीच ती सुनेत्रा असावी ! दुसऱ्या कपट्यावर लिहिलें होतें— "तुझ्यासाठी मी काय..." तिसऱ्या लांबट कपट्यावर शब्द होते, " तूं पतित नाहीस, पतिताला पावन करणारी देवता..."

टेबलाखालच्या टोपलींतले सर्व कपटे काढून मधुकराचें हें प्रेमपत्र जुळवून पाहावें अशी तीव्र इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. मुठींत मावतील तेवढे कपटे मीं उचललेसुद्धा.

पण इतक्यांत दाराबाहेर कुणाचें तरी बोलणें ऐकूं येऊं लागलें. मधुकरचाच आवाज होता तो! दहा वर्षांत त्याच्या आवाजांत एवढासुद्धा फरक झाला नव्हता. माझ्या मनांत आले— मघाशी आपण त्याच्याविषयीं घेतलेली शंका किती निर्दयपणाची होती! ज्याचा आवाजसुद्धां बदलला नाहीं, त्याचा स्वभाव कधीं तरी बदलेल का ?

मधुकर आंत आला; पण तो एकटाच नव्हता! त्याच्याबरोबर एक मुलगीहि होती तिला पाहतांच हीच सुनेत्रा असली पाहिजे अशी माझी खात्री झाली. तिचें सौंदर्य अधिक वर्णन कशाला करायला हवें ? ताईकरिता आपण दुसरें स्थळ पाहिलें पाहिजे अशी माझी क्षणांत खात्री झाली.

माझ्याशीं हस्तांदोलन करीत, स्टेशनवर येतां आलें नाहीं म्हणून मधुकरानें माझी इंग्रजींत माफी मागितली, ‘सुनेत्रादेवी’ शीं माझी ओळख करून दिली आणि माझ्याकडे पाहात तो उद्‌गारला, “अगदीं वेळेवर आलास तूं!”

स्वारी थोड्याच वेळांत लग्ननोंदणीकरिता रजिस्ट्रारच्या कचेरींत जाणार असून, अनायासें मी एक साक्षीदार मिळालों, असा या अभिनंदनाचा अर्थ वाटला मला! पण लगेच तो पुढें म्हणाला,“उद्या ताजमहालमध्यें मेजवानी देणार आहे मी!”

मला वाटलें—बहुधा स्वारी सुनेत्राचा वाढदिवस साजरा करण्याच्या बेतांत असावी! काका परवाच म्हणत होते की, आईबापांच्या श्राद्धांची जागा हल्ली तरुणींच्या वाढदिवसांनी घेतली आहे! काळ कितीहि बदलला तरी मनुष्याची उत्सवप्रियता बदलत नाही हेंच खरें!

पण ती वाढदिवसाची मेजवानी नव्हती.

मधुकराने आनंदानें सुनेत्राला मेजवानी द्यावी अशा संकटांतून काल तिची मुक्तता झाली होती. मधुकर त्याचें वर्णन करीत असतांना सुनेत्रेच्या मुद्रेवर जे भीतीचे भाव दृग्गोचर होत होते, त्यांवरून तो प्रसंग माझ्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत उभा राहिला. कंपनीच्या पुढल्या चित्रांत सुनेत्राला बोटीं-

तून उडी टाकून पोहत पोहत किनारा गाठायचा होता. तिचें बालपण गोमांतकांत—पाण्याच्या अगदीं माहेरघरांत गेलें असलें तरी तिला मुळींच पोहतां येत नव्हतें. त्या शिक्षणाला पंधरा दिवसांपूर्वी आरंभ झाला. आणि आपल्याला पोहायला यायला लागलें अशा समजुतीनें काल सुनेत्रा जुहूवर पोहायला गेली. ओहोटीची ओढ लागून ती जी आंत गेली—

एका कोळ्यानें तिला वांचविलें. मधुकर पाण्यांतच होता. पण त्याला पुढें जायची कांहीं छाती झाली नाहीं.

रात्रभर सुनेत्रा त्या भयंकर प्रसंगाच्या आठवणीनें दचकून जागी होत होती आणि आपल्या आईला घट्ट मिठी मारीत होती. माणसाचा धीर हवा म्हणून मधुकर रात्रीं बारापर्यंत तिच्याच घरीं राहिला होता आणि पहाटे उठून तिच्या प्रकृतीची चौकशी करण्याकरिता गेला होता. या धांदलींत मी आज ग्वाल्हेराहून येणार याची त्याला कशी आठवण राहावी ?

चहा होतांच मधुकराने मला जरा बाजूला नेऊन सांगितलें, "एक गोष्ट विसरूं नकोस. सुनेत्रच्यासमोर मला आई आहे, ती बेळगांवला आहे, ही गोष्ट बिलकूल बोलायची नाही."

"म्हणजे ?" मीं आश्चर्यानें प्रश्न केला.

"या प्रश्नाचं उत्तर सुनेत्रा तुझी वहिनी झाल्यावर तुला देईन."

मधुकरच्या आयुष्याला अगदी रहस्यमय कादंबरीचें स्वरूप आलेलें दिसलें. आई जिवंत असून या पोरीला ती मेली आहे असें हा कां भासवतोय् ? माझी अक्कल काम करीना ! मी मुकाट्यानें मधुकर आणि सुनेत्रा यांचें संभाषण ऐकत बसलों. अमक्या चित्राला टेंपो नाहीं, तमका डायरेक्टर सेटवर अंगांत आल्यासारखें करतो, क्षनें कुणी तरी 'बोकड' कापून नवीन कंपनी काढण्याचें ठरविलें आहे, इत्यादि इत्यादि गोष्टींत तीं दोघें अगदी रंगून गेलीं होतीं. पण एखाद्या हिंदु मनुष्यानें चुकून रविवारीं सकाळीं चर्चमध्यें शिरावें तशी त्या गोष्टी ऐकून माझी स्थिति झाली.

त्यामुळें चहाची पुनरावृत्ति झाली तेव्हां मीं मधुकराला म्हटलें, "संध्याकाळच्या गाडीनं बेळगावला जावं म्हणतो मी."

"बेळगावला" हा शब्द माझ्या तोंडांतून बाहेर पडला न पडला तोंच

सुनेत्रेने मोठ्या उत्सुकतेने माझ्याकडे पाहिलें. माझें बोलणें संपतांच ती म्हणाली, "बेळगांव मोठं सुंदर गाव आहे म्हणे! माझी आई लहानपणीं तिथं होती. तिच्या तोंडून मीं इतके वेळां बेळगांवचं वर्णन ऐकलंय की—एकदा बेळगांवला जाऊं या, असं हजारदा मीं मधुकरांना म्हटलं असेल! पण त्यांना कांहीं मुंबईचा मोह सोडवत नाहीं!"

"बेळगांवसारखं भिकार गांव साऱ्या जगांत नाहीं!" मधुकर म्हणाला.

"माझी आई कधीच खोटं बोलायची नाहीं, पैज लावा हवी तर! यांच्याबरोबर आपण दोघंहि बेळगांवला जाऊं या. मला बेळगांव सुंदर वाटलं तर जातायेता सारा खर्च तुम्हीं करायचा. मला गांव भिकार वाटलं तर सारा खर्च माझा!"

सुनेत्राने ती पैज मागे घ्यावी म्हणून मधुकराने खूप प्रयत्न करून पाहिले. पण कलियुगांतली स्त्री सिनेमानटी झाली तरी तिच्या रक्तांत त्रेतायुगांतल्या सीता–द्रौपदीचा लहरीपणा भरपूर भरलेला असतो हा अनुभव त्यालाहि आला. शिवधनुष्यभंग, मत्स्यभेद आणि बेळगांव सुंदर आहे कीं भिकार आहे हें ठरविण्यासाठी तिथें जाणें, या तिन्ही गोष्टी सारख्याच मूर्खपणाच्या आहेत असे त्याचा चेहरा एकसारखा म्हणत होता.

पण मुद्रा आणि मुख यांत अनेकदा दोन ध्रुवांचें अंतर असतें. तोंडानें त्याला सुनेत्रेच्या बेताला संमति द्यावीच लागली.

सुनेत्रेच्या आईची परवानगी सहज मिळाली. कालच्या अपघातामुळें सुनेत्रेला दोन दिवस कंपनींत जाण्याची जरूरी नव्हती. ह्यामुळे आजच्या मेलने बेळगांवला जाऊन उद्याच्या मेलने परत यायचें असा कार्यक्रम मधुकराने मुक्रर केला. मात्र एकान्त मिळतांच रागीट मुद्रेने तो मला म्हणाला, "आम्ही दोघं उद्या रात्रीं मेलच्या डब्यांत बसल्यावर मग तूं खुशाल आईला भेटायला जा! तोंपर्यंत दुसरं कांहीं करायचं नाहीं. आईविषयीं अवाक्षर बोलायचं नाहीं नि मला सोडून कुठं जायचं नाहीं!"

मधुकर आणि सुनेत्रा यांच्याबरोबर टॅक्सींत बसून बेळगावांतून फिरतांना मला दहा वर्षांपूर्वीच्या प्रत्येक स्थळाच्या आठवणी येत होत्या. किल्ला, रेसकोर्स, ठळकवाडी–सारें हां हां म्हणतां पाहून झालें. प्रत्येक ठिकाणीं सुनेत्रा

मधुकराच्या पाठीवरून असा हात फिरवायला मिळत नाही या आठवणीनें तिचें हृदय व्याकुळ झालें असावें! आपलें दु:ख आमच्या लक्षांत येऊं नये म्हणून ती लगेच हसून म्हणाली, " हें घर तुला परकं नसलं तरी इथं राहणं तुला आवडायचं नाही हें कळतं मला! माझ्यासारख्या म्हातारीलाच तें परवडेल! अरे, म्हाताऱ्या माणसाला काय! चिता चंदनाची असो नाही तर बाभळीची असो–कुडीला सारखीच!"

तिचें हें विलक्षण वाक्य आम्हां दोघांच्या अगदी जिव्हारीं लागलें. पण तिचें समाधान करायला मला तोंडच नव्हतें! म्हातारी पुढे बोलूं लागली, " कॉलेजांत असतांनाच मधूची सिनेमांत ओळख झाली बघ. मीं मनाशीं म्हटलं, आता वकिलींत नि मास्तरकींत काय उरलंय्? त्याला आवडतंय् तर जाऊं दे सिनेमांत! पण भारी वाईट धंदा आहे बाबा हा! वर्षांवर्षांत त्याला कधी रजा मिळत नाही; नि मुंबईंत राहायला खर्च तरी काय थोडा येतो? शंभर रुपयांतले सारे पंधरा उरतात त्याचे! तेवढे बिचारा पाठवितो मला! पंधराशेसारखे आहेत हं ते मला! वर्तमानपत्रांत त्याचा फोटो छापून आला की बाळ तो मला आणून दाखवितो नि मग..."

तिनें उठून कोनाड्यांतून चार पांच कागदांचे तुकडे काढले. मधूच्या फोटोचीं कात्रणें होतीं तीं!

" बाळ कुठं दिसत नाही?" विषय बदलण्याकरितां मीं प्रश्न केला.

ती हसून म्हणाली, " आजोळीं गेलाय् तो. यंदा मॅट्रिकला बसलाय्. तो पास झाला नि मधूच्या दोन हातांचे चार हात झालेले पाहिले, की मी सुखानं डोळे मिटीन!"

ती आणखीसुद्धा बोलत राहिली असती; पण चुलीवर उकळूं लागलेल्या आधणानें तिला हाक मारली.

चहा घेतां घेतां सुनेत्राहि सिनेमांत आहे असें जेव्हा मीं तिला सांगितलें तेव्हा ती हसत तिला म्हणाली, " बायका आता विमानंसुद्धा चालवायला लागल्या, मग सिनेमाची ग काय कथा?"

आईला नमस्कार करून आम्ही दोघें बाहेर गाडींत येऊन बसलों तेव्हा मीं सुनेत्रेकडे पाहिलें. तिच्या गालांवर अश्रु ओघळत होते. पण डोळ्यांत

सुनेत्रेने मोठ्या उत्सुकतेने माझ्याकडे पाहिलें. माझें बोलणें संपतांच ती म्हणाली, " बेळगांव मोठं सुंदर गाव आहे म्हणे ! माझी आई लहानपणीं तिथं होती. तिच्या तोंडून मीं इतके वेळां बेळगांवचं वर्णन ऐकलंय की—एकदा बेळगांवला जाऊं या, असं हजारदा मीं मधुकरांना म्हटलं असेल ! पण त्यांना कांहीं मुंबईचा मोह सोडवत नाहीं ! "

" बेळगांवसारखं भिकार गांव साऱ्या जगांत नाहीं ! " मधुकर म्हणाला.

" माझी आई कधीच खोटं बोलायची नाहीं, पैज लावा हवी तर ! यांच्याबरोबर आपण दोघंहि बेळगांवला जाऊं या. मला बेळगांव सुंदर वाटलं तर जातायेता सारा खर्च तुम्हीं करायचा. मला गांव भिकार वाटलं तर सारा खर्च माझा ! "

सुनेत्राने ती पैज मागे घ्यावी म्हणून मधुकराने खूप प्रयत्न करून पाहिले. पण कलियुगांतली स्त्री सिनेमानटी झाली तरी तिच्या रक्तांत त्रेतायुगांतल्या सीता—द्रौपदीचा लहरीपणा भरपूर भरलेला असतो हा अनुभव त्यालाहि आला. शिवधनुष्यभंग, मत्स्यभेद आणि बेळगांव सुंदर आहे कीं भिकार आहे हें ठरविण्यासाठी तिथें जाणें, या तिन्ही गोष्टी सारख्याच मूर्खपणाच्या आहेत असे त्याचा चेहरा एकसारखा म्हणत होता.

पण मुद्रा आणि मुख यांत अनेकदा दोन ध्रुवांचें अंतर असतें. तोंडानें त्याला सुनेत्रेच्या बेताला संमति द्यावीच लागली.

सुनेत्रेच्या आईची परवानगी सहज मिळाली. कालच्या अपघातामुळें सुनेत्रेला दोन दिवस कंपनींत जाण्याची जरूरी नव्हती. ह्यामुळे आजच्या मेलने बेळगांवला जाऊन उद्याच्या मेलने परत यायचें असा कार्यक्रम मधुकराने मुक्रर केला. मात्र एकान्त मिळतांच रागीट मुद्रेने तो मला म्हणाला, " आम्ही दोघं उद्या रात्रीं मेलच्या डब्यांत बसल्यावर मग तूं खुशाल आईला भेटायला जा ! तोंपर्यंत दुसरं कांहीं करायचं नाहीं. आईविषयीं अवाक्षर बोलायचं नाहीं नि मला सोडून कुठं जायचं नाहीं ! "

मधुकर आणि सुनेत्रा यांच्याबरोबर टॅक्सींत बसून बेळगावांतून फिरतांना मला दहा वर्षांपूर्वीच्या प्रत्येक स्थळाच्या आठवणी येत होत्या. किल्ला, रेसकोर्स, ठळकवाडी—सारें हां हां म्हणतां पाहून झालें. प्रत्येक ठिकाणीं सुनेत्रा

मधुकराच्या पाठीवरून असा हात फिरवायला मिळत नाही या आठवणीनें तिचें हृदय व्याकुळ झालें असावें! आपलें दु:ख आमच्या लक्षांत येऊं नये म्हणून ती लगेच हसून म्हणाली, " हें घर तुला परकं नसलं तरी इथं राहणं तुला आवडायचं नाही हें कळतं मला! माझ्यासारख्या म्हातारीलाच तें परवडेल! अरे, म्हाताऱ्या माणसाला काय! चिता चंदनाची असो नाही तर बाभळीची असो-कुडीला सारखीच!"

तिचें हें विलक्षण वाक्य आम्हां दोघांच्या अगदी जिव्हारीं लागलें. पण तिचें समाधान करायला मला तोंडच नव्हतें! म्हातारी पुढे बोलूं लागली, " कॉलेजांत असतांनाच मधूची सिनेमांत ओळख झाली बघ. मीं मनाशीं म्हटलं, आता वकिलींत नि मास्तरकींत काय उरलंय्? त्याला आवडतंय् तर जाऊं दे सिनेमांत! पण भारी वाईट धंदा आहे बाबा हा! वर्षांवर्षांत त्याला कधी रजा मिळत नाही; नि मुंबईत राहायला खर्च तरी काय थोडा येतो? शंभर रुपयांतले सारे पंधरा उरतात त्याचे! तेवढे बिचारा पाठवितो मला! पंधराशेसारखे आहेत हं ते मला! वर्तमानपत्रांत त्याचा फोटो छापून आला की बाळ तो मला आणून दाखवितो नि मग..."

तिनें उठून कोनाड्यांतून चार पांच कागदांचे तुकडे काढले. मधूच्या फोटोचीं कात्रणें होतीं तीं!

" बाळ कुठं दिसत नाही?" विषय बदलण्याकरितां मीं प्रश्न केला.

ती हसून म्हणाली, " आजोळीं गेलाय् तो. यंदा मॅट्रिकला बसलाय्. तो पास झाला नि मधूच्या दोन हातांचे चार हात झालेले पाहिले, की मी सुखानं डोळे मिटीन!"

ती आणखीसुद्धा बोलत राहिली असती; पण चुलीवर उकळूं लागलेल्या आधणानें तिला हाक मारली.

चहा घेतां घेतां सुनेत्राहि सिनेमांत आहे असें जेव्हा मीं तिला सांगितलें तेव्हा ती हसत तिला म्हणाली, " बायका आता विमानंसुद्धा चालवायला लागल्या, मग सिनेमाची ग काय कथा?"

आईला नमस्कार करून आम्ही दोघें बाहेर गाडींत येऊन बसलों तेव्हा मीं सुनेत्रेकडे पाहिलें. तिच्या गालांवर अश्रु ओघळत होते. पण डोळ्यांत

मूर्तिमंत राग उभा होता. पाऊस पडत असतांना वीजहि चमकत असावी आणि ती कुठे कोसळून पडेल म्हणून मनांत भय उत्पन्न व्हावें तसा मला तिच्याकडे पाहतांना भास झाला.

हॉटेलांत आम्ही परत आलों तों सुनेत्रेच्या नांवाचें एक पत्र मॅनेजरांनी दिलें. तिने तें उघडून वाचलें आणि माझ्याकडे फेकलें. पत्र छोटेंच होतें—

" प्रिय सुनेत्रा,

मी मुंबईलाच तुला भेटेन. मला आई आहे ही गोष्ट मीं तुझ्यापासून लपवून ठेवण्याचें कारण— कारण एकच होतें. माझें तुझ्यावरलें उत्कट प्रेम ! माझी जुन्या चालीची आई तुला आवडणार नाहीं, नि मीं तुझ्यासारख्या पतित कुळांतल्या मुलीशीं लग्न केलेलें तिला आवडणार नाहीं, म्हणूनच मीं ही गोष्ट चोरून ठेवली. प्रेमाला सर्व कांहीं क्षम्य असतें, नाहीं का ?

तुझा

—मधुकर "

या पत्राचें उत्तर सुनेत्रेनें लगेच लिहिलें नि तें मला दाखविलें—

" मधुकर,

बेळगांव किती सुंदर आहे हें आज तिथल्या मंडईत मला कळलें. तुमच्या आईचें मला तिथें दर्शन झालें. आईपेक्षा मोठें दैवत जगांत नाही असें म्हणतात. याचा पुन्हा एकदा आज अनुभव आला !

असल्या प्रेमळ आईला जो विसरूं शकतो, तो उद्या आपल्या पत्नीला विसरणार नाही कशावरून ? एक गोरीगोमटी दिसणारी मुलगी रागावेल म्हणून जिवंत आईला तुम्ही स्वर्गात पाठवून दिलेंत ! उद्या माझ्यापेक्षा अधिक सुंदर मुलगी तुम्हांला भेटली तर तुम्ही मलाहि असेंच मारून टाकाल ! त्यापेक्षा मीं आधींच मरणें चांगलें ! नाही का ? सुनेत्रा मेली असेंच यापुढें तुम्ही समजा.

तुम्हांला आपली आई अडाणी वाटली, मला आवडणार नाही असें वाटलें; पण खरें सांगूं ? त्यांच्या एका घटकेच्या सहवासांत त्यांनीं मला आपलेंसें केलें. एकहि पुस्तकी परीक्षा दिली नसली तरी आयुष्यांतल्या

आलें. तो स्वतःशींच हसत म्हणाला, मॅट्रिक होऊन तीन वर्षे झालीं आपल्याला. चार दिवस मोटार कारखान्यांत कारकून हो, चार दिवस डेअरींतले हिशेब ठेव आणि बाकीचे दिवस बेकारीच्या काळजींत काढ अशीं हीं वर्षें गेलीं. या जगांत काव्य एकदा पाठ करून चालत नाही. त्याची वारंवार उजळणी व्हावी लागते. पण आपण तर तीन वर्षें एकच गोष्ट घोकीत आलों आहों — नोकरी, कायमची नोकरी, निदान तात्पुरती नोकरी, कुठेहि— कसलीहि — पण पंचवीस रुपयांची कारकुनाची नोकरी—

पण नोकरी हा हल्लीं आकाशांतला चंद्र झाला आहे, हा अनुभव त्यालाहि येत होता. दांतांच्या कण्या करून, इकडल्या तिकडल्या चिठ्या-चपाट्या आणून नोकरी मिळविण्याची त्यानें खूप खटपट केली होती. पण ज्या ज्या आडांत त्यानें आपला पोहरा मोठ्या आशेनें सोडला होता, त्या त्या आडांत त्याला खडखडाटच ऐकूं आला होता. चुळकाभर तरी पाणी आपल्या पोहऱ्यांत येईल या वेड्या कल्पनेनें त्यानें अनेकदा तो आडांतल्या खडकावर जोरजोरानें आपटला होता. त्याचा परिणाम म्हणजे पोहरा आता पुरा पोचलून गेला होता.

त्याच्या मनाला एक एक पोचा पाडणारीं तीं वाक्यें—

' मॅट्रिक मनुष्यानं सुखानं जगण्याची धडपड करावी कशाला ? '

' तुला चार सोडून चाळीस भावंडें असलीं तर त्याला आम्ही काय करणार ? या बाबतींत तुझ्या आईबापांनीं काळजी घ्यायला हवी होती ! '

' माणूस होणं हें मोठं पाप आहे पोरा ! सुंदर घोडा झाला असतास तर चांदीच्या तोबऱ्यांतून चंदी खाल्ली असतीस ! कुलगी कुत्रं झाला असतास तर सिनेमानटीच्या जॉर्जेटच्या पातळावर लोळायला मिळालं असतं ! तूं माणूस झालास ही फार मोठी चूक केलीस. आणि गरिबींतून धडपडत मॅट्रिक झालास हा तर तुझा फारच मोठा गुन्हा झाला. या गुन्ह्याबद्दल ही शिक्षा—'

एका विक्षिप्त म्हाताऱ्याचें बोलणें होतें हें ! पण त्याचा शब्द नि शब्द अमनला राहून राहून आठवे.

त्याने समोर पाहिलें. सूर्यबिंब पार मावळून गेलें होतें. त्याला वाटलें—आपली जगण्याची इच्छाहि अशीच मावळून गेली आहे. आपण जगायचें कशासाठी ?

मूर्तिमंत राग उभा होता. पाऊस पडत असतांना वीजहि चमकत असावी आणि ती कुठे कोसळून पडेल म्हणून मनांत भय उत्पन्न व्हावें तसा मला तिच्याकडे पाहतांना भास झाला.

हॉटेलांत आम्ही परत आलों तों सुनेत्रेच्या नांवाचें एक पत्र मॅनेजरांनी दिलें. तिने तें उघडून वाचलें आणि माझ्याकडे फेकलें. पत्र छोटेंच होतें–

" प्रिय सुनेत्रा,

मी मुंबईलाच तुला भेटेन. मला आई आहे ही गोष्ट मीं तुझ्यापासून लपवून ठेवण्याचें कारण– कारण एकच होतें. माझें तुझ्यावरलें उत्कट प्रेम! माझी जुन्या चालीची आई तुला आवडणार नाहीं, नि मीं तुझ्यासारख्या पतित कुळांतल्या मुलीशीं लग्न केलेलें तिला आवडणार नाहीं, म्हणूनच मीं ही गोष्ट चोरून ठेवली. प्रेमाला सर्व कांहीं क्षम्य असतें, नाहीं का?

तुझा

—मधुकर"

या पत्राचें उत्तर सुनेत्रेनें लगेच लिहिलें नि तें मला दाखविलें—

" मधुकर,

बेळगांव किती सुंदर आहे हें आज तिथल्या मंडईत मला कळलें. तुमच्या आईचें मला तिथें दर्शन झालें. आईपेक्षा मोठें दैवत जगांत नाही असें म्हणतात. याचा पुन्हा एकदा आज अनुभव आला!

असल्या प्रेमळ आईला जो विसरूं शकतो, तो उद्या आपल्या पत्नीला विसरणार नाही कशावरून? एक गोरीगोमटी दिसणारी मुलगी रागावेल म्हणून जिवंत आईला तुम्ही स्वर्गांत पाठवून दिलेंत! उद्या माझ्यापेक्षा अधिक सुंदर मुलगी तुम्हांला भेटली तर तुम्ही मलाहि असेंच मारून टाकाल! त्यापेक्षा मीं आधींच मरणें चांगलें! नाही का? सुनेत्रा मेली असेंच यापुढें तुम्ही समजा.

तुम्हांला आपली आई अडाणी वाटली, मला आवडणार नाही असें वाटलें; पण खरें सांगूं? त्यांच्या एका घटकेच्या सहवासांत त्यांनीं मला आपलेंसें केलें. एकहि पुस्तकी परीक्षा दिली नसली तरी आयुष्यांतल्या

आलें. तो स्वतःशींच हसत म्हणाला, मॅट्रिक होऊन तीन वर्षें झालीं आपल्याला. चार दिवस मोटार कारखान्यांत कारकून हो. चार दिवस डेअरींतले हिशेब ठेव आणि बाकीचे दिवस बेकारीच्या काळजींत काढ अशीं हीं वर्षें गेलीं. या जगांत काव्य एकदा पाठ करून चालत नाही. त्याची वारंवार उजळणी व्हावी लागते. पण आपण तर तीन वर्षें एकच गोष्ट घोकीत आलों आहों—नोकरी, कायमची नोकरी, निदान तात्पुरती नोकरी, कुठेहि—कसलीहि—पण पंचवीस रुपयांची कारकुनाची नोकरी—

पण नोकरी हा हल्लीं आकाशांतला चंद्र झाला आहे, हा अनुभव त्यालाहि येत होता. दांतांच्या कण्या करून, इकडल्या तिकडल्या चिठ्या—चपाट्या आणून नोकरी मिळविण्याची त्यानें खूप खटपट केली होती. पण ज्या ज्या आडांत त्यानें आपला पोहरा मोठ्या आशेनें सोडला होता, त्या त्या आडांत त्याला खडखडाटच ऐकूं आला होता. चुळकाभर तरी पाणी आपल्या पोहऱ्यांत येईल या वेड्या कल्पनेनें त्यानें अनेकदा तो आडांतल्या खडकावर जोरजोरानें आपटला होता. त्याचा परिणाम म्हणजे पोहरा आता पुरा पोचलून गेला होता.

त्याच्या मनाला एक एक पोचा पाडणारीं तीं वाक्यें—

‘ मॅट्रिक मनुष्यानं सुखानं जगण्याची धडपड करावी कशाला ? ’

‘ तुला चार सोडून चाळीस भावंडें असलीं तर त्याला आम्ही काय करणार ? या बाबतींत तुझ्या आईबापांनीं काळजी घ्यायला हवी होती ! ’

‘ माणूस होणं हें मोठं पाप आहे पोरा ! सुंदर घोडा झाला असतास तर चांदीच्या तोबऱ्यांतून चंदी खाल्ली असतीस ! कुलंगी कुत्रं झाला असतास तर सिनेमानटीच्या जॉर्जेटच्या पातळावर लोळायला मिळालं असतं ! तूं माणूस झालास ही फार मोठी चूक केलीस. आणि गरिबींतून धडपडत मॅट्रिक झालास हा तर तुझा फारच मोठा गुन्हा झाला. या गुन्ह्याबद्दल ही शिक्षा—’

एका विक्षिप्त म्हाताऱ्याचें बोलणें होतें हें ! पण त्याचा शब्द नि शब्द वामनला राहून राहून आठवे.

त्याने समोर पाहिलें. सूर्यबिंब पार मावळून गेलें होतें. त्याला वाटलें—आपली जगण्याची इच्छाहि अशीच मावळून गेली आहे. आपण जगायचें कशासाठी ?

कुणासाठी ? कुणासाठी या प्रश्नाचें उत्तर म्हणून त्याच्यापुढे पांच केविलवाणे चेहरे उभे राहिले. नेहमी आजारी असणारी आई आणि एकापेक्षा एक लहान अशीं चार भावंडें !

गतवर्षी वामन दोन दिवस आईला भेटायला म्हणून गेला होता. तेव्हा ताईने त्याच्यापाशी फुलांच्या पातळाचा हट्ट धरला होता ! आणि वामनने कागदाच्या पन्नास होड्या करून दिल्या, तरी धाकटा बाबू रडतच राहिला होता. त्याला जमिनीवरून धावत जाणारी आगबोट हवी होती. ' पुढल्या वर्षी येईन तेव्हा तुझ्यासाठी आगबोट घेऊन येईन हं ! ' असें वामनने त्यावेळीं बाबूला आश्वासनहि दिलें होतें.

पण — या उभ्या वर्षांत स्वतःचें पोट भरतां भरतांच वामनच्या नाकीं नव आले होते. दर महिन्याला आईला पांच-दहा रुपये पाठवावयाचे ते दूरच राहिले. मध्यंतरीं तिच्याकडून एकदां पैसे मागविण्याची पाळी त्याच्यावर आली होती. शाळेंत असतांना 'काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते ' हा चरण गुणगुणत आयुष्यांत कांही तरी सत्कार्य करण्याचा त्याने अनेकदा निश्चय केला होता. पण अनुभवाने पोळलेलें त्याचें मन म्हणत होतें–' त्या सुभाषितांतला कावळा मोठा भाग्यवान् असला पाहिजे. त्याला दररोज पोटभर खायला तरी मिळत होतें. मला तेवढेंहि—'

घरट्यांकडे परत जात असलेल्या कावळ्यांचा वामनाला हेवा वाटला. त्याच्या मनांत आलें, या कावळ्यांनी कुठून ना कुठून आपल्या पिलांकरिता चारा आणला असेल. पण मी ? मला खेड्यांतल्या घरीं जायला — आईला नि धाकट्या भावंडांना तोंड दाखवायला शरम वाटते ! मला घरटें आहे. पण — त्याची विचारांची साखळी इथेच तुटली. त्याच्या खिशांतलें पत्र मध्येच ओरडलें, ' तुझं घरटं आता तुझं नाही ! तें—'

वामनने खिशांतून आईचें पत्र काढून तें पुन्हा वाचलें. दुपारीं डोळ्यांत पाणी आणून त्याने त्या पत्राचीं पारायणें केलीं होतीं. पण त्या पाण्याने त्यांतलें अवाक्षर सुद्धा पुसट झालें नव्हतें. दोनशें रुपयांचें पूर्वीचें कर्ज व त्याचें व्याज यांच्यापायीं वामनचें खेड्यांतलें घर आतां सावकाराच्या ताब्यांत जाणार होतें. कुणी तरी दुष्ट मनुष्याने घरटें मोडून त्यांतलीं पंख न फुटलेलीं पिलें

त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. एकदम उठावें आणि दूर दूर पळत जावें असें त्याला वाटलें पण लगेच त्यानें आपला आत्महत्येचा निश्चय कायम केला. तो मनांत म्हणत होता– आपली आई दुसऱ्याच्या घरीं मोलमजुरीचें काम करीत आहे हें डोळ्यांनीं पाहण्यापेक्षां ते कायमचे मिटलेले काय वाईट! आपल्याला भावाबहिणीचें शिक्षण करतां येणार नाहीं, त्यांना चांगला कपडा-लत्ता देतां येणार नाहीं, त्यांना स्वप्नांतसुद्धां सुग्रास अन्न मिळणार नाहीं! हें सारें पाहण्यापेक्षां एका क्षणांत या जगाचा निरोप घेतलेला काय वाईट?

स्थिर मनानें तो रुळांवर पडून राहिला. आपल्या शांतपणाचें त्याचें त्यालाच आश्चर्य वाटलें. मरणानंतर आपल्याला दिसणारें नवें जग कसें असेल या कल्पना-तरंगांत क्षणभर तो रमून गेला.

पण दुसऱ्याच क्षणीं त्याच्या अंगाचा थरकांप झाला. बावटा न पडल्या-मुळें असेल किंवा स्टेशन जवळ आल्यामुळें असेल, आगगाडीनें जी कर्ण-कर्कश शीट फुंकली तो ऐकतांच त्याचें हृदय धाडधाड उडूं लागलें. तो एकदम रुळांवरून उठून बाजूला उभा राहिला.

खाडखाड, धाडधाड करीत गाडी त्याच्या पुढून जाऊं लागली. तिसऱ्या वर्गाच्या साऱ्या डब्यांत विलक्षण गर्दी होती. किती तरी माणसें सामानावर बसलीं होतीं. एक बाई तान्हें मूल पोटाशीं धरून खिडकीजवळ अंग चोरून उभी असलेली त्याला दिसली,

तिसऱ्या वर्गाच्या डब्यांमागून दुसऱ्या वर्गाचे डबे आले. त्यांत एक भला मोठा मनुष्य चिरूट ओढीत बसला होता.

गाडी निघून गेली तरी वामन तसाच उभा होता. राहून राहून ती खिडकीपाशीं उभी असलेली बाई त्याला आठवूं लागली. एकसारखें उभें राहून तिचें अंग किती अवघडलें असेल! पण ती तो सारा त्रास आनंदानें सोशीत नव्हती का? मग आपणच—

वामनचे पाय गांवाकडे वळले. थोडें चालून गेल्यानंतर त्याला गांवा-बाहेरच्या एका बंगल्यांत मोठा लखलखाट दिसला. कसली तरी मेजवानी असावी आंत. रस्त्यावरून दिसणाऱ्या खिडकींतून वामननें पाहिलें. साहेबी पोषाक केलेले पुरुष, नटींप्रमाणें रंगलेल्या बायका—त्यानें दुसरीकडे पाहिलें.

कुणासाठी? कुणासाठी या प्रश्नाचें उत्तर म्हणून त्याच्यापुढे पांच केविलवाणे चेहरे उभे राहिले. नेहमी आजारी असणारी आई आणि एकापेक्षा एक लहान अशीं चार भावंडें!

गतवर्षी वामन दोन दिवस आईला भेटायला म्हणून गेला होता. तेव्हा ताईने त्याच्यापाशी फुलांच्या पातळाचा हट्ट धरला होता! आणि वामनने कागदाच्या पन्नास होड्या करून दिल्या, तरी धाकटा बाबू रडतच राहिला होता. त्याला जमिनीवरून धावत जाणारी आगबोट हवी होती. 'पुढल्या वर्षी येईन तेव्हा तुझ्यासाठी आगबोट घेऊन येईन ह!' असें वामनने त्यावेळीं बाबूला आश्वासनहि दिलें होतें.

पण—या उभ्या वर्षांत स्वतःचें पोट भरतां भरतांच वामनच्या नाकीं नव आले होते. दर महिन्याला आईला पांच-दहा रुपये पाठवावयाचे ते दूरच राहिले. मध्यंतरीं तिच्याकडून एकदां पैसे मागविण्याची पाळी त्याच्यावर आली होती. शाळेंत असतांना 'काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते' हा चरण गुणगुणत आयुष्यांत कांही तरी सत्कार्य करण्याचा त्याने अनेकदा निश्चय केला होता. पण अनुभवाने पोळलेलें त्याचें मन म्हणत होतें—'त्या सुभाषितांतला कावळा मोठा भाग्यवान् असला पाहिजे. त्याला दररोज पोटभर खायला तरी मिळत होतें. मला तेवढेंहि—'

घरट्यांकडे परत जात असलेल्या कावळ्यांचा वामनाला हेवा वाटला. त्याच्या मनांत आलें, या कावळ्यांनी कुठून ना कुठून आपल्या पिलांकरिता चारा आणला असेल. पण मी? मला खेड्यांतल्या घरीं जायला—आईला नि धाकट्या भावंडांना तोंड दाखवायला शरम वाटते! मला घरटें आहे. पण— त्याची विचारांची साखळी इथेच तुटली. त्याच्या खिशांतलें पत्र मध्येच ओरडलें, 'तुझं घरटं आता तुझं नाही! तें—'

वामनने खिशांतून आईचें पत्र काढून तें पुन्हा वाचलें. दुपारीं डोळ्यांत पाणी आणून त्याने त्या पत्राचीं पारायणें केलीं होतीं. पण त्या पाण्याने त्यांतलें अवाक्षर सुद्धा पुसट झालें नव्हतें. दोनशें रुपयांचें पूर्वीचें कर्ज व त्याचें व्याज यांच्यापायीं वामनचें खेड्यांतलें घर आतां सावकाराच्या ताब्यांत जाणार होतें. कुणी तरी दुष्ट मनुष्याने घरटें मोडून त्यांतलीं पंख न फुटलेलीं पिलें

त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. एकदम उठावें आणि दूर दूर पळत जावें असें त्याला वाटलें. पण लगेच त्यानें आपला आत्महत्येचा निश्चय कायम केला. तो मनांत म्हणत होता— आपली आई दुसऱ्याच्या घरीं मोलमजुरीचें काम करीत आहे हें डोळ्यांनीं पाहण्यापेक्षां ते कायमचें मिटलेले काय वाईट! आपल्याला भावाबहिणीचें शिक्षण करतां येणार नाहीं, त्यांना चांगला कपडा-लत्ता देतां येणार नाहीं, त्यांना स्वप्नांतसुद्धां सुग्रास अन्न मिळणार नाहीं! हें सारें पाहण्यापेक्षां एका क्षणांत या जगाचा निरोप घेतलेला काय वाईट!

स्थिर मनानें तो रुळांवर पडून राहिला. आपल्या शांतपणाचें त्याचें त्यालाच आश्चर्य वाटलें. मरणानंतर आपल्याला दिसणारें नवें जग कसें असेल या कल्पना-तरंगांत क्षणभर तो रमून गेला.

पण दुसऱ्याच क्षणीं त्याच्या अंगाचा थरकांप झाला. बावटा न पडल्या-मुळें असेल किंवा स्टेशन जवळ आल्यामुळें असेल, आगगाडीनें जी कर्ण-कर्कश शीट फुंकली ती ऐकतांच त्याचें हृदय धाडधाड उडूं लागलें. तो एकदम रुळांवरून उठून बाजूला उभा राहिला.

खाडखाड, धाडधाड करीत गाडी त्याच्या पुढून जाऊं लागली. तिसऱ्या वर्गाच्या साऱ्या डब्यांत विलक्षण गर्दी होती. किती तरी माणसें सामानावर बसलीं होतीं. एक बाई तान्हें मूल पोटाशीं धरून खिडकीजवळ अंग चोरून उभी असलेली त्याला दिसली,

तिसऱ्या वर्गाच्या डब्यांमागून दुसऱ्या वर्गाचे डबे आले. त्यांत एक भला मोठा मनुष्य चिरूट ओढीत बसला होता.

गाडी निघून गेली तरी वामन तसाच उभा होता. राहून राहून ती खिडकीपाशीं उभी असलेली बाई त्याला आठवूं लागली. एकसारखें उभें राहून तिचें अंग किती अवघडलें असेल! पण ती तो सारा त्रास आनंदानें सोशीत नव्हती का? मग आपणच—

वामनचे पाय गांवाकडे वळले. थोडें चालून गेल्यानंतर त्याला गांवा-बाहेरच्या एका बंगल्यांत मोठा लखलखाट दिसला. कसली तरी मेजवानी असावी आंत. रस्त्यावरून दिसणाऱ्या खिडकींतून वामननें पाहिलें. साहेबी पोषाक केलेले पुरुष, नटींप्रमाणें रंगलेल्या बायका—त्यानें दुसरीकडे पाहिलें.

कांटे चमच्यांच्या किणकिणाटांतच ग्रामोफोन सुरू झाला— 'माझा गुलाब अंगणिं फुलला ग ! '

वामन विमनस्कतेनें समोर पाहत होता. गिरणीच्या धुराड्यांतून बाहेर येणारा धूर, रातपाळी करणारे मजूर आपलें काम किती प्रामाणिकपणानें करीत आहेत हें दाखवीत होता. निव्वळ चैनी लोकांनीं भरलेल्या या बंगल्यापाशीं क्षणभरहि राहूं नये असें त्याला वाटलें.

तो भरभर चालू लागला. 'माझा गुलाब अंगणिं फुलला ग' या गाण्याचे सूर त्याला अस्पष्टपणें ऐकूं येतच होते. त्याच्या मनांत आलें— आपल्या अंगणांत गुलाब फुलविणाऱ्या या लोकांना त्यांचा तांबडा रंग कुणाच्या रक्ताचा असतो याची कल्पनासुद्धां येत नसेल !

गिरणीजवळच्या मजुरांच्या वस्तींतून वामन जाऊं लागला. मातीचीं छोटीं बैठीं घरें ! त्यांना अंगण कुठून असणार ! मग अंगणांत गुलाब फुलण्याची गोष्ट दूरच राहिली !

एका घरापुढें पांचदहा माणसें उकाड्यामुळें बाहेरच झोपलीं होतीं. त्यांचीं तीं चिंध्यावजा चिरगुटें पाहून, मघांच्या बंगल्यांतल्या एका तरुणीच्या जॉर्जेटच्या पातळाची वामनला आठवण झाली.

तो हळूहळू चालूं लागला. एका घरांत कुणी तरी भजन करीत आहे असें त्याला वाटलें. तो लक्ष लावून ऐकूं लागला. तुकोबाचा अभंग होता तो— 'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती ! चालविसी हातीं धरूनिया '

मघांशी ऐकलेली ती ओळ—'माझा गुलाब अंगणिं फुलला ग' आणि ही ओळ-'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनिया' —अगदीं भिन्न अशीं दोन जगें एकमेकांना बिलगून बसलीं आहेत असें वामनाला वाटलें.

पलीकडच्या एका खडकावर त्यानें अंग टेकलें. किती तरी वेळ तो विचार करीत होता. त्याला वाटूं लागलें. 'जीवन ही लढाई आहे' हें सुभाषित या निरक्षर लोकांनीं ऐकलें नसेल—पण त्याचें आचरण त्यांच्या हातून अखंड होत आहे. आणि आपण सुशिक्षित लोक मात्र ! सुभाषितें पाठ करायचीं

कोपऱ्यांत पडलेलीं सुकलेलीं फुलें ओरडलीं, "आल्या पावलीं मागं चला. नाहीं तर--काल आम्ही हसत होतों पण आज ! आंधळ्या भक्तीनंच आमचा घात-- "

" पुजारी, हें निर्माल्य अजून बाहेर फेकून कां दिलं नाहीं ? " मूर्तीच्या मुखांतून एकदम गंभीर उद्‌गार आले.

सभामंडपांतून बाहेर फेकलीं जाणारीं फुलें किंचाळलीं, "आम्ही निर्माल्य ! आणि तूं ? तूं दगड आहेस-शुद्ध दगड-हा देव कसला ? हा—"

पुढचे शब्द कुणालाच ऐकूं गेले नाहींत. पूजा सुरू झाली होती-गंभीर घंटानाद—भक्तिपूर्ण स्तोत्रपाठ—देवाधिदेवाच्या जयजयकारानें सारें वातावरण भरून गेलें.

पूजा संपली ! ताज्या फुलांच्या राशीवर राशी देवावर वाहिल्या गेल्या. त्या पुष्पराशींतलें प्रत्येक फूल हसत होतें.

आज आमच्या आयुष्याचें सार्थक झालें असेंच जणूं कांहीं तें हास्य म्हणत होतें.

देवहि हसत होता. भक्तीनें कुणाचें मन प्रसन्न होत नाहीं ?

कांटे चमच्यांच्या किणकिणाटांतच ग्रामोफोन सुरू झाला— ' माझा गुलाब अंगणिं फुलला ग ! '

वामन विमनस्कतेनें समोर पाहत होता. गिरणीच्या धुराड्यांतून बाहेर येणारा धूर, रातपाळी करणारे मजूर आपलें काम किती प्रामाणिकपणानें करीत आहेत हें दाखवीत होता. निव्वळ चैनी लोकांनीं भरलेल्या या बंगल्यापाशीं क्षणभरहि राहूं नये असें त्याला वाटलें.

तो भरभर चालू लागला. ' माझा गुलाब अंगणिं फुलला ग ' या गाण्याचे सूर त्याला अस्पष्टपणें ऐकूं येतच होते. त्याच्या मनांत आलें— आपल्या अंगणांत गुलाब फुलविणाऱ्या या लोकांना त्यांचा तांबडा रंग कुणाच्या रक्ताचा असतो याची कल्पनासुद्धां येत नसेल !

गिरणीजवळच्या मजुरांच्या वस्तींतून वामन जाऊं लागला. मातीचीं छोटीं बैठीं घरें ! त्यांना अंगण कुठून असणार ? मग अंगणांत गुलाब फुलण्याची गोष्ट दूरच राहिली !

एका घरापुढें पांचदहा माणसें उकाड्यामुळें बाहेरच झोपलीं होतीं. त्यांचीं तीं चिंध्यावजा चिरगुटें पाहून, मघांच्या बंगल्यांतल्या एका तरुणीच्या जॉर्जेटच्या पातळाची वामनला आठवण झाली.

तो हळूहळू चालूं लागला. एका घरांत कुणी तरी भजन करीत आहे असें त्याला वाटलें. तो लक्ष लावून ऐकूं लागला. तुकोबाचा अभंग होता तो— ' जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती ! चालविसी हातीं धरूनिया '

मघांशीं ऐकलेली ती ओळ—' माझा गुलाब अंगणिं फुलला ग ' आणि ही ओळ-'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनिया ' —अगदीं भिन्न अशीं दोन जगें एकमेकांना बिलगून बसलीं आहेत असें वामनाला वाटलें.

पलीकडच्या एका खडकावर त्यानें अंग टेकलें. किती तरी वेळ तो विचार करीत होता. त्याला वाटूं लागलें. 'जीवन ही लढाई आहे ' हें सुभाषित या निरक्षर लोकांनीं ऐकलें नसेल—पण त्याचें आचरण त्यांच्या हातून अखंड होत आहे. आणि आपण सुशिक्षित लोक मात्र ? सुभाषितें पाठ करायचीं

कोपऱ्यांत पडलेलीं सुकलेलीं फुलें ओरडलीं, "आल्या पावलीं मागं चला. नाहीं तर--काल आम्ही हसत होतों पण आज ? आंधळ्या भक्तीनंच आमचा घात-- "

" पुजारी, हें निर्माल्य अजून बाहेर फेकून कां दिलं नाहीं ? " मूर्तीच्या मुखांतून एकदम गंभीर उद्‌गार आले.

सभामंडपांतून बाहेर फेकलीं जाणारीं फुलें किंचाळलीं, " आम्ही निर्माल्य ! आणि तूं ? तूं दगड आहेस-शुद्ध दगड-हा देव कसला ? हा—"

पुढचे शब्द कुणालाच ऐकूं गेले नाहींत. पूजा सुरू झाली होती-गंभीर घंटानाद—भक्तिपूर्ण स्तोत्रपाठ—देवाधिदेवाच्या जयजयकारानें सारें वातावरण भरून गेलें.

पूजा संपली ! ताज्या फुलांच्या राशीवर राशी देवावर वाहिल्या गेल्या. त्या पुष्पराशींतलें प्रत्येक फूल हसत होतें.

आज आमच्या आयुष्याचें सार्थक झालें असेंच जणूं कांहीं तें हास्य म्हणत होतें.

देवहि हसत होता. भक्तीनें कुणाचें मन प्रसन्न होत नाहीं ?

---

# दुसरी बायको

अनिरुद्धाश्रमासमोर व्हिक्टोरियावाल्यानें गाडी उभी करून मागे पाहिलें; पण पंडितरावांना गाडीचें घोडें थांबल्याचा पत्ताच नव्हता!

आश्रमाच्या आसपास घुटमळणारा एक पाटीवाला धावत धावतच गाडी-पाशी आला. ट्रंक, होल्डऑल, असलें कांहींच ओझें व्हिक्टोरियावाल्यापाशी दिसेना. तेव्हां त्याची थोडी निराशा झाली. पण त्यानें पुढें होऊन प्रश्न केला, “ साहेब, ओझं आहे का ? ”

आता कुठे पंडितराव आपल्या तंद्रींतून जागे झाले. त्यांच्या मनांत आलें, हॉस्पिटलमध्यें बायकोला पोचवून येणाऱ्या मनुष्याच्या मनावर फार मोठें ओझें असतें, पण तें ज्याचें त्यालाच वाहून न्यावें लागतें. हें कांहीं मोल-मजुरीचें काम नाही !

गाडींतली स्वारी रेल्वेने आलेली नाही अशी खात्री होतांच हेलकरी हिरमुसल्या चेहऱ्याने निघून गेला. पंडितरावांनीं खाली उतरून खिशांतलें पाकीट काढलें नि त्याच्यांतले सहा आण्यांचे पैसे व्हिक्टोरियावाल्याच्या हातावर ठेवले. ते पाठ वळवून आश्रमांत शिरणार तोंच व्हिक्टोरियावाला ओरडला, “ साहेब, ही आणेली गुळगुळीत आहे ! ”

एरवीं पंडितरावांनी त्या आणेलीच्या बाबतींत व्हिक्टोरियावाल्याशीं घटकाभर हुजत घालायला कमी केलें नसतें. प्रसंगीं 'ही आणेली कांहीं मीं घरांत तयार केली नाही' म्हणून प्रचंड वादहि घातला असता, पण मघांशी हॉस्पिटलमध्ये त्यांचें नि डॉक्टरांचें जें संभाषण झालें होतें त्यामुळे 'आपलंच नाणं खोटं, तिथं दुसऱ्याला काय बोल लावायचा ?' हा भाव चेहऱ्यावर दर्शवीत त्यांनी ती गुळगुळीत आणेली मुकाट्याने परत घेतली आणि दुसरी आणेली त्या व्हिक्टोरियावाल्याच्या हातावर ठेवली.

बाहेरून आंत येतांच मॅनेजरांच्या टेबलाजवळ जायचें, खिशांतून विडी काढावयाची आणि तिचा धूर सोडीत सोडीत मॅनेजरांशीं चालू महायुद्धाच्या गोष्टी करायच्या हा पंडितरावांचा गेल्या चारपांच दिवसांचा क्रम होता.

पण आज त्यांच्या मनांत महायुद्धांपेक्षाहि मोठी धुमाळी माजली होती. हॉस्पिटलवरला मुख्य डॉक्टर मोठा फटकळ होता. आज पंडितरावांच्या बायकोला तपासून 'ॲडमिट' केल्यानंतर तो म्हणाला होता, "ही तुमची बायको आहे हें खरंच वाटलं नाही मला. तुमच्या वडील बहिणीसारखी दिसते अगदी ! अशींच आणखी पांच वर्षं गेलीं तर तुम्ही तिचे चिरंजीव शोभाल !"

डॉक्टरमजकुरांची फी कमी पडावी म्हणून पंडितरावांनी त्यांच्या मावसभावाच्या दत्तक मुलाच्या मेव्हण्याची चिठी आणून त्यांची खासगी ओळख करून घेतली होती. डॉक्टरांचें हें बोलणें ऐकल्यावर, 'ओळखीचा चोर जिवानिशी सोडीना !' या म्हणीचा पंडितरावांना आज पुरेपूर प्रत्यय आला.

त्यामुळें मॅनेजरांच्या टेबलाकडे न जातां ते सरळ वर्तमानपत्रांकडे वळले. त्यांचे डोळे चौकटींत अडकविलेल्या 'लोकमान्यांत'ल्या महायुद्धाच्या बातम्या पाहत होते. पण त्यांच्या कानांत डॉक्टरांचें एकच वाक्य घुमत होतें— 'अशींच आणखी पांच वर्षं गेलीं तर तुम्ही तिचे चिरंजीव शोभाल !'

मनांतल्या मनांत डॉक्टरवर दातओठ खात पंडितराव टाइम्समधली बातमी वाचीत होते. बॉम्बची वृष्टि होण्यापूर्वीचे आणि वर्षाव झाल्यानंतरचे असे वॉर्साचे दोन फोटो त्या बातमीच्या मागच्या पानावर छापले होते.

पंडितराव कवि नव्हते. उपमा कशाशीं खातात हेंहि त्यांना ठाऊक नव्हतें.

पण डॉक्टरांच्या उद्गारामुळे क्षुब्ध झालेल्या त्यांच्या मनापुढें स्वतःच्या बायकोचीं दोन चित्रें उभीं राहिलीं. पहिलें लग्नाच्या वेळचें व दुसरें आज हॉस्पिटलमध्यें अंथरुणावर पडल्या पडल्या तिने मानने त्यांना निरोप दिला त्या वेळचें! फुललेला गुलाब आणि पानें गळून पडलेला गुलाब यांच्याइतकें त्या दोन आकृतींत अंतर होतें.

पूर्वीचें वॉर्सा आणि आताचें वॉर्सा! आठ वर्षांपूर्वीची आपली पत्नी आणि आपली आजची पत्नी!

बॉम्बची वृष्टि!

—आणि आपला संसार!

पंडितरावांना वर्तमानपत्रांतल्या चित्रांकडे पाहवेना! ते तडक चालूं लागले.

मॅनेजरांना हें पाहून फारसें आश्चर्य वाटलें नाहीं! पंडितराव आज बायकोला इस्पितळांत ठेवण्याकरितां घेऊन गेले होते हें त्यांना ठाऊक होतें. ते शेजारीं बसलेल्या मनुष्याच्या कानांत कुजबुजले, "याला म्हणावं प्रेम! बायकोपुढं विडीची सुद्धा आठवण राहिली नाहीं गृहस्थाला!"

मुलांना आजोळीं ठेवून पत्नीला डॉक्टरांना दाखविण्याकरितां पंडितराव आले होते. सासुरवाडीहून आपल्या तीन पिलांच्या क्षेमसमाचाराचें पत्र आलें आहे की काय, हें पाहण्याकरिता त्यांनीं सर्व पत्रांवरून नजर फिरविली. पत्रांच्या बोर्डाजवळच आश्रमांत राहणाऱ्या लोकांच्या नांवाचा बोर्ड होता. पंडितरावांनीं सहज त्याच्याकडे पाहिलें. आपल्याजवळची रिकामी खोली भरलेली पाहून त्यांना आश्चर्य वाटलें.

त्यांनीं आपला चष्मा नीट करून आपल्या शेजारच्या खोलींत आलेल्या माणसांचीं नांवें वाचलीं— 'श्रीकांत घाटे,' 'सौ. वसुंधरा घाटे.'

श्रीकांत घाटे!

हें नांव आपण कुठे तरी ऐकलें आहे असें पंडितरावांना वाटूं लागलें.

त्यांनीं स्मरणशक्तीला खूप ताण देऊन पाहिला; पण परीक्षेच्या वेळीं एखादी गोष्ट जों जों अधिक आठवून पाहावी तों तों तिचा अधिक विसर पडतो. एकदोन मिनिटें त्यांची अशीच स्थिति झाली.

आणि मग अमेरिकेची जमीन दिसतांच कोलंबसाला जेवढा आनंद झाला असेल तेवढा त्यांना एकदम झाला.

त्यांची स्मरणशक्ति व्हेसुविअसप्रमाणें जागृत झाली होती.

त्यांना आठवूं लागलें—श्रीकांत घाट्याचें नि आपलें लग्न आठवर्षांपूर्वी एकाच मुहूर्तावर झालें. त्याची बायको ही आपल्या बायकोची लहानपणीची मैत्रीण ! त्या लग्नाला जायची आपल्या पत्नीची फार इच्छा होती. पण तिचें स्वतःचेंच लग्न असल्यामुळे ती पार पडूं शकली नाही. लग्नानंतर दोनतीन वर्षें ती या गोष्टीचा वारंवार उल्लेख करीत असे.

पुढें ती ही गोष्ट विसरूनहि गेली असती; पण श्रीकांत वकिली करतां करतांच एका चित्रपटमंडळीचा कथालेखक झाला. त्याचें पहिलें चित्र बरेंच गाजलें. त्या वेळीं त्याचा फोटो अनेक वर्तमानपत्रांत छापून आला. फोटोखाली दिलेल्या माहितींत श्रीकातांची प्रेमळ पत्नी वसुंधराबाई यांचाहि उल्लेख होता.

तो मजकूर वाचून पंडितरावांची पत्नी फार अस्वस्थ झाली. वर्तमानपत्रांत आपलें नांव कधीच येणार नाही, आपला नवरा सावकार असला तरी त्याचा फोटो कुणीच छापणार नाही—इत्यादिं इत्यादि गोष्टी तिच्या मनाला लागल्या असाव्यात !

तिच्या मनाच्या या जखमेवर खपली धरली. एवढेंच नव्हे तर ती वाळून निखळून पडली, अशी पंडितरावांची कालांतरानें खात्री झाली.

पण गतवर्षीं मुंबईतल्या वर्तमानपत्रांत श्रीकांताच्या चवथ्या चित्रपटाच्या जाहिराती फडकत असतांना एक टूरींग टॉकी पंडितरावांच्या खेड्यांत येऊन दाखल झाली. तिच्याजवळ श्रीकांताचें पहिलें चित्र होतें. तें चित्र पाहणें म्हणजे ठिकठिकाणी भोकें पडलेलें धोतर नेसण्यासारखेंच होतें. पण चित्रपट ही त्या खेड्यांतली नवी नवलाई असल्यामुळें तें चित्र फार लोकप्रिय झालें.

चित्र पाहून आल्यावर पडितरावांच्या पत्नीला आपल्या मैत्रिणीची इतकी आठवण येऊं लागली, की शेवटीं तिनें तिला एक पत्र लिहिलें. त्या पत्राच्या उत्तरांत वसुंधराहि घरीं स्वयंपाक करते, तिलाहि आपल्यासारखीं तीन मुलें आहेत, इत्यादि गोष्टी जेव्हा पंडितरावांच्या पत्नीला वाचायला मिळाल्या तेव्हा कुठे तिच्या मनाची तगमग थांबली.

हा सारा इतिहास डोळयांपुढे उभा राहातांच पंडितराव मोठ्या उत्सुकतेने मॅनेजरच्या टेबलापाशी गेले. नेहमीप्रमाणे ते विडी ओढण्याकरिता आले आहेत असें वाटून मॅनेजरांनी काडयांची पेटी त्यांच्यापुढे केली; पण तिला हातसुद्धा न लावतां पंडितरावांनी विचारलें, "हे श्रीकांत घाटे म्हणजे सिनेमाच्या गोष्टी लिहितात ते का?"

मॅनेजर खो खो हसत म्हणाले,

"ते कशाला आमच्याकडे उतरतात? अहो, टॅक्सी करणारी मंडळी व्हिक्टोरियांत कशाला बसतील? हा दुसराच कुणी तरी घाटे आहे. सिनेमांतला मनुष्य असता तर ताजमहालांत उतरला असता! आमच्या या गरीब आश्रमांत कशाला आला असता?"

मॅनेजरच्या या सरबत्तीने पंडितराव सर्दच झाले. त्यांचें एक मन म्हणत होतें—श्रीकांत घाट्यासारखा प्रसिद्ध मनुष्य या एका बाजूला असलेल्या सामान्य आश्रमांत कशाला उतरायला येईल?

दुसरें मन म्हणत होतें—श्रीकांत घाटे या नांवाचा दुसरा मनुष्य असू शकेल; पण या दुसऱ्या श्रीकांताच्या बायकोचें नांव वसुंधराच असावें हें... छे! अगदी अशक्य आहे हें!

हा श्रीकांत घाटे आपल्या बायकोच्या मैत्रिणीचा नवराच असला पाहिजे अशी खात्री होऊन पंडितरावांनी मॅनेजरला पृच्छा केली, "तीन मुलं आहेत ना त्यांच्याबरोबर?"

"तीन?" असा प्रश्न करून मॅनेजर पुन्हा हसूं लागले.

पंडितरावांच्या मनांत आले, आपला आंकडा चुकला असावा. त्या वसुंधरेचें आपल्या बायकोला पत्र आल्याला वर्ष होऊन गेलें. एवढ्या अवधींत तिला आणखी एक मूल व्हायला कांहीच हरकत नाही. मॅनेजरांच्या हसण्याला आलेली उकळी आतां शांत झाली होती! ते पंडितरावांना म्हणाले, "मुलें काही आभाळांतून पडत नाहीत!"

"म्हणजे!"

मॅनेजर खालच्या आवाजांत उद्गारले, "हनीमूनकरिता हें जोडपं मुंबईला आलंय्!"

" हनीमून ? "

आतां मात्र पंडितरावांना माघार घेणें प्राप्तच होतें. लग्न झाल्यावर आठ वर्षांनी हनीमून ! तीन मुलांची आई हनीमून कसला कपाळाचा करणार ! आपली बायको त्या श्रीकांताच्या बायकोच्याच वयाची ! ती तर आज दवाखान्यांत आहे. तिला पाहून डॉक्टर आपल्याला म्हणाले—

डॉक्टरांच्या त्या क्रूर थट्टेची आठवण असह्य झाल्यामुळें पंडितरावांनी मॅनेजरला प्रश्न केला, " हे जोडपं हनीमूनकरिता आलंय् म्हणून कुणी सांगितलं ? "

" अहो, ती पोरगी भिंगरीसारखी नाचत होती तेव्हा मीं सहज विचारलं ' इतका आनंद कसला झालाय् ? ' तिनं उत्तर दिलं, ' लग्नाचा ! ' लगेच तिच्याकडे पाहत नवरा म्हणाला, ' हनीमूनसाठीं मुंबईला आलोंय् आम्ही !"

निरुत्तर होऊन पंडितराव जिना चढूं लागले.

* * *

ते श्रीकांताच्या खोलीपाशी आले तेव्हा दारांत पाठमोरा उभा असलेला एक पुरुष त्यांना दिसला. श्रीकांताचा पूर्वी पाहिलेला फोटो त्यांच्या डोळ्यां-पुढें उभा राहिला. मनांत आलेली शंका दूर करून घ्यायची हीच संधी होती ! ते एकदम इतक्या जोराने खोकूं लागले, की दारांत उभा असलेला मनुष्य डॉक्टर असता तर धावत येऊन त्याने त्यांच्या छातीवर स्टेथॉस्कोपच लावला असता.

डॉक्टर नसल्यामुळें तो धावत आला नाही; पण त्याने वळून एवढी मोठी खोकल्याची उबळ कुणाला आली आहे हें पाहिलें.

पंडितरावांना वाटलें, आपण जिंकलें. श्रीकांत घाट्याच्या फोटोशीं दारां-तल्या मनुष्याचें बरेंच साम्य होतें.

खोलींत गेल्यावर पंडितरावांना खोकला मुळीच आला नाही. मात्र भिंतीला कान लावूनहि त्यांना पोरांची किलबिल, किरकिर कांहीं म्हटल्या कांहीं ऐकूं येईना !

मधली भिंत वर छपराला भिडलेली नव्हती. त्यामुळे थोड्या वेळाने पली-कडून संवाद ऐकूं येऊं लागला, " अजून भूक लागली नाही वाटतं ? "

" अं हं ! "

" घड्याळांत बारा वाजलेत ! "

" दिवसाचे की रात्रीचे ? "

" आज असं झालंय् तरी काय ? "

" कांही नाही ! आपलं दोघांचं लग्न ! "

" लग्न झाल्यानतर जेवावं लागतं हं ! "

" हो. पण तें एका ताटांत—एकमेकांचं उष्टं– "

पंडितराव मनांत म्हणाले, " हा श्रीकांत सिनेमांत जाऊन चांगलाच पागल झालेला दिसतो! नि लग्नाविषयी तो जें बोलला त्याचा अर्थ काय ?"

* * *

वाईट गोष्टी ऐकण्यापेक्षां पाहणें अधिक कठीण असतें !

पण एका तासाने हा पागलपणा पाहण्याचा प्रसंगहि पंडितरावांवर ओढवला.

ते फर्स्ट क्लासांत जेवायला गेले तों मधल्या लाकडी पार्टीशनच्या पलीकडे हसणें-खिदळणें चाललें होतें. कुजबुज, गुलगुल गोष्टी आणि एकदम हास्याचा स्फोट !

हनीमूनवाले जेवायला बसले आहेत हे पंडितरावांनीं ताडलें. ते पार्टिशनच्या टोकाशींच बसले. थोडे वाकून, वळून पाहिलें कीं पडद्याआड काय चाललंय् हें दिसायला हरकत नव्हती !

आज पंडितरावांचें जेवणावर लक्ष नाही हें वाढप्याच्या सुद्धां लक्षांत आलें. त्यानें सहानुभूतीने विचारलें,

" दवाखान्यांत सारं ठीक आहेना ? "

" दवाखाना ! " तो काय विचारत आहे हेंच पंडितरावांना प्रथम कळेना. मग एकदम ते हसून म्हणाले, " हो, हो, हो! सारं ठीक आहे!"

वाढपी निघून जातांच त्यांनी हळूच डोकावून पाहिलें—अरे बापरे!

तो श्रीकांत त्या बाईच्या पानांतलें उष्टें भजें आपल्या तोंडांत कोंबीत होता ! आणि ती पोरटी—तिनें तर अगदीच ताळतंत्र सोडलेला दिसला. त्याच्या पानांतली पुरीच उचलली तिने !

ही बेफाम बाई आपल्या बायकोची लहानपणाचीच काय, पण पूर्वजन्मीची सुद्धा मैत्रीण असणें शक्य नाही अशी कल्पना पंडितरावांच्या मनांत येऊन गेली.

* * *

पांच मिनिटांनी या बाबतींत त्यांची पुरी खात्री झाली.

तें जोडपें आंचवावयाला गेल्यावर पंडितरावहि पानावरून उठले. त्यांनी दुरून बाईचें अगदी सूक्ष्म निरीक्षण केलें. गोल पातळ, उघडे दंड, पाठीवरचा शेपटा, हातावरलें रिस्टवॉच, हात धुतांना मध्येच श्रीकांतवर उडविलेलें पाणी—सिनेमाखेरीज असें दृश्य पंडितरावांनी कुठेच पाहिलें नव्हतें ! आणि बाईहि अगदी विशीच्या आंतबाहेर असलेली दिसत होती. तीन मुलें असलेली बाई म्हणजे--पंडितरावांना इस्पितळांत असलेल्या आपल्या पत्नीची आठवण झाली.

पंडितरावांच्या अंगावरून तें जोडपें निघून गेलें. पंडितराव हात धूत असतांना दोन पायजमेवाले तरुण जेवून बाहेर आले. अगदी पैज मारण्यापर्यंत त्यांचें बोलणें रंगलें होतें.

" बॅांबे टॉकीजमध्यें होती ही पूर्वी ! काय बरं नांव हिचं—" पहिला म्हणाला.

" कांही तरीच काय बडबडयतोस ! ही या श्रीकांत घाट्याची बायको आहे ! पैज लाव हवी तर ! मी मघाशीच बोर्डावर नांवं वाचलीं आहेत!"

पहिला हात धुतां धुतां म्हणाला, " अरे बाबा, नांवांत काय आहे ! तीं सोयीप्रमाणं बदलतां येतात ! एका खोलींत राहायचं तर बरोबरच्या बाईला बायको म्हटलंच पाहिजे ! "

आता कुठे पंडितरावांच्या डोक्यांत थोडाथोडा प्रकाश पडूं लागला--हा श्रीकांत खरा असला तरी वसुंधरा खोटी आहे ! हा लुच्चा लेखक कुठल्या तरी नटीशीं संधान बांधून तिच्याबरोबर चार दिवस मौज मारण्याकरिता मुंबईला आला असावा ! नेहमीच्या ठिकाणीं उतरले तर कुणी तरी ओळखीचीं माणसें भेटतील या भीतीने त्याने या आश्रमाचा आश्रय केला असावा ! आणि कुणाला संशय येऊं नये म्हणून, त्या नटीला आपली बायको बनवायलाहि स्वारीने कमी केलं नाही. त्याला वाटलें असेल, येथे आपल्या बायकोला ओळखणारे कोण असणार ! पण म्हणावें...

आपल्या खोलीचें कुलूप काढतां काढतां श्रीकांताच्या खोलीकडे वळून पाहत पंडितराव स्वतःशींच उद्गारले, " बच्चाजी, याद राखून ठेवा ! माणसाला नसली तरी देवाला नीतीची चाड आहे ! तुमचं हें बेंड लवकरच बाहेर फुटेल ! "

एरवीं, जेवल्यावर पंडितराव तासभर डाराडूर झोपत; पण आज कांही केल्या त्यांचा डोळ्याला डोळा लागेना. दोन चिमण्यांचा चिवचिवाट चालावा तस पलीकडल्या खोलींतले बोलणें त्यांना वाटत होतें. ते लक्ष देऊन ऐकूं लागले. पलीकडच्या खोलींत संततिनियमनाची चर्चा चालली होती. " लाज वाटण्यासारखं काय आहे त्यांत ? " हे त्या बाईचे उद्गार ऐकून तर पंडितरावांच्या अंगावर कांटाच उभा राहिला.

पलीकडच्या खोलींत श्रीकांताबरोबर बसलेली बाई त्याची बायको नसून तिचा हक्क बळकवणारी एक कवटाळीण आहे अशी आता पंडितरावांची खात्री झाली.

तिसऱ्या प्रहरीं चहाच्या वेळेला ते खोलीबाहेर आले. पलीकडच्या खोलीच्या दारांत ती सिनेमा नटी उभी होती. पंडितरावांनी तिला नमस्कार करून विचारले, " पंडितराव यल्लापूरकरांची बायको ठाऊक आहे का आपल्याला?"

ती पंडितरावांच्याकडे पाहूं लागली. इतक्यांत श्रीकांत धावत धावतच वर आला आणि त्या बाईचे दोन्ही खांदे हालवीत म्हणाला, " अजून तूं पातळसुद्धां बदललं नाहीस ? खाली टॅक्सी उभी आहे ! चल, सिनेमांत शूटींगचा एक तास फुकट गेला तर शंभर रुपये बुडतात हें ठाऊक आहे ना ? माणसाचं आयुष्यहि तसंच आहे ! "

श्रीकांत आणि ती नटी आंत गेली, दार बंद झालें; पण पंडितराव आ वासून त्या बंद दाराकडे पाहात किती तरी वेळ उभे होते !

* * *

संध्याकाळीं बायकोच्या समाचाराला हॉस्पिटलमध्यें पंडितराव गेले तेव्हा त्यांनी गेल्या सहा तासांत डोळ्यांनी पाहिलेल्या आणि कानांनी ऐकलेल्या सर्व गोष्टी तिला सांगितल्या. ती माउली गडबडून गेली. आधीच आजारी त्यांत एका बालमैत्रिणीचा नवरा दुसऱ्या बाईच्या नादाला लागला आहे या बातमीची भर ! ती अगदी अस्वस्थ झाली.

साप, चोर, भुते इत्यादिकांप्रमाणें व्यभिचाराच्या गोष्टींविषयीहि मनुष्याच्या मनाला एक विकृत आसक्ति असते की काय कुणाला ठाऊक! घटकाभर नवराबायको दुसरें कांहीच बोलत नव्हती. या बोलण्यांत खेड्यांतल्या शेतकऱ्यापासून तो शहरांतल्या मोठमोठ्या लोकांपर्यंत अनेकांच्या चरित्रांची उजळणी झाली. पण आपल्या मैत्रिणीच्या संसाराची माती करणाऱ्या या नटीचें उच्चाटण कसें करायचें हें कोडें कांही पंडितरावांच्या पत्नीला सुटलें नाही.

शेवटीं पतिराजांनीच तोड काढली. वसुंधरेच्या बापाला आत्ताच्या आत्ता अगदी जरूरीची तार करून तिच्यांत या संकटाची सूचना द्यावी. तो पुण्यालाच राहत असल्यामुळे उद्या दुपारपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागायला कांहींच हरकत नाही.

तार-मास्तरच्या हातांत पैसे ठेवतांना पंडितराव मनांत म्हणत होते, "नीतीचं रक्षण करण्याकरितां माणसानं एवढी झीज सोसलीच पाहिजे!"

* * *

दुसरे दिवशीं सकाळीं पंडितराव दवाखान्याकडे जायला निघाले तरी शेजारच्या खोलींतल्या दांपत्याचा पत्ता नव्हता. मॅनेजरला त्यांनीं विचारलें तेव्हा ते म्हणाले, "अहो, हनीमून आहे हा! आमचं काय डिपॉझिट तर कुठं कांहीं पळून जात नाही?"

पंडितराव हॉस्पिटलमधून परतले तेव्हा अकरा वाजायला आले होते.

एका कोपऱ्यावर इराण्याच्या हॉटेलबाहेर एक वर्तमानपत्रें विकणारा मुलगा उभा होता. कुठल्या तरी नवीन मासिकाचा पोस्टर त्याने हातांत धरला होता. त्या पोस्टरकडे नजर जातांच पंडितराव थबकले. त्यांनीं पुनः पुन्हा वाचून पाहिलें—"सुप्रसिद्ध लेखक श्रीकांत घाटे यांची मुलाखत."

पंडितरावांनी चार आणे देऊन अंक विकत घेतला. रस्त्यानें चालतां चालतां मुलाखतीचें पान त्यांनी उघडून पाहिलें. श्रीकांताचा फोटो! असल्या प्रसिद्ध मनुष्याने आपल्या बायकोला फसवावें! छे! काल आपण या गृहस्थाच्या सासऱ्याला तार केली हें फार चांगलें झालें' असें मनांत म्हणत त्यांनी आश्रम गाठला.

ते आंत आले तों पोक्त वयाचा एक गृहस्थ रागारागाने मॅनेजरशीं कांहीं तरी बोलत होता!

पंडितराव दिसतांच मॅनेजर त्यांच्याकडे बोट दाखवीत म्हणाले, "हेच पंडितराव यल्लापूरकर!"

हातांतल्या तारेचा कागद पुढे करीत त्या प्रौढ गृहस्थाने प्रश्न केला, "या तारेंत तुम्हीं लिहिलेला मजकूर खरा आहे?"

"हो!" म्हणून पंडितराव धावतच वर जाऊं लागले. त्यांच्यामागून श्रीकांताचे सासरे आणि मॅनेजर जिना चढूं लागले.

श्रीकांताचें दार पंडितरावांनी दोनतीनदां ठोठावलें तरी तें कुणीच उघडीना! पंडितराव मनांत म्हणाले, "चोर दार कशाला उघडतील?"

श्रीकांताच्या सासऱ्याने हातांतल्या काठीने दरवाजा ठोठावून "श्रीकांत, श्रीकांत" म्हणून मोठ्याने हाका मारल्या. तेव्हा आंतून 'अगबाई' एवढा उद्गार ऐकूं आला. तो त्या रंगेल नटीचा आहे हें पंडितरावांनी ओळखलें. तिच्या उद्गारावरून ती भ्याली आहे हें उघड होतें.

तिने दार उघडतांच सर्वांनी आंत डोकावून पाहिलें-श्रीकांत झोपला होता.

"ती नटी कुठं आहे?" त्या पोक्त गृहस्थांनीं रागाने प्रश्न केला. पंडितरावांनी विजयी मुद्रेने बोट दाखवितांच त्यांच्या रागाचें रूपांतर हसण्यांत झाले. ते कसेबसे उद्गारले, "अहो, ही माझी मुलगी वसुंधरा!"

पंडितराव जे धावत सुटले ते थेट आश्रमाबाहेर आले. कोपऱ्यावरल्या इराण्याच्या दुकानापर्यंत आल्यावर त्यांनी मागे वळून पाहिलें. कुणीहि त्यांचा पाठलाग करीत नव्हते.

इराण्याच्या दुकानांतला चहा पोटांत गेल्यावर त्यांचें मन जरा स्थिर झालें. हातांतला अंक उघडून ते श्रीकांताची मुलाखत मधूनच वाचूं लागले.

मुलाखत घेणाऱ्याने संततिनियमनाबद्दल एक प्रश्न विचारला होता. त्याचें श्रीकांताने उत्तर दिलें होतें- "आजच्या परिस्थितींत संततिनियमनाची आवश्यकता मी मान्य करतो. पण दोन-तीन मुलं झाल्याखेरीज सामान्य माणसांनी या मार्गाचा आश्रय करावा असें मला वाटत नाही. शृंगारा-इतकाच वात्सल्यांतहि जीवनरस आहे. सामान्य मनुष्याच्या शक्तीचा

आणि भावनांचा विकास वात्सल्यामुळेच होऊं शकतो. ”

त्याच्या पुढलाच प्रश्न– ‘ तुम्ही अजून एखाद्या कॉलेजांत जाणाऱ्या मुलासारखे कसे दिसता ? ’ हा होता. श्रीकांत उत्तरादाखल म्हणत होता—

“ माझी तर गोष्ट सोडाच, पण तीन मुलं झालीं असून माझी पत्नीसुद्धां कॉलेजांत जाणाऱ्या मुलीसारखी दिसते. शहरांत राहणाऱ्या मनुष्यानं वर्षांतून एखादा महिना खेडगावांत घालविला तर त्याची प्रकृति सुधारते ना ? तोच नियम मनालाहि लागू आहे. संसारांत पडलं की कामं संपत नाहीत आणि काळज्या कमी होत नाहीत. त्यामुळं माणसं अकालीं प्रौढ होतात; पण माणसाचं मन नेहमी तरुण राहिलं पाहिजे. तेवढ्यासाठी मी आणि माझी पत्नी वर्षांतून आठपंधरा दिवस दहा वर्षांनी लहान होण्याचा प्रयत्न करतो. मुलं मावशीच्या स्वाधीन करून आम्ही कुठं तरी दूर जातो. कुणी ओळखीचं भेटणार नाही अशा ठिकाणीं राहतो. नि फुलपाखरांप्रमाणं स्वच्छंदानं भटकतों. आमचा हनीमून नुकताच सुरू झाला आहे असं त्या वेळीं आम्हांला वाटतं ! या आठ पंधरा दिवसांत माझी पत्नी गृहिणी असत नाही, तर ती रमणी होते. तिच्याकडे पाहतांना क्षणभर मलासुद्धा असंच वाटतं की ही कुणी तरी दुसरीच बायको आहे !

पंडितरावांनी मासिक मिटून घशाला ओलावा आणण्याकरिता पुन्हा चहा मागवला.

# पांगळ्याचें दुःख !

कंपार्टमेंटमधल्या खिडकींतून मागें डोकावून पाहत हंसऱ्या मुद्रेच्या गंगाधर-शास्त्र्यांनीं किंचित् मान हलवून विनायकरावांचा निरोप घेतला. मोटार लगेच कोपऱ्यावरून वळून दृष्टीआड झाली.

फार दिवसांनीं भेटलेल्या बालमित्राला निरोप देतांना आपलें मन थोडेसें अस्वस्थ होईल, असें धरून निघतांना विनायकरावांना वाटलें होतें. पण त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला तो निराळाच !

त्यांचें मन अस्वस्थ झालें होतें खरें ! पण त्याचें कारण बालमित्राचा विरह हें नव्हतें. तर—कुणालाहि हंसू येईल असेंच कारण होतें तें. मात्र त्यानें विनायकरावांच्या मनाला बेचैन करून सोडलें होतें हें कांहीं खोटें नाहीं ! फोडलेलीं लाकडें भरतांना वेड्यावाकड्या ढलप्या हाताला बोचूं नयेत, पण शेवटीं एखादें लहानसें कुसळ बोटांत शिरून त्यानें मात्र माणसाला दुसरें कांहीं सुचूं देऊं नये, तशी विनायकरावांची स्थिति झाली होती --मनीकरतां गंगावन न्यायचें आहे अशी आल्या घटकेपासून घोकणी करणाऱ्या गंगाधर-शास्त्र्यांनीं शेवटीं चारदोन आण्यांकडे पाहून एक राठ केसांचें गंगावन विकत घ्यावें ही केवढी आश्चर्याची गोष्ट होती ! दुकानदारानें त्यांना मुद्दाम दाख-

विलेलें तें मऊ मऊ केसांचें गंगावन--विनायकरावांच्या हाताला कालच्या त्या मृदु स्पर्शाच्या स्मृतीनें गुदगुल्या झाल्या. जाईजुईचीं फुलें हातांत घ्यावींत तसें त्या गंगावनावरून हात फिरवितांना काल सायंकाळी त्याना वाटलें होतें. पण गंगाधरशास्त्र्यांनींच तें नापसंत केलें! त्याला चारच आणे जास्ती पडत होते. तशीच घासाघीस केली असती तर एखादा आणा कमीसुद्धां केला असता दुकानदारानें! पण तें गंगावन हातांत घेऊन गंगाधरानें त्याच्यावर हात फिरविला न फिरविला तोंच विचित्र मुद्रा करून त्यानें तें दुकानदाराला परत दिलें.

चार आण्यांची काटकसर करण्यासाठीं हें केलें असेल ?

छेः!

आत्याबाईच्या अस्थि कृष्णेंत टाकण्याकरितां तो मुद्दाम नरसोबाच्या वाडीला आला हें काय चिकूपणाचें लक्षण ?

येतांना आपला बालमित्र विनायक कोल्हापुरांत आहे हें लक्षांत ठेवून तो सोले आणि काजूगर घेऊन आला! कद्रू मनुष्य कधीं तरी असें अगत्य दाखवील का ?

काल महाद्वारापाशीं गंगावनाबरोबर त्यानें पेढेहि विकत घेतले. शेरभर पेढे घेतल्यावर त्याला बहिणीच्या मुलांची आठवण झाली आणि त्यानें पुन्हा अर्धा शेर पेढे घेतले! तिमाजी नाइकाचा चेला असलें औदार्य कधींच दाखविणार नाहीं!

आणि मघांशी घरांतून निरोप घेऊन निघतांना आपण नको नको म्हणत असतांना त्यानें बाळाच्या हातांत रुपया ठेवला! असला मनुष्य चार आण्यांची बचत करण्यासाठीं चांगलें गंगावन टाकून मुद्दाम वाईट विकत घेईल? 'तूं पोस्टमास्तर नि मी भिक्षुक हें अंतर इथं घरांत नाहीं! मीं बाळाचा काका आहे' असे हसत हसत त्याने तो रुपाया दिला होता. एवढा प्रेमळ मनुष्य आपल्या मुलीच्या बाबतींत चार आण्यांची काटकसर करील ?

छे! अगदीं असंभाव्य वाटतें हें!

मग काल गंगाधरानें तें वाईट गंगावन का घेतलें हें कोडें—

विचार करीत करीत विनायकराव पोस्टापर्यंत येऊन पोचले होते. मेल

नुकतीच येऊन पडली होती. त्यांना वाटलें आपल्यापुढें पडलेल्या या पार्सलांत काय काय भरलें आहे हें जसें बाहेरून कळणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें माणसाच्या मनांतहि काय काय भरलेलें असतें हें त्याच्या बायकोला—मित्राला— कुणालाहि कळणें शक्य नाहीं.

*　　　*　　　*

खट्—खट्—खट्

भराभर पत्रांच्या तिकिटांवर शिक्के बसत होते. क्रिकेटच्या सामन्यांत खेळाडूनें एक चेंडू या तर दुसरा त्या बाजूला टोलवावा, त्याप्रमाणें पत्रांचें वर्गीकरण करणारा शिपाई निरनिराळ्या दिशांत भराभर पत्रें फेकीत होता.

शिक्का मारणारानें मधेंच एका पत्राचें हातावर वजन करून पाहिल्यासारखें केलें व वजनाच्या मानानें त्याला कमी तिकीट लागलें आहे असें वाटल्यामुळें तें विनायकरावांच्याकडे दिलें. त्या पत्रावरच्या अक्षराकडे लक्ष जातांच विनायकराव हातांतल्या पत्राचें वजन करायची गोष्ट अजीबात विसरून गेले.

तें अक्षर उघड उघड स्त्रीचें दिसत होतें.

याच अक्षराचीं पत्रें दर आठवड्याला याच पत्त्यावर नियमानें येतात याची त्यांना आठवण झाली.

पाकिटावरचा तो पत्ता कांहीं विनायकरावांना अपरिचित नव्हता -त्यांच्या बायकोचा मामेभाऊ का आतेभाऊ लागत होता तो गृहस्थ. चांगला कुटुंबवत्सल मनुष्य ! त्याला ही कोण बाई दर आठवड्याला पत्रें पाठविते ? या जाडजूड पत्रांत काय असतें !

पत्राला चुकून अर्ध्या आण्याचें तिकीट कमी लागलें होतें. विनायकरावांच्या मनांत आलें—आयतें पत्र आपल्या हातांत आलें आहे. फोडून आंत काय आहे तें पाहिलें तर आपल्या बायकोच्या मामेभावजयीवर फार फार उपकार केल्यासारखे होतील !

शिपायानें त्यांच्याकडे पाहतांच 'नॉट्पेड, एक आणा' एवढे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

*　　　*　　　*

रात्रीं अंथरुणावर अंग टाकीपर्यंत राहून राहून त्यांना दोन गोष्टीची आठ-

वण होत होती—पहिली त्यांच्या मामेमेव्हण्याच्या का आतेमेव्हण्याच्या नांवानें आलेलें स्त्रीच्या हस्ताक्षराचें पत्र; आणि दुसरी गंगाधरशास्त्र्यांनीं विकत घेतलेलें तें वाईट गंगावन !

त्यांनीं डोळे मिटून घेतले. इतक्यांत बाळ त्यांच्याजवळ येऊन त्यांच्या गालाला गाल लावीत म्हणाला, " मला छान छान मोताल आनून देनाल ना ताता ? "

विनायकरावांनीं मोटार देण्याचें कबूल केलें तेव्हां कुठें तो हसत हसत झोपीं गेला.

समोर खुंटीवर विनायकरावांना आपला कोट दिसत होता. फार जुना झाला होता तो. त्यांच्या मनांत आलें-आतां एक कोट शिवायला टाकलाच पाहिजे.

लगेच आपल्याला बिलगून निजलेल्या पाडसाकडे त्यांची दृष्टि गेली. ते मनांत म्हणाले, ' हा कोट काय आणखी दोन महिने काम देईल. बाळाची मोटारची हौसच आधी पुरविली पाहिजे ! '

हा विचार मनांत येतांच त्यांना गंगाधरशास्त्र्यांनी नेलेल्या त्या गंगावनाची पुन्हा आठवण झाली. त्यांच्या मनांत आलें, 'गंगाधर संध्याकाळींच आपल्या गांवाला जाऊन पोंचला असेल; त्यानें तें गंगावन आपल्या मुलीच्या हातांत दिलें असेल, नि तें मऊ नाहीं म्हणून ती रागावली असेल ! '

प्रवासांत--मग तो शरीराचा असो नाहीं तर मनाचा असो--झांपड येते ही गोष्ट नित्याच्या अनुभवाची आहे. कल्पनेनें गंगाधराचें कोंकणांतलें घर गाठणाऱ्या विनायकरावांचीही तशीच स्थिति झाली.

पण लवकरच ते दचकून जागे झाले. त्यांना भास झाला होता--आपण गंगाधराला घेऊन अंबाबाईच्या देवळांतून चाललों आहों. सभामंडपांत खूप गर्दी आहे. कुणाचें तरी प्रवचन सुरू आहे. ' सर्वांभूतीं परमेश्वर ' हा प्रवचनाचा विषय असावा ! ' हवं तर घटकाभर ऐकूं या ! ' असें आपण गंगाधरला म्हणतों. पण तो कांहीं तिथें उभा राहत नाहीं ! मुलीसाठीं गंगावन घेण्याची त्याला अगदीं घाई झालेली असते. पण महाद्वारांतून पलीकडे जाऊन तें मऊ मऊ केसांचें गंगावन हातांत घेतांच तो दचकतो--समोर भूत दिसावें तशी त्याची चर्या होते. तो किंचाळतो—

इथेंच विनायकराव दचकून जागे झाले होते.

थोड्या वेळानें त्यांना झोप लागली. पण झोपेंतसुद्धां त्यांचें मन अस्वस्थच होतें.

* * *

दुसऱ्या दिवशीं सुद्धां हा अस्वस्थपणा त्यांना मधून मधून डांचत होता. शेवटीं, रात्रीं निजतांना गंगाधराला पत्र घालून मनाची रुखरुख नाहींशी करायचा जेव्हां त्यांनीं निश्चय केला, तेव्हां कुठें त्यांना शांत झोप लागली.

मात्र हा निश्चय अमलांत आणण्याची पाळीच आली नाहीं त्यांच्यावर. सकाळीं ते पोस्टांत गेले तेव्हां गंगाधराचें पोंचल्याचें दोन ओळींचें कार्ड आज येईल अशी त्यांची अपेक्षा होती.

टपालांत तें पत्र होतें पण तें साधे कार्ड नव्हतें—तर चांगलें लठ्ठ पत्र होतें. सहा पैशांचीं तिकिटें लागलीं होतीं त्या पत्राला. परवां दोन दिवस अहोरात्र बाळपणाच्या साऱ्या गोष्टींची उजळणी झाली असतांना, गंगाधरानें घरीं पोंचतांच एवढें लांबलचक पत्र आपल्याला कां पाठवावें हें कांहीं केल्या त्यांच्या लक्षांत येईना. त्यांनीं तें अधीरपणानें उघडलें. पहिल्या चारदोन ओळी वाचल्या नाहींत तोंच आपण पोस्टांत कामावर आहों हें विनायकराव विसरूनहि गेले. ते भरभर वाचूं लागले—

‘ तुझ्या घरीं दोन दिवस मोठ्या आनंदांत गेले. एकच गालबोट लागलें त्या आनंदाला. गंगावन विकत घ्यायच्या वेळचा तो प्रसंग घडला नसता तर–

त्या दुसऱ्या गंगावनाला अवघे चार आणे अधिक पडत होते. तेंच मीं घ्यावें, असा तूं फिरून फिरून आग्रह केलास. पण मीं तो ऐकला नाहीं. तूं मनांत म्हणाला असशील—कांहीं झालें तरी कोंकणांतल्या खेड्यांतला भिक्षुक आहे हा ! पोटच्या पोरीसाठींसुद्धां चार पैसे खर्च करायचे याच्या जीवावर आलें तर त्यांत नवल कसलें !

पण, विनायक, खरं सांगूं ? तो चिक्कूपणा नव्हता–कद्रूपणा नव्हता. तर–

तें गंगावन हातांत घेऊन मी त्याच्यावरून हात फिरविला मात्र–त्या मऊ मऊ स्पर्शानें एकदम एक जुनी आठवण जागी झाली. आठवण कसली ?

मनाची जखमच म्हणेनास ! ती उघडी होऊन वाहूं लागली. त्या गंगा-वनाच्या केसांचा मऊपणा आयुष्यांत माझ्या हातांना एकदांच अनुभवायला मिळाला होता. इतक्या मऊ केसांवरून मीं एकदांच हात फिरविला होता. त्यामुळेंच–

माझें मन कसें गोंधळून गेलें आहे. त्या मुलीची गोष्ट तुला कशी सांगावी-जसें सुचेल तसें लिहितों.

तूं मॅट्रिकच्या वर्गात असतांना तुझी माझी गाठ पडली होती–आहे का लक्षांत ? मी त्या वेळीं माझ्या धंद्याला- भिक्षुकी करायला नि पुराण सांगा-यला–नुकतीच सुरवात केली होती. तुझा माझा त्या वेळीं खूप वादविवाद झाला. तूं भिक्षुकांच्या नि पुराणिकांच्या विरुद्ध खूप बोललास. मीं तुला उत्तर दिलें-- ' मी नुसता पोटार्थी पुराणिक होणार नाहीं. लोकांना धर्म सांगणारा, तो धर्म आचरणांत आणणारा––

मी काय बोलत आहें याची त्या वेळीं मला कल्पनाच नव्हती. धर्माचें आचरण करायला मनाचें फार मोठें सामर्थ्य माणसापाशीं असावें लागतें. तें बुद्धापाशीं होतें, ज्ञानेश्वरापाशीं होतें, समर्थांच्या अंगीं होतें–

माझ्यापाशीं तें असतें तर–

तर परवां तें मऊ मऊ केसांचें गंगावन मी मनीसाठीं विकत घेतलें असतें.

माणसाला आपलें मन उघडें करून दाखवितां आलें असतें तर–तर हें आधीं सांगूं का तें आधीं सांगूं, असा त्याच्या मनाचा गोंधळ झाला नसता !

तें मऊमऊ गंगावन हातांत घेतांच मला एका मुलीची आठवण झाली हें आतां तुझ्या लक्षांत आलेंच असेल !

पंधरा-सोळा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही ! चतुर्थीचे दिवस होते ते. शेजारच्या गांवांतला सत्यनारायण आटपून मी एकटाच घरीं परत येत होतों. आभाळ अंधारून गेल्यामुळें कंदिलाच्या उजेडानें प्रकाशित होणाऱ्या चार-दोन हातांखेरीज बाकी सारें जग काळेंकुट्ट झालें होतें. एकदम पावसाची एक मोठी सर आली. कंदील, छत्री, सामानाची मोटली आणि––मी इतक्या गोष्टी पावसाच्या झडींतून सुरक्षित घरीं जाणें कठीण होतें. म्हणून मी जवळच्या एका पिंपळाखालीं आश्रयासाठीं गेलों.

पाऊस खळला न खळला तोंच एक विचित्र आवाज मला ऐकूं आला. पिंपळाच्या जुन्या पाराला खूप भगदाडें होतीं. माझ्या मनांत आलें—एखादा नाग नाहीं तर घणस—

दिव्याची वात मोठी करून जिकडून तो आवाज आला होता तिकडे मी भीतभीत वळलों.

पलीकडेच एक पांच-सहा वर्षांची लहान मुलगी बेशुद्ध स्थितींत कण्हत पडली होती. कंबरेवरचें तिचें सारें अंग उघडेंच होतें. खालीं एक फाटकें फडकें कसेंबसें तिच्या अंगाभोंवतीं गुंडाळलेलें दिसत होतें. पण तें पावसानें भिजून ओलेंचिंब झालें होतें.

हातांतलें सामान खालीं ठेवून मीं त्या मुलीला उचललें. तें ओलें फडकें सोडून दूर फेंकून दिलें. तिला तापबिप नाहीं हें पाहून मला बरें वाटलें. पंच्यानें तिचें अंग पुसल्यावर माझें लक्ष तिच्या केसाकडे गेलें. तेहि भिजून चिप्प झाले होते. मी ते हातांत घेऊन पंच्यानें पुसूं लागलों मात्र—

त्या विलक्षण मऊ स्पर्शाची माझ्या हातांना अजून आठवण आहे. मला वाटलें—माझ्या हातांत केस नाहींत; सावरीचा कापूस आहे.

पिंपळापासून माझें घर मैल दीड मैल लांब होतें. ती मुलगी आणि सामान दोन्ही घेऊन पावसांतून एवढा लांबचा पल्ला गाठणें मला शक्य नव्हतें ! मीं सत्यनारायणाच्या मिळकतीवर पाणी सोडलें आणि त्या मुलीला खांद्यावर टाकून घरची वाट सुधारली. सत्यनारायणाची पूजा सांगणें हा माझा पोटाचा धर्म होता; पण त्या अनाथ मुलीला वांचविणें हा माझ्या हृदयाचा—परमेश्वराचा धर्म होता.

तिला शुद्धि नसल्यामुळें खांद्यावर ठेवलेलें तिचें डोकें एकसारखें लडबडत होतें. पाऊस ओसरला असल्यामुळें मीं छत्री मिटून डाव्या काखेंत घेतली आणि रिकाम्या झालेल्या हातानें तिचें डोकें सावरूं लागलों. तें सावरतांना त्या मऊ मऊ केसांचा माझ्या हाताला स्पर्श होई. आणि माझ्या मनांत येई--देवाची करणी किति विलक्षण असते. असल्या अनाथ मुलीच्या केसांची निगा कोण राखणार ? पण देवानेंच तिला इतके मऊ केस दिले आहेत, कीं एखाद्या राजकन्येलासुद्धां तिचा हेवा वाटावा !

आयुष्यांतल्या फारच थोड्या आठवणी अमर असतात. पुराण सांगणें हा माझा नित्याचा धंदा आहे ना ? पण मला माझ्या पुराणांपैकीं एकच नेहमीं आठवतें. महात्मा गांधी दांडियात्रेला निघाले तो दिवस ! कंसवधाकरितां गोकुळाहून निघालेल्या कृष्णाचें चरित्र त्या दिवशीं मी—

तें जाऊं दे !

मी त्या मुलीला घेऊन घरीं गेलों. काळीसांवळी असली तरी चेहऱ्यावरून हुषार दिसत होती ती. तिला आम्हीं दोघांनीं कांबळ्यांत लपेटून ठेवलें. तिच्या तोंडांत ऊन ऊन दूध घातलें.--दोन-तीन तासांनीं ती शुद्धीवर आली.

शुद्धीवर येतांच ' आई,--आई, ' म्हणून तिनें माझ्या बायकोला जी मिठी मारली—

आम्हीं दोघांनीं तिला आपली मुलगी म्हणून पाळायचें ठरविलें.

पण—

दुसरें दिवशीं सकाळीं गांवचा पोलीस-पाटील सहज भेटला ! पिंपळाच्या पलीकडच्या शेतांत एका म्हारणीचें प्रेत सांपडलें आहे असें त्यानें मला सांगितलें.

त्या प्रेताचा शोध सुरू झाला. आमच्या गांवापासून चारपांच मैलांवर असलेल्या एका खेडेगांवांतली महारीण होती ती ! नवऱ्यानें तिला नि मुलीला दोन दिवस उपाशी ठेवलें होतें. शेवटीं अंगांत ताप फणफणत असतांना आणि बाहेर पाऊस कोसळत असतांना ती सात-आठ कोसांवर असलेल्या आपल्या भावाकडे जायला तिन्हीसांजा उठली. पुढें काय झालें तें—

तें तुला सहज ताडतां येईल.

मीं घरीं आणलेली ती मुलगी मोठी गोड नि हुषार होती. पण खेडेगांवांत भिक्षुकीवर पोट भरणाऱ्या मनुष्यानें तिला पाळणें—

उपासमारीनें मरण्याची पाळी आली असती आमच्या कुटुंबावर !

त्याच दिवशीं त्या मुलीचा बाप तिला न्यायला आला ! बाप कसला ?—समंधच होता तो !

आमच्या घरीं राहण्याची त्या निष्पाप जीवाची फार फार इच्छा होती. पण—

त्या बापानें तिला आमच्या अंगणांतून मारीतच नेली. माझ्या डोळ्यां-

समोर हा अत्याचार घडला असूनहि मी त्याला प्रतिबंध करूं शकलों नाहीं. माझा धर्म अंधळा नव्हता; पण तो पुरा पुरा पांगळा ठरला.

मी तें गंगावन मनीसाठीं घेतलें असतें, तर मायेनें तिच्या केसांवरून हात फिरवितांना दर वेळेला मला त्या गोड पोरीची आठवण झाली असती— माझ्या पांगळेपणाची आठवण तीव्रतेनें होऊन मला भडभडून आलें असतें !

विनायक, जगांत आंधळ्यापेक्षां पांगळ्याचेंच दुःख अधिक असतें. आंधळ्याला चांदणें दिसत नाहीं, टेकडी दिसत नाहीं. पांगळ्याला हे सारे सुंदर देखावे दिसतात, तिथें जावेंसें वाटतें; पण—

तुझा

—गंगाधर

# गवसणी

त्या वादकाचें सतारीवर स्वतःच्या मुलीपेक्षांहि अधिक प्रेम होतें.

मुलीचा पापा घेतांना त्याला आपल्याभोंवतीं चांदणें पसरलें आहे असा भास होई—तिचे बोबडे बोल ऐकतांना आपण नदी आणि सागर यांच्या संगमाचें संगीत ऐकत आहों असें त्याच्या मनांत येई—

पण सतारीच्या तारांचा स्पर्श होतांच—त्या स्पर्शासरशीं निघणारा अमृतमधुर स्वर ऐकतांच—तो स्वतःलाच विसरून जाई.

त्याच्या खोलीच्या समोरच एका सुंदर कुंडींत एक गुलाबाचें झाड होतें. सतारवादनाला सुरवात झाली कीं त्याला भास होई—आपल्या हातांत सतार नाहीं, एक सुंदर गुलाबाचें झाड आहे आणि तें झाड पळापळाला फुलांच्या ओंजळी उधळीत आहे.

एके दिवशीं समोरच्या कुंडींत फुलझाडाऐवजीं रूक्ष काटक्यांचा एक सांगाडा तेवढा उभा आहे असें त्याला दिसलें. त्यानें चौकशी केली—गुलाबाच्या झाडाला कीड लागली होती.

त्याच्या मनांत आलें—आपल्या सतारीलाहि असें कांहीं झालें तर ! धुळीनें, हवेनें, नाहीं तर आणखी कशानें तरी—

सतार सुरक्षित ठेवण्याकरितां तिला गवसणी हवी हें त्याला तात्काळ पटलें.
त्या सुंदर सतारीला शोभेल अशी सुरेख गवसणी त्यानें शिवून घेतली.
सतारीच्या बोलांत त्याला अप्सरांच्या नृत्याचा भास होई.
आणि गवसणीच्या रूपांत त्याला नक्षत्रमंडित आकाश पाहिल्याचा आनंद होई.

तो मनांत म्हणे—आकाश आणि अप्सरा ! किती सुंदर संगम आहे हा ! सतारीप्रमाणें गवसणीविषयींहि त्याला एक प्रकारचा आपलेपणा वाटूं लागला.

या आपलेपणामुळेंच एके दिवशीं गवसणी कांही केल्या सतारीपासून दूर होईना, तेव्हां तो तिच्यावर रागावला नाहीं. त्यानें हसत हसत प्रश्न केला—

" आज स्वारी रुसली आहे वाटतं ? "

" हं ! " एवढाच कठोर उद्गार त्याच्या कानांवर पडला.

त्याच्या मनांत आलें—

गवसणी काय आणि सतार काय ? दोन्ही स्त्रीजातीच्याच ! दोन बायका गोडीगुलाबीनें एके ठिकाणीं नांदतील हें शक्य नाहीं !

तो गवसणीला म्हणाला, " आज सतारीशीं कडाक्याचं भांडण झालेलं दिसतंय् ! "

" हुं ! " पुनः एक कठोर उद्गार त्याच्या कानांवर पडला.

बायकांचा रुसवा दागिन्यानें सहज दूर करतां येतो असा त्याचा आजपर्यंतचा घरांतला अनुभव होता. तो गवसणीला म्हणाला—

" आणखी सुंदर सुंदर फुलं घालून मिरवायची लहर आली आहे वाटतं तुला ? "

" अं हं ! " मघापेक्षां स्वरांत अधिकच कठोरपणा होता.

" मग काय हवंय तुला ? "

" तुम्ही सतार वाजवितां तेव्हां सारे लोक तिच्याकडे बघतात--तिचीच स्तुति करतात. माझ्याकडे कुणी ढुंकूनसुद्धां बघत नाहीं ! "

वादकाला मनांतल्या मनांत हसूं येत होतें. पण तें त्यानें मोठ्या कष्टानें आवरलें. गवसणी रागानें फणफणत म्हणाली, " आतां केव्हांहि सतार वाज-

वितांना मी दूर होणार नाहीं. म्हणजे साऱ्या लोकांची नजर माझ्यावरच खिळून राहील ! ”

गवसणी दूर न करतां सतार वाजवायची ?

मग शृंखला घातलेला कैदी सुंदर नृत्य करील—तळघरांत कोंडून ठेवलेली वेल फुलून जाईल !

वादकानें समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण गवसणी कांहीं केल्या आपला हट्ट सोडीना.

वादक संतापला. त्याची वादनाची वेळ होऊन गेली होती. त्यानें संतापानें गवसणी ओढून काढली; ओढतां ओढतां ती टर्रकन् फाटली. त्यानें रागानें ती कोपऱ्यांत फेकून दिली.

सतारीच्या तारांना त्यानें स्पर्श केला मात्र ! त्यांच्यांतून असे मधुर स्वर निघाले ! ते स्वर म्हणत होते---

‘ गवसणी फाटली हें फार बरं झालं ! अगदीं कोंडमारा केला होता तिनं माझा ! मोकळेपणानं इकडं-तिकडं बघावं म्हटलं तर जेव्हां तेव्हां हिचा आपला आडपडदा ! ’

* * *

संध्याकाळीं आकाशांत कुणी गंधर्वानें मेघ-मल्हार आळवला.

पावसाचें रम्य दृश्य क्षणभर चमकून गेलें.

दुसऱ्या गंधर्वानें भूप आळवला;

पश्चिमेकडल्या कुंजवनांत चित्रविचित्र फुलें फुलूं लागलीं.

तिसऱ्यानें दीपराग आळवला;

एका क्षणांत आकाशांत दीपमालिका दिसूं लागल्या.

वादकाचें मन अननुभूत आनंदानें भरून आलें. तो आनंद प्रकट करण्याकरितां त्याची प्रतिभा नाचूं लागली.

त्यानें आपल्या खोलींत पाऊल टाकलें.

एका कोपऱ्यांत फाटकी गवसणी पडली होती—दुसऱ्या कोपऱ्यांत त्याची मुलगी सशाच्या पिलाप्रमाणें लपली होती.

पण त्याचें लक्ष कशाकडेच गेलें नाहीं. तो थेट सतारीकडे गेला.

मांडीवर सतार घेऊन त्यानें तिच्या तारांना स्पर्श केला मात्र—

निष्प्राण देहाचा स्पर्श होतांच दचकून हात मागें घ्यावा, तसें त्यानें केलें.

त्याच्या पहिल्या स्पर्शानें पुलकित होऊन मधुर स्वर काढणारी ती सतार मुकी झाली होती. तिच्या तारा कुणी तरी—

समोरच्या कोंपऱ्यांतून एक मोठा हुंदका त्याला ऐकूं आला.

धावत जाऊन त्यानें मुलीला पोटाशीं धरलें. पण कांहीं केल्या तिचे हुंदके थांबेनात.

ती त्या मोडक्या सतारीकडे पहात होती आणि रडत होती.

वादक मुलीला पोटाशीं धरून बाहेर जाऊं लागला.

पण त्याचें पाऊल जागच्या जागीं थांबलें !

कोपऱ्यांतून सतार स्फुंदत म्हणत होती—

'मला गवसणींतच घालून ठेवा. मघांशी गवसणी असती तर माझी अशी दुर्दशा—!'

दुसऱ्या कोपऱ्यांतून उद्गार आले--'मघांशी एक गडी आला नि मला म्हणाला—उद्यां सकाळीं पोतेरें घालायलाच तुला नेतों! असें पोतेरें होऊन पडण्यापेक्षां मी सतारीला संभाळीन, हवी तेव्हां तिच्यापासून दूर राहीन---'

मुलीप्रमाणें बापाच्याहि डोळयांत अश्रु उभे राहिले.

# देवदूत

माणसाच्या धंद्याचा त्याच्या स्वभावावर फार परिणाम होतो असें मला वाटतें. माझें हें विधान ऐकून अनेकांस हसूं येईल--त्यांच्यापैकी महाभारत वाचलेली मंडळी मला खाटकाची गोष्ट सांगूं लागतील. खाटकाचा धंदा करीत असूनहि ब्रह्मज्ञान सांगणाऱ्या त्या सद्‌गृहस्थाविषयीं मला आदर आहे हें मीहि कबूल करतों. पण महाभारत लिहिणाऱ्या व्यासाच्या कल्पनेचें कौतुक करूनहि मला असें म्हणावेसें वाटतें, कीं तिनें निर्माण केलेला धर्मशील खाटीक ही अद्‌भुतरम्य व्यक्ति आहे; तुमच्या आमच्या जगांत नेहमी आढळणारी व्यक्ति नव्हे !

असल्या बाबतींत शेरभर कल्पनेपेक्षा गुंजभर अनुभव अधिक श्रेष्ठ असतो हें कोण नाकबूल करील ! माझीच गोष्ट पाहा ना ! कॉलेजांतल्या वादविवाद सभेंत मीं चुकूनसुद्धां तोंड उघडलें नव्हतें. ज्यांचा आपला आयुष्याशीं कांहीं संबंध नाहीं अशा विषयांवर शिरा ताण-ताणून बोलणारे विद्यार्थी पाहिले, की मला मोठा अचंबा वाटे. प्रतिभा आणि वेड हीं सख्खी भांवडें आहेत ही उक्ति वक्तृत्वाच्या बाबतींत सुद्धां खरी आहे असें मी त्या वेळीं मनाचें समाधान करून घेत असें, हा भाग निराळा. पण माझ्यासारखा साळसूद मनुष्य पुढें कोर्टांत वितंडवाद करीत बसेल किंवा लहानसहान गोष्टींत

आपलाच हेका चालवील असें भविष्य वर्तविण्याची छाती त्या वेळीं कुणालाहि झाली नसती !

भविष्याला अदृष्ट म्हणतात तें कांही उगीच नाहीं. बी. ए. झाल्यावर प्रोफेसर होऊन एकशेचाळीस एके एकशेचाळीस करीत बसण्यापेक्षां, कोंकणांतल्या एका लहान गावांतील मामांची वकिली चालविणेंच मला फायदेशीर होईल असें घरांतल्या मंडळींना वाटलें. मलाहि तें पटलें. हो, माणसांचे मतभेद होतात ते काव्याच्या बाबतींत—अंकगणिताच्या नाही ! मामांना त्या लहानशा गावीं दरमहा तीनशे रुपये मिळत होते. त्यामुळें मी एम्. ए. च्या संस्कृत पुस्तकांची रजा घेऊन ‘ रोमन लॉ ’ च्या मागे हात धुऊन लागलों.

एल्एल्.बी. होईपर्यंत मी पूर्वीसारखाच अबोलका, कुणाच्याहि अधामध्यांत न पडणारा, आगींत तेल ओतण्यापेक्षा पाणी ओतणें बरें असें मानणारा होतों. पण मामांच्या जोडीने कोर्टांत मीं पहिली केस चालवायला उभा राहिलों मात्र—बुद्धाने कालिकेचा अवतार धारण करावा तशी माझी पांच वर्षांत स्थिति झाली. मानवी जीवन हा एखाद्या ऋषीचा आश्रम नसून दारूचा गुत्ता आहे, हा अनुभव वकिलीइतका जगांत दुसऱ्या कोणत्याहि धंद्यांत येत नसेल ! आजच्या जगांतलें मनुष्याचें बाहेरचें मन हें सुशोभित केलेल्या दिवाणखान्यासारखें दिसतें. त्यांत मधूनमधून उच्च विचारांचीं सुंदर चित्रें लावलेलीं असतात. गोडगोड शब्दांच्या फुलांनीं फुललेलीं पुष्पपात्रें टेबलावर हसतांना दिसतात, आदरसत्काराचे मऊमऊ कोच सर्वांचें स्वागत करीत असतात; पण दिवाणखान्याच्या मागच्या बाजूला असलेल्या अडगळीच्या खोलीची कडी काढली की—तिच्यांत कोळिष्टकें, जळमटें, रिकाम्या बाटल्या, मोडक्या खुर्च्या, फुटकीं भांडीं आणि वर्तमानपत्रांच्या जुन्या अंकांची रद्दी याशिवाय जसें दुसरें कांही दिसणें शक्य नाही, त्याप्रमाणें माणसाच्या आंतल्या मनांत काम, लोभ, मत्सर इत्यादि विकारांच्या विपरीत लीलांखेरीज दुसरें कांहींच आढळत नाही. निदान फौजदारी वकिलाच्या नजरेंत तरी तें भरत नाही !

बोलतां बोलतां किती वाहवलों मी ! धंद्याचा माणसावर परिणाम होतो तो असा ! वकिलानें कैफियत द्यायला सुरवात केली नि ती थोडक्यांत

आटोपली असें कधी तरी झालें आहे का ? परवाची आमची लायब्ररीची सभा लढविण्याची इच्छा माझ्या मनांत उत्पन्न कां झाली आणि शेवटीं वार्षिक उत्सवाकरिता कॉम्रेड घाटे यांनाच आणायचें कसें ठरलें, एवढेंच सांगणार होतों मीं. पण---

धंद्याने माणसाचा स्वभाव अजीबात बदलतो याचा पुरेपूर अनुभव आला मला त्या दिवशीं. मी कार्यकारी मंडळाचा सभासद म्हणून सभेला हजर राहिलों होतों एवढेंच. वार्षिक समारंभाकरिता पाहुणा म्हणून कुणाला आणायचें यासंबंधाने जी चर्चा चालली होती तिच्याकडे माझें मुळीच लक्ष नव्हतें. मी कुटल्याशा मासिकाचा नवा अंक चाळीत होतों. त्याच्या मुख-पृष्ठावरील सिनेमानटीचा फोटो पाहून झाल्यावर मीं आंतली एक प्रेमकथा काढली आणि--

त्या कथेंतला नायक नायिकेची ओळख होतांक्षणींच तिचें चुंबन घेण्या-करिता वाकत होता, इतक्यांत--

इतक्यांत माझ्या शेजारचे बावडेकर वकील माझा खांदा हलवीत म्हणाले,

" तुमचं मत सांगा ना ? "

माझं मत ?

त्या नायकाने नायिकेचें चुंबन घ्यायला कांहींच हरकत नव्हती माझी ! सत्यसृष्टींत असें कधी घडत नाही हें खरें ! क्वचित् घडलेंच तर आम्ही वकील विनयभंगाचें कलम सरसावून तयारच असतों. त्यामुळें व्यवहारांत असेंल एक चुंबनसुद्धां फार महाग पडतें. पण काव्यांत आणि कथांत---हो, काव्य म्हणजे कांहीं कोर्ट नव्हे !

मी कांहींच बोलत नाही असें पाहून बावडेकरांनीं माझ्या हातांतला अंक खसकन् ओढून घेतला आणि तो टेबलावर फेकीत ते म्हणाले,

" तुमचं मत द्या ना. "

" कशाविषयी ? "

" यंदाच्या वार्षिक समारंभाचे सेक्रेटरी होणार आहांत तुम्ही ! नि पाहुणे कोण आणायचे याविषयी. आम्हीं अगदी हातघाईवर आलों तरी तुम्ही आपले..."

मी चट्कन् टेबलावरची यादी पुढे ओढून तिच्यावर नजर फिरविली. पहिलें नांव आमच्या शेजारच्याच संस्थानच्या दिवाणांचें होतें; आणि शेवटचें नांव—

क्षणभर मी सुद्धा चकित झालों.

कॉ. घाटे !

परवाच्या मुंबईच्या संपाच्या हकीकतींत हें नांव वारंवार चमकत असे. त्या वेळीं घाटे मुळचे इथल्याच जवळच्या खेड्यांतले असून इंग्रजी चवथी-पांचवीपर्यंत ते बावडेकरांच्याबरोबरच होते हें मला कळलें होतें.

हां हां म्हणतां युद्धाचें स्वरूप माझ्या लक्षांत आलें. कार्यकारी मंडळांतल्या बुद्रुक लोकांना संस्थानच्या दिवाणांना आणायचें होतें. उलट बावडेकरां-सारख्या तरुण सभासदांना त्यांचा डाव हाणून पाडावयाचा होता. म्हणून तर त्यांनीं घाटे हें नांव सुचविलें होतें.

दोन्ही पक्षांचीं मतें सारखीं होत होतीं. माझें मत ज्या बाजूला पडेल तोच यशस्वी होणार हें उघड होतें. म्हाताऱ्या मंडळींनी घाट्यांची अकारण निंदा करायला सुरवात केली. कॉम्रेड, रशिया, लेनिन, स्त्री-पुरुषसंबंध आणि पेला-पाणीन्याय, एक ना दोन, हजारों गोष्टींचा उच्चार केला त्यांनी ! कॉलेजांत असतांना असलें भांडण माझ्यासमोर सुरू झालें असतें तर मी तिथून मुकाट्याने उठून गेलों असतों. पण आता मात्र माझ्यांतला वकील जागृत झाला. मी बावडेकर पक्षाला मिळालों आणि कॉ. घाटे हेच आमच्या उत्सवाचे पाहुणे ठरले.

* * *

समारंभाचे सेक्रेटरी या नात्याने मीं घाट्यांना जें पत्र लिहिलें त्यांत " मातृभूमीचें हें आमंत्रण तुम्हीं स्वीकारलेंच पाहिजे " आणि " बावडेकरांच्या अगर माझ्याच घरीं उतरलें पाहिजे " असें लिहिलें होतें.

पहिल्या बाबतींत त्यांना माझें म्हणणें पूर्णपणें मान्य होतें. मला उत्तर पाठवितांना त्यांनीं लिहिलें होतें—

" कामांची गर्दी असूनसुद्धा तुमचें निमंत्रण मी आनंदानें

स्वीकारतों. तुमचें पत्र वाचल्याबरोबर माझ्या डोळयांपुढे माझें बालपण उभें राहिलें. ती इंग्रजी शाळा, त्या शाळेतल्या निरनिराळया मास्तरांच्या गमती–आमच्या संस्कृतच्या मास्तरांना कोटाच्या वरच्या खिशांत भाजलेले शेंगदाणे ठेवून ' हरे: हर्यो: हरीणाम् ' असें म्हणत म्हणत ते तोंडांत टाकायची सवय होती. एके दिवशीं स्वारी कुणा तरी मुलाला चोप द्यायला वाकली नि खिशांतले शेंगदाणे, नळाला एकदम पाणी यावें तसे, बाहेर पडले. अंगणांतले दाणे वेचायला चिमण्यांनी पुटकन पुढे यावें त्याप्रमाणे दोनचार धीट मुलें ते शेंगदाणे वेचायला आपल्या जागेवरून उठलींसुद्धां !

कुणीकडे वाहवलों मी ! नाही ? नदीच्या पाण्याबरोबर वाहत जातांना मनुष्याला विलक्षण आनंद होतो ना ? बालपणच्या आठवणीबरोबर वाहत जातांनाहि तशाच गुदगुल्या होतात.

तुमच्या निमंत्रणाला नकार देणें अगदी अशक्य होतें मला ! तुमच्या गावाजवळच जांभळी म्हणून एक खेडेगाव आहे ना ? तिथेंच माझें सारें बालपण गेलें. तिथलें तें कमळांनी फुलणारें सुंदर तळें, काजूंनी खुलणारी टेकडी, ते ब्रह्मेश्वराचें भव्य देवालय–हें सारें पुन्हा पाहायला मिळणार म्हणून मला खरोखरीच फार आनंद झाला आहे. ''

भाई लोकांतहि कवि असतात असें हें वाचतां वाचतां माझ्या मनांत आल्यावाचून राहिलें नाहीं. पण कॉ. घाट्यांनी आमचें निमंत्रण स्वीकारलें असलें तरी, आपण कुठे उतरणार यासंबंधीं पत्रांत कांहीच खुलासा केला नव्हता.

माझें वकिली डोकें हां हां म्हणतां चालूं लागलें. मला वाटलें, कॉ. घाट्यांना समारंभाचे मुख्य पाहुणे म्हणून आणण्यांत आम्ही ज्यांच्यावर मात केली होती त्यांच्यापैकी कुणी तरी आमचा सूड उगविण्याकरिता घाट्यांना आमच्या आधीच आपल्या घरीं आमंत्रण देऊन ठेवलें असावें ! त्यांच्यापकी घाटे कुणाकडे उतरले तर–छे ! तसें होणें हा आमचा उघड उघड पराजय होता.

मी व बावडेकर या दोघांनी मिळून घाट्यांना पुन्हा पत्र पाठविलें. पत्रांत बावडेकर व ते एका वर्गात होते या गोष्टीवर आम्हीं मुद्दाम जोर दिला. शेवटीं कांही झालें तरी घाट्यांनी आमच्या दोघांपैकी कोणाच्या तरी घरीं

उतरलेंच पाहिजे अशी अगदी काकुळतीने विनंति करण्यांत आली.

या विनंतीचा घाटे अव्हेर करणार नाहीत अशी माझी खात्री होती, म्हणून त्यांचें उत्तर मीं मोठ्या उत्सुकतेने उघडलें.

पण पत्रांतला मजकूर वाचून मी स्तंभितच झालों !

घाटे माझ्याकडे उतरणार नव्हते---भावडेकरांकडे उतरणार नव्हते--- गावांतल्या दुसऱ्या कोणत्याहि प्रतिष्ठित मनुष्याकडे उतरणार नव्हते ! त्यांनी पत्रांत लिहिलें होतें, " मी एका देवदूताकडे उतरणार आहे. "

त्यांनी उतरायला फार मोठा यजमान शोधून काढला होता ! त्याचें नांव वाचतांना माझी हसतां हसतां पुरेवाट झाली.

आबा गुरव !

जांभळीचा देवदूत, जांभळीच्या ब्रह्मेश्वराचा गुरव !

या गुरवाच्या घरीं उतरण्याची घाट्यांना कां लहर आली हें मला कांही केल्या कळेना. घाट्यांचें बालपण जांभळींत गेलें असेल, त्या वेळीं ते ज्या नातेवाइकाकडे राहात होते त्यांचें बिऱ्हाड आज जांभळींत नसेल, आबा गुरवाची नि त्यांची त्या वेळेची खूप ओळख असेल--म्हणून काय, ज्या समारंभाचा मी सेक्रेटरी होतों त्याच्या मुख्य पाहुण्यानें एका गुरवाच्या घरीं उतरावयाचें ?

आबाची मूर्ति माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली. ब्रह्मेश्वराच्या उत्सवाला मुलांच्याकरिता म्हणून तरी मला जावेंच लागे. त्या वेळीं मी आबाच्या हातांत नारळ देई. पाठीला पोक आलेलें त्याचें कृश शरीर देवापुढें नारळ ठेवून गाऱ्हाणें घालूं लागलें कीं, तें अधिकच कृश दिसूं लागे. गाऱ्हाण्यांतले तेच तेच ठराविक शब्द नाकांतून उच्चारतांना, नारळ फोडून त्याचें अर्धें भकल, निर्माल्य व अंगारा यांच्यासह पदरांत टाकतांना आणि देवळांत वावरतांना आबाकडे कुणीहि पाहिलें तरी त्याला एक निस्तेज चेहऱ्याचा म्हातारा यंत्राप्रमाणें आपलें काम करीत आहे असेंच वाटत असे. त्याची बायको, एकुलता एक मुलगा आणि त्यानें पाळायला घेतलेली एक मुलगी हीं सारीं तेराचौदा वर्षांपूर्वीच्या प्लेगांत दगावलीं होतीं. त्यामुळें तो एकटाच देवळाजवळच्या आपल्या घरांत राही. लहर येईल तेव्हा पेजभात कांहीं तरी करून भुकेची

वेळ निभावून नेई आणि उरलेला वेळ एखाद्या भुताप्रमाणें देवळाभोंवताली भटकण्यांत घालवी. अशा मनुष्याच्या घरीं घाट्यांनी उतरणें म्हणजे जाणून-बुजून आपले हाल करून घेण्यासारखे होतें.

म्हणून मी पुन्हा त्यांना आग्रहाचें पत्र लिहिलें.

पण त्यांनी उत्तर पाठविलें---

"या वेळीं एका दिवसापेक्षां मला अधिक सवड नाहीं. या एका दिवसांत आबाच्या सहवासांत मला जेवढा वेळ घालवितां येईल तेवढा मी घालविणार आहे!"

माझ्या मनांत आलें–या भाई लोकांना वेडे म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. कदाचित् हा कॉ. घाटे यांचा स्टंटहि असेल! हे भाई म्हणजे गरिबांचे कैवारी ना? तेव्हा घाट्यांनी आपण किती तत्वनिष्ठ आहोंत हें दाखविण्याकरिताच आबा गुरवाच्या घरीं उतरायचें ठरविलें असावें!

आबा गुरव यजमान आणि कॉ. घाटे त्याचे पाहुणे!

नुसत्या कल्पनेनेच मला हसूं आलें! तसें पाहिलें तर या दोघांत काय साम्य होतें? आबा जन्मांत गुडघ्याखालीं जाणारा पंचा नेसला नसेल! आणि घाटे तर सुटाबुटाशिवाय पाऊलहि उचलीत नसतील! आबा तोंडांत पाणी न घालतां उपास करणारा, तर मटन नसले कीं ज्यांना जास्त जेवण जात नाहीं त्या पंथाचे घाटे अनुयायी असण्याचा संभव! आणि हे सर्व विरोध डोळ्यांआड केले तरी आबासारख्या जन्मभर अंधश्रद्धेनें देवाची पुजा करणाऱ्या अशिक्षित गुरवाच्या सहवासांत घाट्यांसारख्या नास्तिक आणि विचारी मनुष्याला कसला आनंद मिळणार?

* * *

हा प्रश्न एकसारखा माझ्या मनांत घोळत असतांनाच व्याख्यानाचा दिवस आला. घाटे आले. शिष्टाचार म्हणून जांभळीला आबा गुरवाच्या घरीं त्यांना पोंचवायला मी गेलों.

आबानें त्यांना पाहिलें मात्र, त्याच्या निस्तेज डोळ्यांत पाणी उभें राहिलें.

तिसऱ्या प्रहरीं घाट्यांना व्याख्यानाला नेण्याकरितां मी पुन्हा आबाच्या घरीं गेलों. आबा चहा करीत होता. एका कळकट भांड्यांतला तांबडा लाल

असा तो चहा कानफुटक्या पेल्यांतून घाटे मिटक्या मारीत पीत होते. मला मात्र त्याचा एक घोट घेतांच अगदी शिसारी आली.

" कसा झालाय् चहा ? " आबानें घाट्यांना विचारलें.

" फक्कड ! " ते उत्तरले. " त्या रात्रीच्या चहाची आठवण झाली मला अगदीं ! "

घाटे हसले. आबाहि हसला.

रात्रीचा चहा ? हें काय गौडबंगाल आहे, तें मला कळेना ! घाटे लहानपणीं जांभळींत होते तेव्हां रात्रीं-अपरात्रीं ते या गुरवाच्या घरीं येत असले पाहिजेत एवढें या संभाषणावरून उघड होत होतें. अपरात्रीं देवळाकडे येण्याचें काय कारण असावें ? देवळाजवळचीं भाविणींचीं घरें...

माझ्यांतला फौजदारी वकील आतां पुरा जागृत झाला होता. मला वाटलें, या गुरवाची नि घाट्यांची दोस्ती असल्या कांहीं तरी भानगडीमुळेंच झाली असावी ! नाहीं तर एवढा मोठा झालेला हा मनुष्य असल्या अडाणी माणसाच्या घरीं मुद्दाम कशाला उतरेल ! आणि उतरला तरी चिखलांतल्याप्रमाणें दिसणाऱ्या चहाची ' फक्कड ' म्हणून कशाला स्तुति करील ? व्यसनांतली मैत्री हीच खरी खरी मैत्री असें आमच्या बारमधले एक वृद्ध वकील नेहमीं म्हणत. त्यांच्या या वाक्याची आठवण होऊन माझें मन म्हणूं लागलें— या दोघांच्या आपलेपणाच्या मुळाशीं असेंच कांहीं तरी काळेबेरें असलें पाहिजे.

* * *

घाट्यांचें निम्मे व्याख्यान ऐकेपर्यंत हा विचित्र संशय माझ्या मनांत दबा धरून बसला होता. पण पुढें मात्र मी स्वतःला विसरून गेलों. त्यांच्या बोलण्यांत बुद्धिमत्ता, तळमळ आणि उदात्तपणा यांचा असा कांहीं सुंदर संगम झाला होता, कीं या मनुष्याच्या हातून आयुष्यांत एखादी वाईट गोष्ट घडली असेल असें मनांत आणण्याचीसुद्धां मला लाज वाटूं लागली. आंब्याच्या झाडाला कधीं कवंडळें लागलीं आहेत का ?

व्याख्यान संपल्यावर घाट्यांना आमच्या आबाच्या घरीं परत पोंचविण्याकरितां मी त्यांच्याबरोबर निघालों. ते फार दिवसांनीं दिसलेलें कोंकणचें

सायंकालीन सृष्टीसौंदर्य निरखून पाहत होते. पण माझें गोंधळलेलें मन मात्र कशांतच रमत नव्हतें. शेवटीं मीं धीर करून म्हटलें, "एक प्रश्न विचारूं का आपल्याला ?"

माझ्याकडे हसून पाहत ते म्हणाले, "अजून व्याख्यानाचाच विचार करताय् वाटतं तुम्ही ?"

मीं नकारार्थी मान हालविली.

"मग ?" त्यांनीं प्रश्न केला.

मीं चाचरत विचारलें, "आबा गुरवाचा नि तुमचा इतका स्नेह कसा जमला ?"

ते मध्येंच उद्गारलें, "कसा ? आबा माझा गुरु आहे !"

एक अडाणी गुरव आणि तो एका प्रसिद्ध समाजवाद्याचा गुरु ! मला खरेंच वाटेना हें ! माझ्या मुद्रेवरले आश्चर्य घाट्यांच्याहि लक्षांत आलें असावें ! ते म्हणाले,

"कुणालाहि आश्चर्य वाटेल अशीच हकीकत आहे ती ! सत्य हें कल्पित कथेपेक्षा अधिक चमत्कृतिजनक असतें, नाहीं ?"

त्यांच्या या प्रश्नानें ती हकीकत ऐकण्याची माझी इच्छा अधिकच तीव्र झाली.

रस्त्याच्या पलीकडे एक लहानसा चौथरा होता. त्याच्याकडे बोट दाखवीत घाटे म्हणाले, "ही सतीची जागा आहे ना, तिथं पांच मिनिटं बसू या ! म्हणजे लहानपणींसारखं गार वाऱ्यांत बसतां येईल नि तुम्हांला हवी असलेली गोष्टहि सांगतां येईल."

मी या वाटेनें अनेकदां गेलों होतों. पण तो चौथरा बांधलेली जागा सतीची आहे याची मला मुळीच कल्पना नव्हती.

त्या चौथऱ्याजवळ बसतां बसतां माझ्या मनांत दोन शब्द राहून राहून डोकावूं लागले—

सती ! आबा !

इतक्यांत घाट्यांनीं आपली गोष्ट सांगायला सुरवात केली—

"माझे आईबाप अगदीं लहानपणीं वारले. माझे एक दूरचे नातेवाईक जांभळींत त्या वेळीं राहत होते. त्यांनी मला इथं आणलं.

" त्यांच्याकडे दोनतीन गावांच भटपण असे. ही सारी भिक्षुकी सांभाळायला मदत म्हणून त्यांना कुणी तरी मनुष्य हवंच होतं. सहाव्या वर्षी माझी मुंज करून त्यांनीं मला भिक्षुक केलं.

" भिक्षुकी करीत करीतच मीं मराठी चार यत्ता पुऱ्या केल्या. झालं एवढं शिक्षण पुरं झालं अस माझ्या पालकांचं मत होतं; पण मला मात्र आपण इंग्रजी शिकावं, कुठं तरी मामलेदार नाहीं तर मुन्सब व्हावं असं फारफार वाटत होतं. शेवटीं भिक्षुकी नसेल त्या दिवशीं शाळला जायला मिळेल या अटीवर मला त्यांनीं जवळच्या गांवच्या इंग्रजी शाळेत घातलं. माझा पंचा, माझी शेंडी, माझी भिक्षुकी या सान्याची त्या वेळी इतकी थट्टा झाली म्हणतां!"

या आठवणीनें घाटे हसले. मीहि हसलों पण पुढची हकीकत ऐकायची उत्सुकता असल्यामुळें मी तोंडातून चकार शब्दसुद्धां काढला नाहीं.

घाटे पुढें सांगू लागले—

" वर्षातले निम्मे दिवस शाळा चुकली तरी वार्षिक परीक्षेंत माझा पहिला नंबर येत असे. हा क्रम तीनचार वर्षे चालला. मग मात्र शाळा चुकवून आपला नंबर वर राहण शक्य नाहीं हें मला कळून चुकलं. शाळा चुकविण्याऐवजीं मी भिक्षूकीच चुकवूं लागलों.

पण माझ्या पालकांना हें पसत पडणं शक्य नव्हतं. शेवटीं मीं इंग्रजी शिकावं का भिक्षुकी करावी हें ठरविण्यासाठीं देवाला प्रसाद लावायचं त्यांनीं ठरविलं. सत्यनारायण, व्रतं-वैकल्यं, नवस इत्यादिकांचे संस्कार माझ्या मनावर लहानपणापासूनच अखंड झाले होते. आबा गुरवाच्या अंगांत अवसर आला म्हणजे तो घुमत घुमत ज्या ज्या गोष्टी सांगे, त्या त्या गावकरी निमूटपणानं मान्य करतात हें पाहिल्यापासून तर देव आणि आबा गुरव या दोघांच्याहिविषयीं माझ्या मनांत विलक्षण श्रद्धा उत्पन्न झाली होती.

माझ्या पालकांनीं आबाला प्रसाद लावायला सांगितलं उजवीकडलं तुळशीचं पान पडलं तर मीं भिक्षुकी करायची आणि डावीकडलं पान पडलं तर मीं इंग्रजी शिकायचं असं ठरलं.

माझ्या दुर्दैवानं उजवीकडलं पान खालीं पडलं. त्या वेळीं मला तें दुर्दैव वाटलं हं! आता नाही तसं वाटत.

मी निराश होऊन घरीं परत आलों. कोपऱ्यांत बसून तास दोन तास रडलों.

रात्रीं अंथरुणावर पडलों पण कांहीं केल्या झोप येईना ! राहून राहून मनांत येई, मी इंग्रजी शिकलो तर देवाचं काय बिघडणार आहे ? बाकीचीं मुलं नाही का इंग्रजी शिकत ?

शेवटीं एक कल्पना माझ्या मनांत आली—देव प्रसाद देतांना चुकला असावा ! त्याला पुन्हा प्रसाद लावून पाहिला तर ?...

मी धडपडतच अंथरुणावरून उठलो. घरांत कुणालाहि कळू नये म्हणून चोरपावलांनीं बाहेर पडलो आणि अंधारांतच देवळाच्या वाटेनं चालूं लागलों.

देऊळ जसजसं जवळ येऊं लागलं तसतशी एक शंका माझ्या मनांत पुनःपुन्हा येऊं लागली. प्रसाद लावायला गुरव हवा. तो या वेळीं कुठून जागा असणार ?

लगेच वाटलं, आपण स्वतःच प्रसाद लावला तर ? जवळच्या तळ्यांत बुडी मारावी आणि ओलेत्यानं गाभाऱ्यांत जाऊन—

काय करावं हें मला सुचेना. मी देवळापाशीं गेलों तेव्हां सभामंडपांत कुणी तरी फिरत आहे असा मला भास झाला. भुताच्या कल्पनेनं माझ्या अंगाचा थरकाप झाला. दीपमाळेच्या आड उभं राहून धडधडणाऱ्या अंतःकरणानं मीं निरखून पाहिलं.

तो आबा गुरव होता ! मला विलक्षण आनंद झाला. आपण आबाचे पाय धरूं त्याला देवाला प्रसाद लावायला सांगूं, देव आपल्याला हवा तोच प्रसाद देईल.

आनंदानं धावतच मी सभामंडपांत गेलों. माझी चाहूल ऐकतांच आबानं दचकून वर पाहिलं. मी जवळ जातांच तो म्हणाला,

'पोरा, चूडबीड न घेतां अंधारांतनं आलास ?'

'हो !'

'पायाबुडी कांहीं मिळालं असतं म्हणजे ?'

'या त्रासांतून सुटलों तरी असतों !'

जवळ येऊन माझ्या पाठीवरून हात फिरवीत आबा म्हणाला, 'असं वेडंविद्रं बोलूं नये पोरा ! अजून सारा जन्म जायचाय् तुझा !'

'भिक्षुकी करण्यांत !' मी एकदम बोलून गेलों.

दुपारच्या प्रसादाची आठवण होऊन आबा हसला. मीं त्याचा हात धरून त्याला म्हटलं,

' आबा, माझं एक काम करशील ? '

त्यानं मानेनं ' हो ' म्हटलं.

' आत्ताच्या आत्ता प्रसाद लाव देवाला ! '

' काय म्हणून ? '

' मी इंग्रजी शिकूं की नको म्हणून ! '

' तुझ्या मनांत काय आहे ? ' त्यानं विचारलं.

' शिकायचंय् ! '

' मग मुकाट्यानं शिकायला लाग ! "

' पण देवाचा प्रसाद–दुपारीं देवानं नको म्हणून सांगितलंय् की ! '

आबा विकटपणानं हसला. त्या भयंकर हस्याचा अर्थच मला कळेना ! माझा हात हातांत धरून त्यानं मला गाभाऱ्यांत नेलं आणि देवाकडे रोखून पाहत तो म्हणाला, ' पोरा, हा देव खरा आहे म्हणून कुणी सांगितलं तुला ? '

आबाला वेडबीड तर लागलं नाही ना, अशी शंका माझ्या मनांत येऊन गेली.

त्याला अडविण्याकरितां मी मुद्दाम म्हटलं, ' आबा, तुझ्या अंगांत वारं येतं नि देव बोलतो ! होय ना ? '

' तें सारं खोटं आहे ! '

' खोटं ? '

' हो, खोटं ! पोरा, जगांत पोटासाठीं नाहीं नाहीं तीं सोंगं माणसाला करावीं लागतात ! माझं सोंगहि त्यांतलंच आहे ! माझ्या अंगांत देव येत असता तर–तर माझीं बायकापोरं अशीं तडफडत मेलीं असतीं का ? पोरा, या देवाचा प्रसाद घ्यायला तूं आला आहेस ! पण हा किती खोटं बोलतो हें सांगूं का तुला ? माझी बायको प्लेगनं आजारी पडली, तेव्हां तीर्थ देऊं की डॉक्टर आणूं म्हणून मीं देवाला प्रसाद लावला. देवानं तीर्थ घ्यायला सांगितलं ! त्याच्या तीर्थानं बायको मेली–मुलगा तसाच मेला - पाळायला

घेतलेली दुसऱ्याची पोर— तीहि तशीच मेली. तिन्ही वेळां या देवानं मला फसविलं. गावांत ज्यांनीं डॉक्टर आणला त्यांचीं माणस बचावलीं आणि ज्यांनीं देवावर भरिभार टाकला त्यांचीं माणसं— '

आबाला पुढं बोलवेना. त्याच्या डोळ्यांतून घळघळ पाणी वाहूं लागले.

मी त्याला सभामंडपांत घेऊन आलो. थोड्या वेळानं शांत होऊन तो म्हणाला,

' पोरा, कौल देवाला लावायचा नसतो ! स्वतःच्या मनाला ! तुला शिकावंसं वाटतंय् ना ? मग देवाच्या बापाचंसुद्धा भय न बाळगतां तूं शिकायला जा. खूप खूप शीक नि लोक असल्या देवाच्या नादाला लागणार नाहीत असं कांही तरी कर ! '

लगेच त्यानं मला आपल्या घरांत नेलं आणि परचुडी करून ठेवलेले पंचवीस रुपये माझ्या हातांत ठेवून तो म्हणाला–' हे घेऊन अस्साच्या अस्सा चालायला लाग. मुंबईला जा, काम कर भीक माग, कांहीहि कर– पण शिकायचं मात्र सोडूं नकोस !

ते पंचवीस रुपये आणि एक कंदील घेऊन मी मध्यरात्रीं त्याचा निरोप घेतला. तेव्हां तो वात्सल्यानं म्हणाला, ' पोर घर सोडून जायला लागलं की बायकामाणसं त्याच्या हातावर दही घालतात; पण माझ्यासारख्या फटिंगाच्या घरांत दही कुठून असणार? थांब, मी तुला चहा करून देतों !'

त्यानं त्या मध्यरात्रीं माझ्यासाठीं मुद्दाम केलेला तो चहा अगदी कडवट होता; पण त्यानं माझं तोंड गोड केलं ! देवळाकडे जाताना मी आंधळा होतों; पण आबाचा निरोप घेऊन गाव सोडून जातांना माझे डोळे पुरे उघडले होते बारा वर्षांपूर्वी मी पहिल्यांदा मुंबईला गेलों. तेव्हा मोठा संप सुरू होता-"

*　　　*　　　*

समोरून येणाऱ्या मनुष्याकडे पाहात मीं म्हटलें, " आबाच येतोय वाटतं तुम्हाला शोधायला. "

आम्ही दोघेहि आबाच्या जवळजवळ येणाऱ्या आकृतीकडे पाहूं लागलों. सायंकालच्या मंदमधुर प्रकशांतून कुणी तरी देवदूतच पृथ्वीवर उतरत आहे असा ती आकृति पाहून मला भास झाला.

# पहिला दोहरा

मोटार सुरू झाली. माड, चहाचीं दुकानें आणि घरें मागें पडलीं.

मोटार कोपऱ्यावरून वळली. चाफ्यांच्या झाडांवरलीं पांढरीं फुलें शंकररावांना दिसलीं न दिसलीं तोंच अदृश्य झालीं.

आतां मोटार देवळावरून जात होती. शंकररावांनीं मोठ्या उत्सुकतेनें देवळाकडे पाहिलें. मोटार झर्रकन पुढें गेली तेव्हां त्यांनीं देवाला हात जोडून नमस्कार केला.

मोटार उंचसखल रस्त्यावरून धावत होती. तिच्या धक्क्याबरोबर शंकर-रावांचे शरीरच नव्हे, तर मनहि खालींवर होत होते. त्यांच्या मनांत आलें-अलीकडे पहाटे धाकटी इदू जागी होऊन हां हूं करूं लागली कीं, आपणहि जागे होत होतों. इंदूच्या त्या मधुर उद्गारांच्या जोडीनें देवळांतलीं नौबतहि आपल्या कानांवर पडे. पहाटेच्या शांत वेळीं ती नौबत ऐकून मन कसें प्रसन्न होऊन जाई ! आतां मुंबईला पहाटे नौबत कुठून ऐकूं येणार ? ट्रामगाड्यांचा खडखडाट–दूधवाल्या भय्यांच्या चढण्या-उतरण्याचा जिन्यांवर होणारा दणदण आवाज—वर्तमानपत्रें विकणाऱ्या पोरांचा आरडाओरडा---

गेल्या दहा वर्षांत शंकरराव मुंबईला तीनदां गेले होते. तिन्ही वेळा पहाटे याच आवाजांनीं त्यांची झोपमोड केली होती.

मोटारींतल्या एका म्हाताऱ्या गृहस्थांनीं शंकररावांना प्रश्न केला, "माल-वणला कोर्टांत काम आहे वाटतं ?"

" अं हं ! ! "

" मग ? "

" मुंबईला चाललोंय् मी ! "

" मुंबईला ? लगीनबिगीन आहे कीं काय कुणाचं ? "

" हं ! "

" कुणाचं ? "

" माझं ! "

म्हातारबुवा मोटारींत दाटीवाटीनें बसले होते म्हणून बरें ! नाहीं तर त्यांनीं आश्चर्यानें उडीच मारली असती !

मोटारीला फार मोठा अपघात झाल्यासारखा चेहरा करून ते वृद्ध गृहस्थ स्वस्थ बसले.

त्यांची तरी काय चूक होती ? दहा वर्षांपूर्वी त्यांनीं आपल्या हातानें शंकररावांवर अक्षता टाकल्या होत्या, आणि मागच्याच वर्षी जत्रेंतलें दारू-काम पाहायला त्या बायकोला नि तीन मुलांना घेऊन शंकरराव आले होते, हेंहि त्यांना आठवत होतें. अलीकडे थोडें कमी दिसत असून सुद्धां शंकररावांची सौभाग्यवती गरोदर आहे हें त्या वेळीं त्यांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. चार मुलें असलेल्या माणसानें एक बायको जिवंत असतांना दुसरी बायको करावयाची म्हणजे—

त्या वृद्ध गृहस्थांच्या मुद्रेकडे लक्ष जातांच शंकररावांनीं आपली जीभ चावली.

ते हसत हसत म्हणाले " कुणा बाईबिईशीं माझं लग्न ठरलं नाहीं ! "

विश्वरूपदर्शनाच्या वेळीं अर्जुनाच्या मुद्रेवर जेवढें आश्चर्य उमटलें नसेल, तेवढें म्हाताऱ्या बंडूनानांच्या चेहऱ्यावर चमकूं लागलें. त्यांच्या मनांत आलें— या शंकररावाला वेडबिड तर लागलें नाहीं ना ? लग्न तर करणार म्हणतो, नि तें बाईशीं नाहीं म्हणून वर सांगतो !

थट्टेची गोडी थोडक्यांत असते हें ओळखून शंकरराव म्हणाले, " नोकरीशीं लग्न ठरलंय् माझं बंडूनाना ! "

हातांतल्या पानाच्या शिरा काढीत काढीत प्रसन्न मुद्रेनें बंडूनाना उद्गारले—

" मुंबईला नोकरीला चाललां होय ? छान ! "

* * *

छान !

बंडूनानांचा हा शब्द शंकररावांच्या कानांत तापलेल्या तेलाप्रमाणें शिरला.

ते मनांत म्हणाले–' म्हाताऱ्या माणसांचीं मनं सुद्धां सुरकतून जातात कीं काय कुणाला ठाऊक ! बायकामुलं सोडून जातांना मला काय होतय्-कुणी· तरी काळजाचा तुकडा काढल्यासारखं कसं वाटतंय्—हें पान-तंबाखूशिवाय ज्याचं कशावरच प्रेम नाहीं त्या बंडूनानाला कसं कळणार ? '

मोटार धावतच होती.

शंकररावांचें मनहि भूतकाळांत धावूं लागलें—

उण्यापुऱ्या दहा वर्षांत आपण नि बायको सहा महिने सुद्धां एकमेकां-पासून दूर राहिलेलों नाहीं. लग्न झाल्यावर पहिल्या पहिल्यांदा घरांतलें घड्याळ रात्रीं आठ ते दहाच्या दरम्यान फार हळू चालतें असें आपल्याला वाटे. पत्नीविषयीं तशा प्रकारची ओढ आपल्याला हल्लीं वाटत नसली तरी, ती आपल्या आसपास आहे या भावनेनेंच आपल्याला किती समाधान होतें. जणूं कांहीं गर्द राईतल्या सावलीप्रमाणें तिच्या नुसत्या अस्तित्वातच सुख आहे.

पण आजपासून आपण या सुखाला पारखे झालों.

एक वेळ बायकोची आठवण विसरतां येईल. पण मुलांची ?

मुंबईत आपण कामावर जाऊं तेव्हां मुलें शाळेंत जात असणार, आपण कामावरून परत येऊं तेव्हां शाळा सुटून मुलें परत घरीं जात असणार. मुलांचे ते थवेच्या थवे पाहून आपल्याला अगदीं भडभडून येईल—

नि ज्या चाळींत आपण राहूं तिथें शेजारच्या खोलींतून एखादें मूल नसेल म्हणून कुणी सांगावें ? तें अपरात्रीं रडूं लागलें कीं, इंदू रडत आहे असें वाटून आपण जागे होऊं ! जाग आल्यावर खोलींत आपण एकटेच आहों हें पाहून आपल्याला काय वाटेल–इंदूची नि इंदूच्या आईची आपल्याला किती आठवण येईल-सारी रात्र आपण अंथरुणावर तळमळत राहूं—

छः ! उगीच पत्करली आपण ही मुंबईची नोकरी ! आपल्या मुला-बाळांत राहून मीठ-भाकरी खाण्यांत जें सुख आहे, तें एकट्यानें तूप-पोळी खाण्यांत सुद्धां नाहीं.

बंदरावर बोटींत चढायच्याऐवजीं संध्याकाळच्या मोटारनें घरीं परत जावें नि मुंबईला आपल्याला चुलतभावाला तार करावी कीं—

छे! तेंहि शक्य नाहीं. आपल्या लग्नाच्या वेळीं घरच्या शेतावर नि बागायतीवर संसार चांगला चालेल अशी आईप्रमाणें आपलीहि कल्पना होती, म्हणून तर आपण नोकरीची कुठेंच खटपट केली नाहीं.

पण आतां? दहा वर्षांत कुटुंब वाढलें; पण मिळकत कमी झाली. शेती म्हणजे माती झालीय नुसती हल्लीं! थोरल्या मुलाचें इंग्रजी शिक्षण सुरू झालें, त्याच्या पाठच्या बहिणीचे फ्रॉक शिवायला खेडयांतले शिंपी सुद्धां आठ आठ आणे मागूं लागले; सकाळपासून संध्याकाळपर्यंत चहाचें आधण चुलीवर उकळत ठेवलें नाही तर गृहस्थधर्म मोडल्यासारखा होतो—

म्हणून चुलतभावाला नोकरीची खटपट करायला आपण लिहिलें. नशिबानें नोकरी मिळाली; पण—

शकररावांच्या विचाराची कथा पुन्हा मूळ पदावर आली.

गेलीं दहा वर्षें कुटुंब हेंच त्यांचें जग झालें होतें. ते कधीं वर्तमानपत्रांतलें जोतिषसुद्धां वाचीत नसत; मग इतर वाचनाची गोष्ट दूरच राहिली. गांवांतल्या पत्त्याच्या अडयावर ते जसे कधीं दिसले नव्हते, त्याप्रमाणें देवळांतल्या गांवकऱ्यांच्या भांडणांतहि त्यांनीं कधीं भाग घेतला नव्हता! त्यांचें त्रिभुवन घरांत साठलेलें होतें.

मोटार खर्रर्र आवाज करीत एकदम थांबली. एक मांजर आडवें आलें होतें. शकररावांनीं रस्त्यावरून हळूहळू जाणाऱ्या त्या हडकुळया मांजराकडे पाहिलें. डाव्या बाजूला असलेल्या घराच्या पायरीवर जाऊन तें बसलें. त्या घराच्या दाराला कुलूप आहे हें मोटारींतूनहि दिसत होतें.

रस्त्यानें जाणारा एक मनुष्य त्या मांजराकडे पाहून हसला आणि म्हणाला, " पंधरा दिवस झाले. घराला टाळं लागलंय; पण हें मांजर कांहीं हालत नाहीं दारांतनं! "

* * *

बंदरावर पोंचल्यावरसुद्धां शंकररावांना राहून राहून त्या मांजराची आठवण होत होती!

बोट यायला अजून तब्बल दोन तास अवकाश होता. शंकररावांच्या डोळ्यापुढें आपलें घर उभें राहिलें. आपली पत्नी या वेळीं मुलांना वाढीत असेल, तीं आपली आठवण करून रडत असतील, 'ते मुंबईहून खूप खूप खाऊ घेऊन येणार आहेत' म्हणून आपली बायको त्यांची समजूत घालीत असेल ---

असंख्य नाजुक आठवणींनीं त्यांचें मन व्याकुळ होऊन गेलें.

एका प्रवाश्याच्या सामानांत एक पोपट होता. शंकरराव त्याच्यापुढें जाऊन उभे राहिले. ते मोठ्या कुतूहलानें पोपटाकडे पाहात आहेत असें दिसतांच त्याचा मालक म्हणाला, "दार उघडलंत तरी उडून जाणार नाही हा! दोनदां मीं त्याला सोडलं होतं. पण आपणहून तो पिंजऱ्यांत परत आला. फार माया आहे त्याची माझ्यावर! होय की नाही रे विठू!"

"होय साहेब!" विठूनें उत्तर दिलें.

* *

बोट चालूं लागल्यावर समुद्राच्या पाण्याप्रमाणें शंकररावांच्या मनांतहि खळबळ सुरू होती.

कठड्याला टेकून ते किती तरी वेळ शून्य दृष्टीनें किनाऱ्याकडे पहात होते त्यांच्या पलीकडेच तो पोपटाचा पिंजरा होता. पिंजऱ्यांत दांडीवर बसलेला तो पोपट आपल्यापेक्षां सुखी आहे असे त्यांना वाटलें.

एका जागीं उभें राहवेना म्हणून ते इकडे तिकडे फिरूं लागले. मधेंच बोटीच्या हेलकाव्याबरोबर तोल जाऊन त्यांचा पाय एका म्हाताऱ्या ख्रिश्चन मनुष्याला लागला. त्यांनीं वाकून नमस्कार करतांच तो म्हातारा हसला.

शंकररावांनीं विचारलें,

"कुठें चालला आजोबा?"

"मुंबईला! जमलं तर आफ्रिकेला जाणार आहे तिथनं!"

"आफ्रिकेला?"

"हं!"

म्हाताऱ्यानें पोटाकडे बोट दाखविलें नि तो मोठ्यानें हसला. एकहि दांत

नसलेल्या त्या म्हाताऱ्याचें हसणें शंकररावांना आपल्या इंदूच्या हसण्या-इतकें मोहक वाटलें.

* * *

ते थोडेसे पुढें गेले तोंच त्याना हाक ऐकूं आली—

" साहेब—"

त्यांनीं मागें वळून पाहिलें. मळकट धोतराचा काचा कसलेला आणि अंगांत कसल्या तरी भिकार कापडाचा नेहरू शर्ट असलेला एक मनुष्य त्यांना दिसला. त्याच्या हातांत चुरगळलेल्या गांधी टोपीबरोबरच दहा बारा पुस्तकेंहि होतीं.

पुढें येऊन तो गोड स्वरानें म्हणाला.

" साहेब, पुस्तकं हवींत का ?"

शंकररावांच्या तोंडून उत्तर यायच्या आधींच त्यानें दोन चार छोटीं छोटीं पुस्तकें त्यांच्या हातांत ठेवलीं. त्यांचीं नांवें पाहून तीं परत करीत शंकरराव म्हणाले, " मला हिंदी येत नाही बाबा ! "

" मला तरी मराठी कुठं येत होतं साहेब ? पण तीन चार वर्षें या मुलखांत काढलीं— "

" गांव कुठं आहे तुमचं ? "

" तिकडं दिल्लीकडं एक खेडं आहे साहेब ! "

" इतक्या दूर कशालां आला ? "

मघांच्या त्या खिश्चन म्हाताऱ्याप्रमाणें हा हिंदी मनुष्यही पोटाकडे बो दाखवून हसला !

" घरीं कुणीं नाहीं वाटतं ! "

" आई आहे, बायको आहे, एक छोकरा आहे—"

' छोकरा ? केवढासा आहे ? "

" आहे चार वर्षांचा ! "

" किती दिवसांनीं मुलाला भेटायला जाता ? "

"तीन वर्षांत एकदांही गेलों नाहीं साहेब ! भाड्यांत जे पैसे खर्च करायचे ते मी बाजूला काढून ठेवतों नि पोराला खेळणीं पाठवितों, कपडे पाठवितों!"

" त्याला पहावसं वाटत नाहीं तुम्हांला ? "

" त्याला डोळे भरून पाहिल्यावांचून झोंपच येत नाहीं मला साहेब!"

शंकरराव त्याच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागले.

त्यानें आपल्या शर्टच्या खिशांतून एक लहानसा फोटो, बाहेर काढला नि तो शंकररावांच्यापुढें धरून तो म्हणाला,

" हा पाहिलांत का माझा छोकरा ? "

त्या फोटोकडे आणि पुस्तकें विकून पोट भरणाऱ्या माणसाकडे आळी-पाळीनें पाहत शंकरराव म्हणाले, ' एक सोपसं हिंदी पुस्तक द्या मला ! '

" हें दोहऱ्याचं पुस्तक फार गोड आहे साहेब ! एक एक दोहरा म्हणजे — हा पहिलाच दोहरा ऐका —"

खड्या आवाजांत दोहरा म्हणून तो त्याचा अर्थ सांगूं लागला —

" प्रीति म्हणजे मोह नव्हे. प्रीति म्हणजे भोग नव्हे. प्रीति म्हणजे भक्ति! प्रीति म्हणजे त्याग. "

प्रभू रामचंद्रानें लहानपणीं राज्याचा आणि तरुणपणीं पत्नीचा त्याग केला, तो कांहीं उगीच नाहीं ! "

# सरस्वती

गप्पा आणि वावटळ यांची तुलना करायला कवि तर धजणार नाहीच; पण एखाद्या विनोदी लेखकाने सुद्धा या दोन्हींतलें साम्य अद्यापि कसें दाखविलें नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें.

वावटळीप्रमाणें गप्पाहि कुठें भरकटत जातील याचा नेम नसतो ! आमच्याच क्लबांतली गोष्ट घ्या ना ! दिवाळींत क्लबाच्या सर्व सभासदांनीं एक मेजवानी झोडायचें ठरवलें. मेजवानीला कोणतें पक्वान्न करावें याविषयीं एवढी दंगल झाली, कीं तेवढी कुठल्याहि गावांतल्या म्युनिसिपल निवडणूकींत सुद्धा होत नसेल. शेवटीं श्रीखंडपुरीला अधिक मतें पडून ती निवडून आली. पक्वान्न निश्चित झाल्यावर दिवसाचा प्रश्न उद्भवला. अमावास्या व्यापाऱ्यांना सोयिस्कर नव्हती, प्रतिपदेच्या दिवशीं आपण घरीं जेवलों नाहीं तर आपल्याला घरांत पाऊल टाकायची सोय उरणार नाहीं अशी अनेक पतिराजांनीं तक्रार केली; आणि भाऊबीज—

भाऊबिजेला तर बहुतेकांना आपल्या बहिणीच्या घरीं जायचें होतें.

झालें. भाऊबिजेवरून गप्पांना सुरवात झाली. एकाने भाऊ आणि बहीण यांचेंच इतकें प्रेम कां असावें, बहिणीबहिणीमधें अशा प्रकारचें प्रेम कां असूं नये, अशी शंका काढली. त्या शंकेचें निरसन करण्याकरितां अनेक विद्वान वीर पुढें सरसावले. एकाने फ्रॉइडविषयीच्या गप्पा मारून

भाऊ आणि बहिण यांच्यांतच अधिक आकर्षण असतें असें सांगितलें. दुसऱ्यानें पुरुष हा पैसे मिळविणारा प्राणी असल्यामुळें त्यानें आपलें प्रेम व्यक्त करण्याकरितां भाऊबिजेला बहिणीला ओवाळणी घालण्याची पद्धत सुरू केली असें सिद्ध केलें. तिसऱ्या सनातनी गृहस्थांनीं " दहा पुरुष एकत्र नांदतील; पण दोन बायकांचं मात्र कधींहि पटायचं नाहीं " या म्हणीचा आधार घेऊन बहीण बहिणीवर प्रेम करीत नाहीं असा सिद्धांत मांडला. या तिघांचें बोलणें ऐकतांना मला मोठी मौज तर वाटलीच; शिवाय त्या भलत्याच वादविवादांत मेजवानीचा दिवस नक्की करावयाचें कुणालाहि भान राहिलें नाहीं, हें पाहून मला हसूंहि आलें. पण क्लबांतून बाहेर पडून नेहमींप्रमाणें मी एकटाच फिरायला गेलों मात्र; पाण्यात दाबून ठेवलेलें बूच हात सोडतांच वर येऊन तरंगूं लागावें तसा एकच प्रश्न माझ्या मनापुढें पुनः पुन्हा उभा राहू लागला—व्यवहारांत काय किंवा वाङ्मयांत काय, भावाचें बहिणीवरलें प्रेम आपल्याला नेहमीं पाहावयाला मिळतें. पण एका बहिणीचें दुसऱ्या बहिणीवरलें प्रेम—माझ्या आवडत्या कादंबऱ्या, गोष्टी आणि नाटकें यांचीं कथानकें झरझर माझ्या डोळ्यांपुढून जाऊं लागलीं. चंद्रज्योत जळतांना मोठी सुंदर दिसते; पण ती जळून गेली की तिचें सौंदर्य लोप पावतें. माझीं आवडतीं कथानकें मला तशींच वाटूं लागलीं. त्याच्यांत कल्पनाचातुर्य होतें, भावमाधुर्य होतें—सर्व कांही होतें; पण ज्या एका साध्या प्रश्नाचें उत्तर मी शोधीत होतों तें मात्र मला कुठेच मिळत नव्हतें. आजपर्यंत भावांनीं बहिणींना नाना तऱ्हांच्या ओवाळण्या घातल्या असतील; पण बहिणीने बहिणीला कधी तरी ओवाळणी घातली असेल काय ?

माझ्या आवडत्या जागीं बसून किती तरी वेळ मी या एकाच प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न करीत होतों. हळूहळू माझ्याभोवती काळोख पडूं लागला. मीं सहज मान वर करून पाहिलें. समोर एक सुंदर चांदणी चमकत होती. माझ्या मनांत आलें–बहिणीचें बहिणीवरलें प्रेमहि असेंच असण्याचा संभव आहे. कुठे आपली पृथ्वी नि कुठे ही चांदणी! दोघींच्यामध्यें केवढें मोठें अंतर ! पण एवढ्या दुरूनहि ही चांदणी अंधारांत भांबावून गेलेल्या पृथ्वीला प्रकाश देण्याचा प्रयत्न करीत आहे.

या कल्पनेनें मला बरें वाटलें. पण तें क्षणभरच! झोपेचें औषध घेतल्यावर रोग्याला जशी गुंगी येते, तशीच–अगदी तश्शी कल्पनेची मोहिनी असते. पण ती मोहिनी दूर झाली कीं—

घरीं येईपर्यंत मी या एकाच प्रश्नाचा विचार करीत होतों. माझ्या ओळखीच्या पुष्कळ कुटुंबांची मीं आठवण करून पाहिली. त्यांतल्या बहिणीबहिणीचें लहानपणचें प्रेम मला स्पष्ट दिसत होतें. पण त्यांचें मोठे-पणींचें प्रेम? लग्न झाल्यावर प्रत्येक मुलगी आपल्या संसारांत गुंग होते हेंच खरें! समुद्राला मिळून गेलेल्या नदीला डोंगरावरल्या सुंदर दृश्यांची आठवण राहिली नाहीं तर त्यांत नवल तें कसलें?

घराच्या पायऱ्या चढतां चढतां माझ्या मनांत आलें–आपण उगीच इतका वेळ या प्रश्नाचा विचार करून डोकें शिणविलें. आपल्या आईचें आयुष्यच या प्रश्नाचें उघड उघड उत्तर देत आहे. मग—

आईचा स्वभाव किती प्रेमळ आहे याची मीच काय, पण सारं गांव खात्री देईल. बाबा इतके तापट असूनहि ती त्यांच्या आठवणी सांगू लागली म्हणजे तिचें मन किती हळवें आहे याची कल्पना येते. अर्धांगवायूनें दोनतीन वर्षें अंथरुणावर रखडून बाबा वारले. या तीन वर्षांत त्यांचा स्वभाव किती त्रासिक आणि चिडखोर झाला होता! पण त्या तीन वर्षांत आईने हूं की चू न करतां त्यांची अगदी मनोभावानें सेवा केली.

आईचें माझ्यावरलें प्रेम...मी टायफॉइडनें आजारी होतों तेव्हां ती देवाची प्रार्थना करी, "माझं उरलेलं आयुष्य घे त्यांतल्या प्रत्येक वर्षाचा हवा तर महिना कर; पण तें सारं, सारं आयुष्य माझ्या बाळाला दे!" तिचे हे उद्‌गार ऐकूनच माझ्या खोलीच्या दारांत येऊन उभा राहिलेला मृत्यु मुकाट्याने माघार घेऊन गेला असावा!

आईनें कुणा शेजाऱ्यापाजाऱ्याला कधी विन्मुख पाठविलें नाहीं. एक सोडून दहा पाहुणे आले तरी कपाळाला आठी घातली नाहीं. पण! पण तिने सुधामावशीला कधीहि घरीं राहायला बोलावलें नाहीं. समाजसेविका म्हणून मावशीचे फोटो वर्तमानपत्रांतून येत असतांना ती जिवंत असेपर्यंत तिचा एकसुद्धा फोटो घरांत लावला नाहीं. आपल्याला एक बहीण होती

याची तिला आठवणच नसावी असें तिच्या बोलण्यावरून नेहमीं वाटे. असें कां बरें व्हावें ?

सुधामावशी बालविधवा होती, आईची धाकटी बहीण होती, आईशिवाय तिला जवळचें दुसरें कुणीहि नव्हतें, आणि असें असून मला कळूं लागल्यापासून मावशी कधीहि आमच्या घरीं आलेली मला आठवत नाही! मी मोठा झालों, मिळवता झालों की मावशीला मुद्दाम घरीं आणायचें असे मोठमोठे मनोरे बालपणीं मी मनांत उभारीत असे! पण माणसाच्या मनांतले मनोरे गगनचुंबी असले तरी काळाच्या एका फुंकरीसरशी ते जमीनदोस्त होतात! माझा कॉलेज-कोर्स संपण्यापूर्वीच सुधामावशी कालवश झाली. मी हळूहळू तिची आठवण विसरून गेलों. आईहि सहसा तिचा उल्लेख करीत नसे!

आज माझें जेवणावर लक्ष नाही असें पाहतांच आई हसून म्हणाली, "काय रे, आज चित्त कुठं गेलंय् ?"

"भटकतंय् !"

"उगीच ?"

"अंहं ! शोधायला !"

मी गप्प बसलों असें पाहून ती हसत हसत म्हणाली, "एखादी मुलगी शोधायला असेल ?"

"छेः !"

"कोशांत 'छेः' चे काय काय अर्थ दिलेले असतात रे ?"

मी पाहातच राहिलों !

आईला आज माझी थट्टा करण्याची चांगलीच लहर आली होती! ती म्हणाली, "बायकांच्या 'इश्श' चे निरनिराळे अर्थ होतात ना ? तसेच पुरुषांच्या 'छेः' चेहि होतात !"

"माझ्या 'छेः' चा काय अर्थ केला आहेस तूं ?"

"सांगूं ?"

"हूं !"

"छेः म्हणजे होय !"

" वा: ! अर्थाचा अनर्थ करते आहेस तूं ! "

अम्ही दोघेंहि खूप हसलों. हसण्याचा भर ओसरल्यावर मला संध्याकाळपासून भंडावून सोडणारी ती शंका मीं तिला सांगितली नि म्हणालों, " बहिणीचं बहिणीवर प्रेम नसतं हेंच खरं ! "

" तुम्ही लेखक म्हणजे..."

" जगाला सत्य सांगण्याची जबाबदारी आमच्यावरच आहे ! "

" पण जी गोष्ट तुम्ही सांगतां, ती कधी नीट पाहतां तरी का ? "

" हो ! "

" तुला हा सिद्धान्त कुणावरनं सुचला तें तरी कळूं दे ! "

" कुणावरनं ? " मी हसत उत्तरलों, " तुझ्यावरनंच ! "

आई माझ्याकडे पाहतच राहिली ! स्वप्नांत कांहीं तरी भयंकर दिसलें म्हणजे मनुष्य घाबरून डोळे उघडून ज्या विचित्र दृष्टीनें पाहूं लागतो, ती या वेळीं आईच्या डोळ्यांत दिसत होती. मात्र तिच्या तोंडांतून एकहि शब्द बाहेर पडला नाहीं.

आता मला माघार घेणें शक्यच नव्हतें.

मी म्हणालों, " तूं नि सुधामावशी सख्ख्या बहिणी ना ? "

" हो ! "

" तुमचं दोघींचं एकमेकींवर प्रेम असतं तर मावशी आमच्या घरीं वरचेवर आली असती. निदान शेवटच्या आजारांत तरी बहिणीच्या मांडीवर डोकं ठेवून प्राण सोडावा अशी इच्छा तिच्या मनांत उत्पन्न झाली असती."

माझ्यांतला लेखक आणखी काय काय बडबडत राहिला असता कुणाला ठाऊक !

आईचे डोळे भरून आले होते.

डोळ्यांतलें पाणी पुसण्याकरिता तिने मान वळविली. माझ्या मनाला विलक्षण चटका बसला ! नकळत मीं आईच्या जिव्हारीं जखम केली होती ! लेखकाला अद्‌भुत तत्त्वांची टांकसाळ उघडण्याची जी लहर येते तिला मी बळी पडलों की काय हें मला कळेना ! जगाला कांहीं तरी नवीन सांगण्याच्या अभिनिवेशांत—

आईने डोळे पुसले आणि ती उठून गेली.

हात धुऊन मी जड पावलांनी माझ्या खोलींत आलों.

समोरच्या सुंदर छायाचित्राकडे मीं पाहिलें—गंगा–यमुनांचा सुंदर संगम होता तो; पण चित्राचें नांव मात्र होतें 'त्रिवेणीसंगम.' तें नांव वाचून मला नेहमीप्रमाणें हसू आलें.

इतक्यांत आई आंत आली. तिच्या हातांत एक चंदनाची पेटी होती. घरांतल्या दागिन्यांच्या ट्रंकेंत ती मीं पुष्कळ वेळां पाहिली होती; पण तिच्यांत काय आहे हें मीं आईला कधींच विचारलें नव्हते. ती पेटी दिसली की मी मनांत म्हणत असे—सुनेच्या अंगावर घालायला एखादा सुंदर दागिना आईने या पेटींत ठेवला असेल. माझ्या लग्नदिवशीं तो बाहेर काढून मला चकित करायचा तिचा बेत असावा! त्या पेटींत काय आहे हें विचारून तिचा हा भावी आनंद नाहींसा करण्यांत काय अर्थ आहे?

यामुळें आई ती पेटी घेऊन या वेळीं माझ्या खोलींत कां आली हें कांहीं केल्या माझ्या लक्षांत येईना!

वाटलें—त्या पेटींत सुधामावशीचे दागिने असतील. तिने ते आईला दिले असावेत. बहिणीचें बहिणीवर प्रेम नसतें असें मघाशी मी बोलून गेलों ना? माझें तें म्हणणें खोडून काढण्याकरिता आई ही पेटी घेऊन—

लगेच मनांत आलें, बाबांची स्थिति नेहमींच चांगली होती, मग मावशीनें आईला दागिने देण्याचें कारण काय? आणि बालविधवा असल्यामुळें तिने ते दिले तरी आईने ते घेतले कसे? मावशीला गोरगरिबांच्याकरिता ते खर्च करतां आले असते!

पेटीवर किल्ली ठेवून आईने माझ्याकडे पाहिलें. ऊनपावसाप्रमाणें तिची मूक दृष्टि मला वाटली. त्या दृष्टींत हास्य होतें आणि कारुण्यहि होतें.

माझ्याशीं अवाक्षरहि न बोलतां आई हळूहळू निघून गेली.

ती चंदनाची पेटी, तिच्यावरली ती छोटी किल्ली—

मीं किल्ली हातांत घेतली; पण कांहीं केल्या ती पेटी उघडण्याचा मला धीर होईना.

लहानपणीं 'अलीबाबा आणि चाळीस चोर' ही माझी फार आवडती

गोष्ट होती. त्या गोष्टींत ' तिळा उघड ' असें म्हटल्याबरोबर गुहेचा दरवाजा उघडतो. तो उघडल्याबरोबर अलीबाबाची जी विचित्र मनःस्थिति झाली असेल तिचा पुरा पुरा अनुभव या वेळीं मला आला.

संशय हा कटु सत्यापेक्षाहि अधिक दाहक असतो नाहीं ? त्यामुळें गोंधळलेल्या मनःस्थितींत मीं एकदा ती किल्ली कशीबशी फिरविली आणि पेटीचें झाकण उघडलें—

वरच एका तरुणीचा लहानसा फोटो होता. तिच्या कपाळाला कुंकू नव्हतें. पण तिचा चेहरा इतका आकर्षक होता, की—

मी सौंदर्याच्या दृष्टीनें त्या फोटोकडे पाहत होतों. एकदम माझें अंग शिरशिरलें ! हा मावशीचा तरुणपणींचा फोटो तर नसेल ? समाजसेविका म्हणून प्रसिद्ध होणारे तिचे सारे फोटो प्रौढपणींचे होते. पण हा फोटो... फोटोंतली तरुणी सतराअठरा वर्षांचीच असली तरी तिचे डोळे, तिच्या जिवणीची ठेवण, सारेंसारें हुबेहूब मावशीसारखें होतें.

आईपाशीं मावशीचा हा फोटो असून तिने तो मला कधींच कां दाखवला नाहीं ? मावशी नि आई यांचें एकमेकींकडे जाणें-येणेंहि नव्हतें. या परकेपणाच्या मुळाशीं मावशीचें एकादें विचित्र रहस्य—

अधीरपणानें तो फोटो बाजूला ठेवून पेटींत काय आहे तें मीं पाहिलें. दोन पत्रें होतीं तिथें ! मीं वरचेंच पाकीट घाईघाईनें उचललें आणि आंतलें पत्र बाहेर काढून तें उघडलें.

त्या पत्रांतलें अक्षर पाहतांच मला विजेचा धक्का बसला !

बाबांचें अक्षर होतें तें !

चंदनाच्या पेटींत आईनें गुप्तपणें ठेवलेला मावशीचा फोटो, त्याच्या खालीं बाबांचें पत्र आणि त्या पत्राचा आरंभ तरी काय होता ? 'प्रिय सुधा—'

उन्हाने भोवळ यावी तसें मला झालें. पांचदहा मिनिटें तें पत्र हातांत घेऊन मी तसाच बसलों. घरांतल्या बिळांत साप आहे असें समजल्यावर माणसाच्या मनाची जी स्थिति होईल तिचा या पांचदहा मिनिटांत मी अनुभव घेतला.

शेवटीं धीर धरून मीं तें पत्र झरझर वाचलें. ' कुतर्क कधीं खोटा ठरत नाहीं ' या वाक्याची मला खात्री पटली.

तें प्रेमपत्र होतें—बाबांनीं सुधामावशीला लिहिलेलें प्रेमपत्र होतें. त्यांत आईचा उल्लेख बाबांनीं इतक्या तुच्छतेनें केला होता, की—

एकाद्या देवळांतल्या मूर्तीची भक्तानें आंधळेपणानें पूजा करावी आणि डोळे उघडून पाहतांच ती मूर्ति देवाची नसून राक्षसाची आहे असें त्याला आढळून यावें—अगदीं तश्शी माझी स्थिति झाली! अशा राक्षसाबरोबर संसार करण्यापेक्षां आई त्याला सोडून दूर कां गेली नाहीं याचें—

बाबांचें तें प्रेमपत्र दूर भिरकावून देऊन मीं पेटींतलें तें दुसरें पत्र उचललें.

त्या पत्राचें अक्षर मोत्यासारखें सुंदर होतें; पण तें यापूर्वी मीं कधींच पाहिलें नव्हतें. मीं पत्राच्या खालचें नांव वाचलें—

"तुझी <u>बहीण</u>

सुधा"

'बहीण' या शब्दाखालीं आडवी रेघ मारलेली पाहून मला परीक्षेंतल्या व्याकरण चालविण्याच्या प्रश्नाची आठवण झाली. मनांत आलें, आपण बहीण आहों हें जिला बजावून सांगावें लागतें ती बाई आईशीं कशी वागली असेल हें सांगायला कांहीं ज्योतिष्याची जरूरी नाहीं. तिचें नि बाबांचें वर्तन आईला असह्य झालें असेल, आईनें तिला घरांतून घालवून दिलें असेल आणि मग शेवटीं पश्चात्तापाचें नाटक करण्याकरितां तिनें हें पत्र आईला लिहिलें असेल.

बिचारी भोळी आई!

मावशीचें हें पत्र अगदीं जपून ठेवलें आहे तिनें!

लगेच मला आठवलें—बहिणीचें बहिणीवर प्रेम नसतें हा माझा सिद्धांत खोडून टाकण्याकरितां आई ही चंदनाची पेटी घेऊन आली. तेव्हां—

मी लगबगीने सुधामावशीचें पत्र वाचूं लागलों—

"ती. आक्काला सुधेचा शिरसाष्टांग नमस्कार.

आक्का, बाहेर मध्यरात्रीचा काळोख पसरला आहे. माझ्या मनांतहि तसाच काळोख दाटला आहे. बाहेरच्या काळोखाला उजाळा देण्याकरितां लाखो चांदण्या चमकत आहेत. पण माझ्या मनांतला काळोख निवळायला कालपर्यंत तिथें एकसुद्धां चांदणी दिसत नव्हती. पण आज—आतां मात्र

चिमुकली चंद्रकोर —

आज भाऊबीज आहे, नाहीं ?

हें वाचून सुधेला वेड तर लागलें नाहीं ना, असें तुझ्या मनांत येईल. तुला सारें सारें सांगावेसें वाटतें—अगदीं मनांतल्या साऱ्या गोष्टी ओकून टाकाव्याशा वाटतात. पण—

सुग्रास अन्नांत माशी गेली तर तें सारें अन्न भडाभड ओकून पडतें; पण माणसाच्या मनांत जीं पापें शिरतात तीं मात्र-तीं आंतल्या आंत डाचतात, पण कांहीं केल्या बाहेर मात्र पडत नाहींत !

तुझ्या पतिराजांचें माझ्यावरलें प्रेम आणि माझें त्यांच्यावरचें प्रेम—मीं त्यांना मुळीच उत्तेजन दिलें नाही असें कसें म्हणूं ? दोन अवखळ मुलांनी एकमेकांच्या धीरावर किर्र जंगलांत जावें तसें झालें आमचें. आमचेंच काय, साऱ्या माणसांचें असेंच होत असेल !

ज्यांना आपण पापी म्हणतों तींहि माणसेंच असतात ! स्वतःचें समर्थन करण्याकरिता मी हें सांगत नाही आक्का ! हवेवांचून ज्योत जळत नाही ना ? दुसऱ्याच्या धीरावांचून पापाची ज्वालाहि कधी भडकत नाही.

आक्का, आई मला आठवतच नाही. तूंच माझी आई. तुझ्या नि माझ्या वयांत सातआठ वर्षांचेंच अंतर आहे. पण अजून मला वाटतें— तुझ्या कुशींत तोंड लपवून खूपखूप रडावें, तूं मला पोटाशीं धरून माझ्या केसांवरून हात फिरवावास, माझें तोंड वर उचलून माझे डोळे पुसावेस आणि लहानपणीं मीं कांही तरी हट्ट धरला की जशी प्रेमाने 'वेडी कुठली !' असे उद्गार काढीत होतीस तसे कांही तरी लाडकेपणाचें बोलणें तुझ्या तोंडांतून बाहेर पडावें !

पण—

तुला माझा तिटकारा आला असेल, माझें तोंड पाहूं नये असें वाटत असेल. दुर्दैवाने अक्षता पडल्यापासून महिन्याच्या आंतच माझें कुंकू नाहीसें झालें, पण तूं मला धीर दिलास. शिकून हवा तर पुनर्विवाह कर, हवी तर समाजसेवा कर म्हणून सांगितलेंस. मी विधवा आहे याची मला क्षणभरहि जाणीव होऊं नये अशी काळजी घेतलीस. पण—

आक्का, गेलीं दोन वर्षे तूं एकसारखी आजारी पडली नसतीस, अशक्त आणि चिरचिरी झाली नसतीस तर—

लहानपणीं बुद्धिबळाचा डाव पाहण्यांत मला मोठी गंमत वाटे. त्यांत राजाला शह देऊन अडवितात ना? नशीबहि माणसाला असाच शह देऊन त्याचा कोंडमारा करतें.

तूं सदान्‌कदा आपल्या आजाराच्या काळजींत; पण त्याचमुळे आम्हां मेव्हणामेव्हणींचा सहवास अधिक अधिक होऊं लागला. गावांत गंधर्व नाटक मंडळी आली. तुला जाग्रण सहन होत नाही म्हणून तूं नाटकाला यायचें नाकारलेंस. आम्ही दोघेच गेलों. 'मानापमान' नाटक होतें त्या दिवशीं. त्यांतली वनमाला धैर्यधराचे चढाव पुसूं लागते तो प्रसंग—त्या प्रसंगाने माझें मन फुलून गेलें. आपल्याला हा गोड अनुभव कधीच येणार नाही म्हणून तें बेचैन झालें.

नाटकाहून परत येतांना त्यांनी माझा हात हातांत घेतला. मीं तो तिथें राहूं दिला.

आक्का, रागावूं नकोस. माणूस फार लवकर शरिराचा गुलाम होतो. पण सुखाची ओढ—फरपटत धडपडत पापाच्या गर्तेत जाऊन पडण्याची ही ओढ आहे हें मला कळत नव्हतें असें नाही.

पण—

"गेले सहा महिने आमचें रहस्य वाढत गेलें. त्यांनी मुद्दाम माझा एक फोटो काढवून आपल्या टेबलावर ठेवला. तूं तो तिथून उचलून नेलास. ते मला म्हणाले, 'माझ्या टेबलावरला तुझा फोटो तिनं फेकून दिला तरी माझ्या मनांतली तुझी मूर्ति कांही— '

आक्का, क्षमा कर मला! ते असले कांही बोलूं लागले, की मला आनंद होत होता. अगदी मघापर्यंत-आज संध्याकाळपर्यंत मला आनंद होत होता.

संध्याकाळीं ते नि मी फिरायला गेलों. त्यांनी माझ्यापाशीं लग्नाचें वचन मागितलें. मीं तें दिलें. बहिणीची सवत व्हायचें मीं कबूल केलें. मी तुझ्या सुखाची चोरी करीत आहे हें मला कळत होतें. पण—

एक जुनी गोष्ट आहे बघ. फार मोठा दुष्काळ पडला होता. विश्वामित्र

ऋषीला किती तरी दिवसांत कांही खायला मिळालें नाहीं. शेवटीं तो चोरून एका चांभाराच्या झोपडींत शिरला. त्याच्या हाताला एका मेलेल्या कुत्र्याची तंगडी लागली, तीच चोखायला त्याने सुरुवात केली.

प्रेमाच्या बाबतींतहि माझी हीच स्थिति झाली.

रात्र पडल्यावर आम्ही घरीं परतलों. आभाळांत बीजेची कोर मोठी सुंदर दिसत होती. जणूं कांही मोत्यांनी फुलविलेलें गवताचें पातेंच. त्या चंद्रकोरीकडे पाहतां पाहतां मला भाऊबिजेची आठवण झाली. रस्त्याच्या बाजूच्या प्रत्येक घरांत भाऊबिजेची धांदल चालली होती. माझ्या डोळयांपुढे एक सुंदर चित्र उभें राहिलें. ती रांगोळी–तीं तबकांतलीं नीरांजनें–ती ओवाळणी—आपल्याला भाऊ असता तर किती किती बरें झालें असतें असें सारखें वाटूं लागलें.

रस्त्यावर मुलें फुलबाजे उडवत होतीं. त्यांतून चमकत चमकत उडणाऱ्या फुलांप्रमाणे माझ्या मनांतहि कल्पना उसळत होत्या.

मला वाटलें—मीं आक्काची बहीण झालें, ती भाऊ झालें असतें तर–आज मी आक्काच्या घरीं तर तिच्याकडून ओवाळून घ्यायला आणि तिला ओवाळणी घालायला—

माझ्या आक्काला काय बरें ओवाळणी आवडली असती ?

ती म्हणाली असती, ‘ मला दुसरं कांही नकोय् ! एक कवटाळीण माझ्या नवऱ्याला भुलवून .. ते मला परत मिळतील असें कर. एवढी ओवाळणी घाल मला ! ’

ती कवटाळीण—!

मीच ती कवटाळीण होते. मग—

माझ्या आक्काने मागितलेली ओवाळणी मी तिला घालायला नको का ?

आक्का, तुला न सांगतां, तुझा निरोप न घेतां मी निघून जात आहे म्हणून रागावूं नकोस. मी कितीहि दूर गेले तरी तुझी बहीणच आहे. तुला सुख व्हावें म्हणून—

मी तुझ्या घरीं पुन्हा परत येणार नाही. शेवाळयाचा रंग किती सुंदर दिसतो ! पण तें इतकें निसरडें असतें, की—मोहहि तसाच आहे.

माझें सुख--ज्यांचा हार होतो तीं फुलें सुखी असतात आणि जीं देवाला वाहिलीं जातात तीं दु:खी असतात असें थोडेंच आहे !

खूप खूप लिहावेसें वाटतेंय्. पण—

तो मोह नकोच.

तुझी बहीण

सुधा ”

* * *

पत्र संपवून मीं समोर पाहिलें. त्रिवेणीसंगमाच्या त्या चित्राकडे माझी दृष्टि गेली. तें नांव मला अगदी सार्थ वाटलें. जगांतल्या सर्व उच्च नि उदात्त गोष्टी सरस्वतीप्रमाणे गुप्त असतात असेंच माझ्या पुढ्यांतली ती चंदनाची पेटी सांगत होती.

# स्वप्न आणि जीवन

नित्यनियमाप्रमाणें चहा, दाढी, आंघोळ, दुसरा चहा इत्यादि प्रातःकर्मे उरकून आज शाळेंत काय काय शिकवायचें आहे हें पाहण्याकरिता मी पुस्तकें चाळूं लागलों.

इंग्लिशच्या तासाला एक लघुनिबंध शिकवायचा होता! मीं त्याच्यावरून दृष्टी फिरविली. त्यांतलें एक वाक्य मोठें गमतीचें वाटलें मला—

'We may be kings or queens, princes, potentates or pioneers, but daily life, when all is said and done, is for the most part just getting up in the morning, eating, drinking, making merry with our friends, working and going to bed at night hoping for at least six hours' sleep.'

माझ्या मनांत आलें, हा निबंधकार म्हणतो तें एका दृष्टीनें किती खरें आहे! राजा झाला तरी त्याला सकाळीं अंथरुणांतून उठावेंच लागतें, दाढी करावीच लागते, चहा घ्यावाच लागतो? हो, दिवाणाच्या तोंडांत चहा ओतून कांही राजाची चहाची तलफ भागत नाही! आणि माझ्यासारखें पांच तास खुर्चीत बसून टेबलावर छडी आपटण्याचें काम त्याला करावें लागत नसलें, तरी राजवस्त्रें अंगावर घालून दरबारांत दगडी पुतळ्याप्रमाणे

बसण्याची व सार्वजनिक समारंभांना हजर राहण्याची जबाबदारी त्याच्यावर असतेच की नाही ?

म्हणजे सुख कांही श्रीमंतीवर अथवा सत्तेवर अवलंबून नाही. वळवाच्या पावसांतून केव्हा तरी गारा पडतात तशी कांही आयुष्यांतलीं सुखें नसतात! सुखें हीं दवबिंदूप्रमाणे असतात. उन्हाळयांत सुद्धा पहाटे झाडांच्या पानांवर दव पडलेलें दिसतें ना ? दारिद्र्यांत देखील सुखसुद्धा तसेंच हसत असतें ! तें पाहण्याची दृष्टि मात्र माणसाला हवी ! उदाहरणार्थ—

उदाहरण शोधायला दूर कशाला जायला हवें ? आपला अनंत !

मी मोठ्या अभिमानानें अनंताच्या आयुष्याशीं माझ्या जीवनाची तुलना करूं लागलों. बी. ए. पास होतांच मिळेल ती नोकरी पतकरायची असें मी ठरविलें. पन्नास रुपयांवर मास्तर होऊन सहा वर्षें झाली मला ! खेड्यांत आईला दहा रुपये पाठवितों आणि चाळीस रुपयांत राजा, राणी, राजकन्या, नि राजपुत्र इतकी मंडळी आमच्या घरांत मोठ्या मजेंत राहतात.

अनंत माझ्यापेक्षां कितीतरी हुषार ! तो बी. ए. ला पहिल्या वर्गांत आला. एम्. ए. ला देखील त्याचा पहिला वर्ग फार थोड्या मार्कांनी चुकला. एम्. ए. च्या एका परीक्षकाची इंदु--बिंदूवर ताण करणारी एक मुलगी आपल्याला सांगून आली होती, पण कुसुम महाजनीवर आपलें प्रेम असल्यामुळे आपण त्या गृहस्थांना नकार दिला आणि त्याचा सूड त्यांनी पेपर तपासतांना घेतला, अशी या बाबतींत अनंताची कैफियत होती !

ती खरीहि असेल कदाचित्, पण एम्. ए. होऊन चार वर्षें झालीं तरी प्रोफेसरची जागा मिळत नाही म्हणून तो हात जोडून बसला आहे; आणि खेड्यांत करमत नाहीं म्हणून येथें शहरांत राहून वाचनालयांतच अनंत पुस्तकावरली धूळ झाडल्याचें श्रेय घेत आहे हें कांहीं खोटें नाही !

अजून बिचाऱ्याला बापाकडून पैसे मागवावे लागतात ! गृहस्थ त्या कुसुमला दर दिवसाआड पत्र लिहितो! साधं कार्ड नाही, अगदी पाकीट ! आणि तेहि खूप जाडजूड ! इकडे पोराचा प्रेमाचा खेळ होतो; पण तिकडे पैसे पाठवितांना बापाचा जीव जातो !

पांच वर्षांपूर्वी कुणी या कुसुमविषयीं माझें मत विचारलें असतें तर मीं

उत्तरादाखल त्याला प्रश्न केला असता—" हापूसचा आंबा किंवा काबुली द्राक्षं यांच्याविषयी कुणी कुणाचं मत विचारतो का ? "

माझ्या वाट्याला साधा आंबा म्हणा अथवा नाशिकचीं द्राक्षें म्हणा, कांहीं तरी आलें खरें !

पण या कांहीं तरीच्या सहवासांत माझीं गेलीं पांच वर्षें किती आनंदांत गेलीं होतीं ! दुष्यन्त, चारुदत्त, रोमिओ इत्यादि नायकांशीं माझें कोणत्याच बाबतींत साम्य नाहीं; आणि माझी बायको शकुंतला, वसंतसेना, ज्यूलिएट इत्यादि रुपसुंदरींची दासी तरी शोभली असती की नाही याची शंकाच आहे ! पण असें असूनहि गेल्या पांच वर्षांत मी अगदी प्रेमसागरांत पोहत होतों.

प्रेमाचे उत्कट क्षण नि मधुर प्रसंग कांही राजेरजवाड्यांच्या आयुष्यांत आणि सुंदर उद्यानांतच अनुभवाला येतात असें नाहीं. शाळामास्तरांच्या आयुष्यांत आणि अडगळीच्या खोलींत सुद्धा त्यांची माधुरी चाखायला मिळते !

* * *

मी सवाई दुष्यन्त झालों तो प्रसंग ! अडगळीच्या खोलींत कांहीं तरी आणायला माझी बायको गेली होती. घडवंचीवर उभी राहून ती एक खूप जड डबा खाली काढीत होती. त्या डब्यावर चांगला मोठा काळा विंचू होता. डबा हातांत घेतांच विंचू आपल्या अंगावर उडी मारणार म्हणून घाबरून ती किंचाळली. मी शाळेंतून येऊन दारांत पाऊल टाकीत होतों. तसाच धावत गेलों आणि वर उडी मारून डोक्यावरच्या टोपींत तो काळा विंचू पकडला !

एकदा आम्ही दोघे लांब फिरायला गेलों होतों. घरांतून बाहेर पडतांना पावसाचें मुळींच चिन्ह दिसत नव्हतें, म्हणून मीं कांहीं छत्री घेतली नव्हती. एकाएकी आभाळ भरून येऊन धो धो पाऊस पडूं लागला. माझ्या बायकोपाशी छोटी छत्री होती, पण तिच्यांत आम्ही दोघें मावणें शक्य नव्हतें.

" तूं उगीच भिजूं नकोस ! " म्हणून मीं तिला परोपरीनें सांगितलें. पण हातांत मिटलेली छत्री घेऊन ती खुशाल हसत माझ्याबरोबर घरीं आली.

अंगावरलें पातळ सोडतां सोडतां ती म्हणाली होती, " संसारांत सुद्धा मृच्छकटिक नाटक असतं हं ! "

आणि गतवर्षी मी टायफॉइडने आजारी होतों तेव्हाचा तो प्रसंग–माझा स्वभाव आधीच भित्रा ! त्यांत तिचे महिने भरत आलेले. तूं होता होईल तों माझ्याजवळ येऊं नकोस म्हणून मीं तिला बजावून सांगितलें होतें. पण एके दिवशीं मध्यरात्रीं मी गुंगींतून जागा झालों तों माझ्या ओठांवर कांहीं तरी हुळहुळत आहे असें वाटून ! मीं कसेबसे डोळे उघडले. पाहिलें तों माझ्या पत्नीचे ओठ होते ते ! ती केव्हां जवळ येऊन बसली होती कुणास ठाऊक ! मला घाम यायला लागलेला दिसतांच तिचा आनंद गगनांत मावेना ! त्या आनंदाच्या भरांत तिने...

असा प्रसंग कुठल्याहि महाकवीच्या नाटकांत सुद्धा नसेल !

आणि पत्निप्रेम हीच कांही संसाराची सारी शोभा नाहीं. बागेंत फळ-झाडांप्रमाणें फुलवेलीहि असाव्याच लागतात. संसारांतल्या फुलवेली म्हणजे मुलें. तान्हें बाळ कुशीला वळायची धडपड करो, नुसता हुंकार देऊन माणसाशीं बोलूं लागो, पाळण्यांत पाय नाचवून वर लावलेल्या चिमण्या हालवीत त्यांच्याशीं खेळो—त्याच्या प्रत्येक कृतींत किती आनंद भरलेला असतो ! माझी मुलगी तर आता चांगली बोलूं लागली होती, मुलगा उभा राहूं लागला होता ! तेव्हा—

हातांतल्या पुस्तकांतल्या त्या मघाच्या ओळी मीं पुन्हा वाचल्या. मला वाटलें–माझ्याबरोबरीच्या या अनंताने आयुष्यांतले किती तरी सुखाचे क्षण गमावले. कुसुमला बडोद्यांत मास्तरीण होऊन तीन वर्षे झालीं असतील, तरी हा कांहीं लग्नाची भाषा काढीत नाहीं. दर वर्षी नाताळांत तिला भेटा-यला जातो आणि कुठेंहि प्रोफेसर होतांच लग्न करायचें म्हणून सांगून परत येतो !

स्वारी सध्या याच वार्षिक मोहिमेवर गेली आहे ! काय दिवे लावून परत येते तें पाहावें.

आज सात जानेवारी !

अजून अनंत बडोद्याहून परत आला नाही.

आपलें लग्न झालें ही बातमी एकदम सांगून मला चकित करायचा तर बेत नाहीं ना त्याचा ?

* * *

हा विचार मनांत आला त्याच क्षणीं अनंत माझ्या खोलींत शिरला.

मी चकित झालों.

पण माझ्या आश्चर्याचें कारण त्याच्या लग्नाची बातमी नव्हती; त्याची दुःखी मुद्रा होती.

माझ्या हातांत एक वर्तमानपत्र आणि आरामखुर्चींत आपलें अंग त्यानें एकदमच टाकलें !

त्या वर्तमानपत्रांत अशी काय भयंकर बातमी असावी हें माझ्या लक्षांत येईना. लढाई सुरू होऊन साखर महाग होणार म्हणून तर हा चहाबाज अनंत हताश झाला नाही ना ? की कुसुम —

हो ! हल्ली एकदम हृदयक्रिया बंद पडल्याच्या बातम्या फार प्रसिद्ध होत असतात. ब्रह्मदेवाच्या कारखान्यांत हृदय तयार करण्याच्या बाबतींत अलीकडे फार हयगय होत असावी असें परवाच एका विनोदी लेखकाने लिहिलें नव्हतें का ? तेव्हा——

मीं वर्तमानपत्र उघडलें.

एका लहानशा बातमीभोवती निळ्या पेन्सिलीने वेडेंवाकडें वर्तुळ काढलें होतें.

मी उत्सुकतेने वाचूं लागलों——

## शिक्षिकेचें सिनेमा-नटाशीं लग्न

" बडोदे, ता. ५— येथील लोकप्रिय शिक्षिका कु. कुसुम महाजनी यांचा एका सुप्रसिद्ध सिनेमा-नटाशीं लवकरच विवाह होणार आहे असें कळतें. "

त्या बातमीदाराचा असा राग आला मला ! हा सुप्रसिद्ध सिनेमा-नट कोण हें तरी लिहायचें की नाही बेट्याने ?

" या बातमींतला सिनेमा-नट तूंच आहेस वाटतं ? " अशी अनंताची

थट्टा करण्याचा मला मोह झाला. पण वर्तमानपत्रावरली दृष्टि मीं त्याच्याकडे वळविली मात्र——थट्टेची जागा दयेने घेतली.

परीक्षेच्या निकालाच्या दिवशीं हटकून नापास होणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची अवकळा येते ना ? तीच आता त्याच्या मुद्रेवर दिसत होती.

" केव्हा आलास तूं ? " मीं विचारलें.

" आताच मेलनं ! चार दिवस मुंबईला होतों मधे ! पहाटे मिरजेला सहज वर्तमानपत्र विकत घेतलं नि उघडून पाहतों तों... "

एखाद्या लहान अनाथ मुलाप्रमाणे त्याची मुद्रा केविलवाणी दिसत होती.

त्याला धीर देण्याच्या हेतूनें मी म्हटलें, " अरे, बातमीदार काय वाटेल तें छापतात ! कुणा तरी कुसुम महाजनचं लग्न ठरलं असेल, नि बातमीदारानं महाजनी म्हणून दडपून दिलं असेल. खिळे जुळविणारा चुका करतो म्हणून त्याला राक्षस म्हणतात ! पण बातमीदार हे ब्रह्मराक्षस असतात बाबा ! "

तो हसला. पण तें हसणें विझून जात चाललेल्या निखाऱ्याची एखादी ठिणगी चमकावी तसें होतें.

" तूं बडोद्याला गेला होतास ना ? "

" हो ! "

" मग तिथं कांही कानांवर आलं नाही तुझ्या ? "

" कांही नाही ! "

" कुसुम स्वतः तुला चहा देत असे की नोकराकडून देववीत असे ? "

" ती स्वतः चहा करी, तो स्वतःच मला देई, साखर हवी का म्हणून विचारी—— "

" मग प्रश्नच नाही ! "

माझे हे शब्द ऐकूनहि अनंत प्रश्नार्थक दृष्टीने माझ्याकडे पाहूं लागला.

मी म्हटलें, " मग शंकाच नाही ! ही बातमी खोटी असली पाहिजे ! "

" छे रे ! " त्याच्या स्वरांतलें कारुण्य त्याचा मनस्ताप दर्शवीत होतें.

आता मी त्याच्याकडे प्रश्नार्थक दृष्टीने पाहिलें.

त्याने बडोद्यांतल्या आपल्या मुक्कामाच्या शेवटच्या दिवशीं काय झालें तें मला सांगायला सुरुवात केली.

कुसुमचें नि त्यांचें खूप भांडण झालें त्या दिवशीं. तिचें म्हणणें, आकाशांतल्या चंद्रापेक्षा हातांतला विजेचा दिवा फार बरा! आतां प्रोफेसर होण्याची आशा न बाळगतां अनंताने मुकाट्याने मास्तर व्हावें. नवरा मास्तर नि बायको मास्तरीण! तेव्हा संसार सुखाने चालायला कांही हरकत येणार नाहीं.

अनंताला तिची सूचना अगदी अपमानकारक वाटली. आज चार वर्षें तो रिकामा राहिला होता तो कांही मास्तर होण्यासाठी नाही. आपल्या महत्त्वाकांक्षेचें कुसुमला कांहीच कौतुक वाटू नये, उलट चांदोबाचा हट्ट घरणाऱ्या लहान पोराप्रमाणे आपण वागत आहों असें तिने पर्यायाने सुचवावें, याचेंहि त्याला फार वैषम्य वाटलें.

दोघांचीं उत्तरेंप्रत्युत्तरें सुरू असतांनाच, एक देखणा तरुण मनुष्य आंत आला. एका सिनेमा-कंपनींतील प्रसिद्ध नट म्हणून कुसुमने त्याची अनंताशीं ओळखहि करून दिली.

पण तीं दोघें अनंतासमोर बोलत बसलीं नाहीत. आंतल्या खोलींत जाऊन किती तरी वेळ तीं कुजबुजत होतीं. अनंताला तें अगदीं असह्य झालें. खोलींतून त्या नटाबरोबर कुसुम बाहेर आली आणि अनंताला म्हणाली, "मी जरा यांच्याबरोबर जाऊन येतें हं!"

बिचारा अनंत एकटाच जेवला. कुसुम त्या नटाबरोबर कुठे तरी दूर मोटारींतून फिरायला गेली असेल, चांदण्यांत तीं दोघें गप्पा मारीत बसलीं असतील आणि आपण मात्र...

त्याच्या अंगाची अशी एकसारखी आग होत होती! गाडीची वेळ झाली तरी कुसुम परत आली नाहीं. तो अगदीं संतापून गेला.

स्टेशनवर गाडी सुटायच्या वेळीं कुसुम आली. तिच्याबरोबर तो नट होताच! एका शब्दानेहि तिने अनंताची क्षमा मागितली नाही. उलट त्या नटाकडे पाहून ती पुनः पुन: हसत मात्र होती. गाडी सुटतांसुटतां त्या नटाचे जे शब्द अनंताने ऐकले होते ते सुद्धा किती विचित्र होते—"आज आमच्याच घरीं झोपायचं हं!"

यामुळें मुंबईला आल्यापासून अनंताने रागाने कुसुमला एकसुद्धा पत्र पाठविलें नव्हतें ! आणि आजच्या वर्तमानपत्रांत तर ही बातमी छापून आली होती !

अनंताच्या तोंडून हा सारा इतिहास ऐकतांच मीं मनांत म्हटलें, ही बातमी खरी असावी ! वेड्या चातकाला सुद्धां पांढरा ढग आणि काळा ढग यांच्यांतलें अंतर समजतें ! मग कुसुमसारख्या हुशार तरुणीला–कुसुम कांही परमार्थाकरिता लग्न करणार नव्हती ! चार वर्षें तिने अनंताला संधि दिली. पण प्रेमसुद्धा रबरासारखें असतें, फार ताणलें की तें तुटतें, हें या पुस्तकी पंडिताला पूर्वीच कळायला नको होतें का ?

* * *

पांच वाजतां शाळा सुटल्यावर मला अनंताची आठवण झाली ! बिचाऱ्याने दुपार कशी घालवली असेल कुणाला ठाऊक ! त्याच्या खोलींत पाऊल टाकतांच उद्योगासारखें दुःखावर रामबाण औषध नाही याची मला खात्री पटली ! दिवसभर अनंत आपलें दुःख उगाळीत बसला होता हें त्याच्या खोलींतल्या अव्यवस्थितपणावरूनच उघड होत होतें.

तो खुर्चीवर बसला होता. त्याच्यासमोर टेबलावर कुसुमचा एक फोटो होता. फोटोजवळच पुष्कळशीं विसकटलेलीं पत्रें पडलीं होतीं. मी गेलों तेव्हा तो त्यांतलें एक पत्र वाचीत होता. मधेच त्याने निळ्या पेन्सिलीने त्या पत्रांतल्या एका वाक्यावर खूण केली.

माझी चाहूल लागतांच त्याने मागे वळून पाहिलें. लगेच खुर्चीवरून ताडकन् उठून हातांतलें पत्र मला दाखवीत तो म्हणाला, " स्त्रीजात तेवढी निमकहराम हेंच खरं ! शेक्सपिअर कांही मूर्ख नव्हता ! "

बिचारा शेक्सपिअर ! या हॅम्लटनेच समंधाचा अवतार धारण केलेला पाहून त्याला काय वाटलें असतें कुणाला ठाऊक ! या त्रस्त समंधाला शांत करण्याकरिता मी त्याने खूण केलेला मजकुर वाचूं लागलों —

" आपण दोघं अगदी गरिबींतसुद्धा सुखानं राहूं हं ! अनंता, मोगरीची वेल संगमरवरी स्तंभावर सोडली तरच फुलते असं नाही कांही ! एखाद्या साध्यासुध्या मेढीवरहि ती आनंदानं चढते आणि डौलानं फुलते ! "

मी चकीत झालों. हें काव्य लिहिणारी मुलगी आपल्या प्रियकराची वंचना करील ?

पण माझ्यापुढे मधली चार वर्षें उभीं राहिलीं. प्रीति हीसुद्धा एक प्रकारची भूक आहे. भूकेलेला मनुष्य पहिल्यांदा आपल्या आवडीचं पक्कान्न मिळविण्याचा प्रयत्न करतो; पण तें मिळेनासें झालें म्हणून काय तो गप्प बसेल? कुसुमच्या मनांतहि असाच कांहीं तरी बदल झाला असावा !

अनंताने तावातावाने टेबलावरलीं दोन–तीन पत्रें घेऊन तीं माझ्यापुढे धरलीं. प्रत्येक पत्रांतल्या एकदोन वाक्यांवर त्याने खुणा केल्या होत्या.

" अनंत ! कुणी रे तुला हें नांव ठेवलं ? तुझ्या स्वभावाचा कांही केल्या अंतच लागत नाही मला ! अगदी समुद्रासारखा आहेस तूं ! पण अनंता, तुझी कुसुम भित्री आहे रे ! समुद्रांत बुडून तिथले मोतीं काढायचा धीर तिला नाही. मग मोत्यांनीच आपणहून वर यायला नको का ? "

" दगड आणि फुलं यांचा काय ऋणानुबंध आहे कुणाला ठाऊक ! पण दगडांच्या मूर्ति होतात आणि लोक त्यांना फुलं वाहतात. पुरुष कठोर असतात हें ठाऊक असूनहि त्यांच्यावर प्रेम केल्याशिवाय बायकांना राहवत नाही याचं कारणसुद्धा हेंच असावं नाही का ? "

हे उतारे वाचतांवाचतां मला वाटलें, कुसुमचें अंतःकरण कवीचें आहे. इतक्या हळव्या मनाची ही मुलगी आपलें चार वर्षांचें प्रेम सुखासुखी विसरून जाईल ?

छेः ! असलें प्रेम म्हणजे कांही कुठल्या तरी दैनिकाचा अंक नव्हे ! तें प्रतिभासंपन्न कवीने निर्माण केलेलें भावगीत असतें.

टेबलावरच्या सर्व पत्रांची अनंताने प्रचंड रास केलेली पाहून मीं विचारलें, " काय रे करतोस ? "

" लंकादहन ! "

" पण मारुतिराय ! कुसुम आपल्याशीं लग्न करणार नाही अशी खात्री तरी करून घ्या आधी ! "

आशा वाटत असल्यामुळे नव्हे, तर कुसुमसमोर सर्व प्रेमपत्रें जाळून टाकण्याचा नाटकी मोह न आवरल्यामुळे अनंत बडोद्याला जायला कबूल

झाला. अर्थात् मला त्याच्याबरोबर जाणें प्राप्तच होतें.

आगगाडींत अनंत एकसारखा विचार करीत होता. मीं थट्टेने विचारलें, " कसली रे तयारी चालविली आहेस ? "

" व्याख्यानाची ! "

" म्हणजे ? "

"कुसुमला असं झणझणीत व्याख्यान ऐकवणार आहे, की तिला त्याची जन्मभर आठवणच राहावी ! "

* * *

पण ह्या व्याख्यानांतला एक शब्दहि अनंताच्या तोंडून बडोद्याला बाहेर पडला नाही.

त्याने वर्तमानपत्राचा अंक कुसुमला दाखवीत रागाने विचारलें, " ही बातमी खरी आहे का ? "

ती हसत म्हणाली, " हो. "

" कुठं आहे तो सिनेमा-नट ? "

अनंताच्या आवाजावरून रानटी काळांतला त्याचा एखादा पूर्वज त्याच्या अंगांत संचारला असावा असें वाटलें.

मी थोडासा बावरलों, पण कुसुम अनंताचा हात धरून शांतपणाने म्हणाली, " इथंच आहेत ते ! इकडे या, तुमची नि त्यांची गाठ घालून देतें. "

अनंताचा हात धरून कुसुम जवळच्याच खोलीकडे वळली तेव्हा मीहि त्यांच्या मागोमाग गेलों. या वेळीं माझ्या मनांतलें कुतूहल अधिक प्रबल झालें होतें, की अनंताची त्या सिनेमा नटाशीं मारामारी होऊं नये ही इच्छा अधिक प्रभावी झाली होती, हें माझें मलाहि सांगतां आलें नसते !

कुसुमने हळूच खोलीचा दरवाजा उघडला. समोरच एक भव्य आरसा होता. त्यांतल्या अनंताच्या प्रतिबिंबाकडे बोट दाखवीत ती म्हणाली, " हेच ते सिनेमा-नट ! "

" मी ? " अनंताच्या आवाजावरून त्याच्या कंठांत जगांतल्या सर्व आश्चर्यांचें संमेलन झालें असल्याचा भास होत होता !

" अनंत सिनेमांत कधीं गेला ? " मी विचारलें.

हसत हसत कुसुम उद्गारली, " कांही केल्या हे मास्तर होईनात ! हे प्रोफेसर होईपर्यंत लग्नाची वाट बघावी, तर तोंपर्यंत मी म्हातारी होणार. तेव्हा प्रोफेसरापेक्षाहि अधिक पगाराची जागा कुठली म्हणून मी विचार करूं लागलें. इतक्यांत... "

कुणाचीं तरी पावलें वाजलीं म्हणून मीं वळून पाहिलें. एक सुंदर देखणा तरुण आंत येत होता.

कुसुम हसून त्याला म्हणाली, " अनंतराव आले आहेत ! "

" वा: ! अगदी आठवड्याचा विरहसुद्धा दु:सह व्हायला लागला वाटतं ? तो हसत उद्गारला.

" ते तुमच्याशीं भांडायला आले आहेत ! "

" ते माझ्याशी ? कां बुवा ? "

" तुम्ही म्हणे त्यांची बायको पळवून नेत होतां ! " मी मध्येच म्हटलें ! आम्ही तिघेहि हसूं लागतांच अनंतालाहि हसू आवरणें अशक्य झालें.

* * *

दुपारीं जेवायला बसल्यावर कुसुमने साऱ्या गोष्टींचा हसत खेळत उलगडा केला. अनंत बडोद्याहून गेला त्या दिवशीं दिवसभर ती त्या सिनेमा-नटाच्या घरीं होती आणि स्टेशनवर अनंताला निरोप देऊन परत झोपायलाहि ती त्याच्याच घरीं गेली होती. पण याचें कारण त्या नटीची बहीण तिची विद्यार्थिनी होती. त्या दिवशीं त्या मुलीला खूप ताप आला होता. ती एक-सारखी कुसुमची आठवण करीत होती. कुसुम तिच्याजवळ जाऊन बसल्या-वर तिला बरें वाटूं लागलें. मधूनमधून होणारा भ्रम नाहीसा झाला. ती सारी रात्र कुसुमने तिच्या उशाशीं जागून काढली. दुसरे दिवशीं त्या मुलीचा ताप निघालासुद्धा.

त्या दिवशीं स्टेशनावर अनंत रागावलेला दिसत होता. घरीं आल्यावर कुसुमचें त्या नटाशीं अनंताविषयी बोलणें झालें. अनंताने आता लग्न लांबणीवर टाकूं नये अशी कुसुमची फार इच्छा होती; पण त्याला हवी असलेली जागा कांहीं वाटेवर पडली नव्हती !

कुसुम आपल्या हातांतून जात आहे असें वाटलें तरच जीवनाकडे पाठ

करून स्वप्नांत रममाण होणारा अनंत जागा होईल असें त्या दोघांच्या बोलण्यांतून निघालें ! वर्तमानपत्रांना ती बातमी खुद्द कुसुमने दिली होती.

मीं मध्येच म्हटलें, " आज आम्ही आलों नसतो तर ही गोष्ट भलत्याच थराला गेली असती ! "

" छे: ! तुम्ही आला नसतां तरी मी सिनेमा-नटाशीं लग्न करणार होतें."

अनंत तिच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला.

ती हसतहसत त्याला म्हणाली, " म्हणजे तुमच्याशींच ! "

" तें कसं काय बुवा ? " मीं पृच्छा केली.

" हे मास्तर झाले नाहीत तर संसाराला हवे तेवढे पैसे मिळविण्या-करिता मीं सिनेमा-नटी व्हायचं ठरविलं होतं. मी नटी झाले असतें म्हणजे हे आपोआपच नट होणार होते ! डॉक्टराची बायको नाही का डॉक्टरीण होत ? तसं ! "

* * *

जेवल्यावर कुसुमने दिलेला विडा तोंडात टाकून मी मधल्या खोलींतल्या आरशासमोर जाऊन सहज उभा राहिलों ! किती लवकर माझ्या तोंडांतला विडा रंगला !

मला वाटलें, जीवनांतलें सुखसुद्धा असेंच आहे ! चार पानें कणभर कात, चुन्याचें एक बोट, थोडी सुपारी आणि वेलदोडयाचे दोन दाणे यापेक्षा या विडयांत अधिक काय होतें ? पण तोंडांत पडल्याबरोबर तो किती सुंदर रंगला ! सुख स्वप्नांत नाही, जीवनांत आहे हेंच खरें !

पलीकडच्या खोलींतून अनंत आणि कुसुम यांच्या संमिश्र हास्याचा आवाज आला. माझ्या विचारांचा प्रतिध्वनीच होता तो ?

# भग्नमूर्ति

पुष्पेचें तें पत्र एकदा, दोनदा, तीनदा वाचलें तरी दादाच्या मनाचें समाधान होईना. आपल्या अतृप्तीचें त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटलें! क्षणभर ते स्वतःला हसलेसुद्धा! त्यांच्या मनांत आलें—आपण हें पत्र वाचीत असतांना आपल्याजवळ सध्याचा एखादा कादंबरीकार नाही हें आपलें भाग्य! नाही तर त्याने एका शिक्षकाच्या आयुष्यांत पन्नाशी उलटल्या-वर उन्मत्त प्रणयाने कसा प्रवेश केला या संबंधाची एक मोठी मनोविश्ले-षणात्मक कादंबरीच रचली असती! त्या कलावंताला क्षणभरसुद्धा वाटलें नसतें, की दादा वाचीत असलेलें पत्र त्यांच्या मुलीचें आहे! त्यांच्या-सारख्या लेखकांना हें सुचणार तरी कुठून? त्यांच्या कोशांत प्रेम या शब्दाचा एकच अर्थ असतो—प्रेम म्हणजे स्त्रीपुरुषांमधलें शारीरिक आकर्षण! आणि त्यांच्या सृष्टींत पुनःपुन्हा वाचण्यासारखीं पत्रें एकाच प्रकारचीं असतात—प्रेमपत्रें!

आधुनिक मराठी लेखकांविषयी दादांचें फारसें चांगलें मत कधीच नव्हतें. ते नेहमी म्हणत—हे अलीकडचे लेखक भ्रमिष्ट आहेत. आयुष्यांतली कुठली तरी एकच गोष्ट घेऊन ते तिच्याशीं चाळा करीत बसतात. कुणी प्रेमाचा फुलबाज्या लावतो तर कुणी राजकारणाचे डांबरी तोटे उडवितो पण सामान्य मनुष्याच्या आयुष्यांत असल्या अनेक गोष्टींचीं प्रतिबिंबें अस्पष्टपणाने मिसळलेलीं असतात याची त्यांना कल्पनाच येत नाही! आयुष्य हें ऊन, पाऊस, चांदणें यांच्यासारखें एकरंगी नाही. आयुष्य हें इंद्रधनुष्य आहे! एका साध्या गावांत, एका लहान घरकुलांत जन्म

काढणाऱ्या आपल्यासारख्या मास्तरालासुद्धा हें पटतें. पण कल्पनेच्या विमानांत बसून आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या या कलावंतांना मात्र...

पुष्पेचें पत्र चवथ्यांदा वाचायला सुरवात करण्यापूर्वी विचारांचा थोडा पालट हवा होता म्हणूनच की काय, दादांचें मन एवढी भ्रमंती करून आलें.

आता एकदाच पत्र वाचायचें म्हणून त्यांनीं त्याच्यावरून नजर फिरवायला सुरवात केली. लगेच त्यांच्या मनांत आलें—आपण हें पत्र आता पुन्हा वाचायचें नाही असा बेत करीत आहों; पण तो आपल्या हातून पार पडेल का ? पंकज मलिकच्या त्या गाण्यासारखीच या पत्राने आपली स्थिति केली आहे. शेजारच्या हेडमास्तरांच्या घरीं तें गाणें कितीहि वेळां लावलें आणि आपण तें कितीहि वेळां ऐकलें तरी आपलें समाधानच होत नाही ! त्या गाण्यांत संध्यारागाची अक्षय आकर्षकता आहे. पुष्पेच्या या पत्रांतहि—

ते अधीरपणाने पत्र वाचूं लागले—

" ती. दादा यांस सप्रेम नमस्कार..."

दादा हसत मनांत म्हणाले, " काळ किती झपाट्याने पुढे जात आहे—आणि जातां जातां प्रत्येक गोष्टीचें स्वरूप तो किती कौशल्यानें बदलून टाकीत आहे ! कॉलेजमध्यें गेल्यावर ' ती. स्व. काकांच्या चरणीं बालकें दादाचा शिरसाष्टांग नमस्कार ' असें लिहिणें आपणाला फार विचित्र वाटू लागलें. आपण त्यांतल्या ' बालके ' ला रजा दिली. पण ' ती. स्व. काका यांस सप्रेम नमस्कार' असें लिहिण्याची छाती मात्र कांहीं केल्या आपल्याला झाली नाही. पुष्पा मात्र लीलेने तें लिहीत आहे; आणि पुढच्या पिढींतला पुष्पेचा मुलगा तर तिला तीर्थरूप म्हणायला सुद्धा तयार होणार नाही !

' पुष्पेचा मुलगा ' या कल्पनेने दादांच्या मनाला किती नाजुक गुदगुल्या केल्या ! पंचविशींत पुरुषाला जशी स्त्रीची ओढ लागते, तसें पन्नाशींत त्याला अपत्यवात्सल्याचें विलक्षण आकर्षण उत्पन्न होतें की काय कुणाला ठाऊक ! दादांची पत्नी एकुलत्या एक पुष्पेला मागे ठेवून अकालीं परलोकीं गेल्यामुळें त्यांचें वात्सल्य कदाचित् अतृप्त राहिलें असेल ! कारण कांहीहि असलें तरी क्षणभर त्यांच्या डोळ्यांपुढे कुरळ्या केसांनी शोभणारे एका बालकाचें मुखमंडल चमकून गेलें हें कांही खोटें नाही.

लगेच ‘ बाजारांत तुरी नि भट भटणीला मारी ’ या म्हणीची आठवण होऊन दादांना स्वतःचें हसूं आलें. पुष्पेच्या पत्रांतला मुख्य प्रश्न तिच्या लग्नाचाच होता. तिचें एका तरुणावर प्रेम बसलें होतें. तो तरुण श्रीमंत असता, तर दादांच्या डोळ्यापुढे नातवंडाचें सुखस्वप्न उभेंच राहिलें नसतें. आतापर्यंत दोनतीन श्रीमंत तरुणांना पुष्पा आवडली होती. एकाने तर तिला प्रेमपत्रेंसुद्धां पाठविलीं होतीं-पण प्रत्येक ठिकाणीं लग्न हाच प्रीतीचा खरा निकष आहे हें कटु सत्य त्यांच्या अनुभवाला आलें होतें. आगगाडींत वेळ जावा म्हणून माणूस शेजाऱ्याशीं गप्पागोष्टी करतो. प्रसंगीं त्याला फराळाचा आग्रह करतो आणि निरोप घेतां घेतां हसतमुखानें ‘ ओळख-देख ठेवा हं ! ’ असें म्हणतांना त्याच्या मुद्रेवर किती उत्कट भाव दिसतो ! पण स्टेशनांतून बाहेर गेल्यावर आगगाडींतल्या या मैत्रीची त्याला आठवणसुद्धा होत नाही. सध्याच्या तरुणतरुणींच्या ओळखीचा शेवटहि असाच होतो !

असे दोनतीन चटके बसल्यावर पुष्पेचें मन कशांत तरी गुंतवून ठेवलें पाहिजे म्हणून, दादांनी तिला मुंबईच्या एका शाळेंत नोकरी मिळवून दिली होती. आणि पुष्पा मास्तरीण होण्याकरिता मुंबईला मोठ्या शुभमुहूर्तावर गेली होती असें तिच्या या आजच्या पत्रावरून उघड होत होतें.

दादांची दृष्टि अधीरपणें पत्रांतल्या मधल्या मजकुराकडे वळली.

“...गेले चार दिवस मी तुम्हाला हें पत्र लिहित आहे. लिहून लिहून किती कागद फाडले याची गणतीच नाही ! प्रेमपत्र लिहिण्यापेक्षासुद्धा वडील माणसांना आपल्या प्रेमाची हकीकत सांगणारें पत्र लिहिणें कठीण आहे हें मला आज कळून चुकलें. आई असती तर—तर आज हें पत्र तुम्हांला लिहिण्याचा धीर मला झालाच नसता.

“ आई असती तर—

“ मला आई आहेच की ! मी तुम्हांला ‘ दादा ’ म्हणून हाक मारीत असलें, सारें जग माझी आई लहानपणींच देवाघरीं गेली असें म्हणत असलें, तरी माझी आई जिवंत आहे हें मला ठाऊक आहे. दादा, तुम्हीच माझी आई आहांत.

“ मी इंग्रजी शाळेंत गेल्यावर आपली धोंडू मोलकरीण मी लहानपणीं

किती हट्ट करीत असे याच्या पुष्कळ गोष्टी सांगे. तिच्याकडून वेणी घालून घ्यायला मी तयार झालें नाही की तुम्ही हातांत फणी घेऊन माझे केस विंचरीत होतां ! होय ना ? आणि एकदा मीं हट्ट धरून माझ्याबरोबर तुमच्याहि कपाळाला कुंकू लावलें. शाळेत जायच्या गडबडींत तुम्ही तें पुसायला विसरलांत नि तुम्ही वर्गांत पाउल टाकल्याबरोबर सारीं मुलें खो-खो करून हसूं लागलीं—

" कित्ती कित्ती त्रास दिलाय् मीं तुम्हाला दादा !—नाही ?

" आणि आजसुद्धा—

" स्त्रीचें मन हें लाजाळूचें झाड आहे असं कुणी तरी म्हटलें आहे ना ? तें किती खरें आहे !

" पण—

" आमच्या शाळेंत काशीनाथ पटवर्धन म्हणून एक मास्तर आहेत असें मीं तुम्हांला लिहिलें होतें ना ? ते इतिहास फार फार चांगला शिकवितात. इंग्लंडचा इतिहास शिकवितानासुद्धा मुलींच्या मनांत ते देशभक्ति निर्माण करतात. ते डिबेटिंग सोसायटींत बोलायला लागले, की त्यांचें भाषण एक-सारखें ऐकत रहावेंसें वाटतें–हें सारें सारें मीं तुम्हांला लिहिलें होतें. पण एक गोष्ट मात्र लिहायला—

" आज ती लिहितेंच, काशीनाथाचें माझ्यावर प्रेम आहे आणि माझें—

" हें वाचून तुम्ही मनांत काय म्हणाल याची मला पुरीपुरी कल्पना आहे. तुम्ही म्हणाल, ' अगदीच भोळी आहे आमची पुष्पा ! काशीनाथाचें हिच्यावर प्रेम आहे, हिचें काशीनाथावर प्रेम आहे. मग मला एवढें लांब-लचक पत्र पाठविण्यापेक्षा लग्नाला या म्हणून तार कां करीत नाही ही पोरगी ? ' मिया बिब्बी राजी, तो क्या करेगा काजी ' हें या बावीस वर्षांच्या मास्तरीण असलेल्या मुलीला कळूं नये ? '

" दादा, हें सारें मला कळतेंय् !

" पण—

" आमचं दोघांचें एकमेकांवर प्रेम असलें, तरी—

" काशीनाथाचा स्वभाव थोडासा विचित्र आहे. रात्रीं सिनेमाच्या

दहाच्या शोला जाण्यांत किती मौज असते! पण माझ्याबरोबर एकदाहि तो आला नाही. डॉक्टर होण्यासाठी त्याने एक निबंध लिहिला आहे. तो त्याने युनिव्हर्सिटीकडे पाठवावा म्हणून मी एकसारखी त्याच्या पाठीमागे लागलें आहे. पण तो दरखेपेला कांही तरी तऱ्हेवाईक उत्तर देऊन माझें तोंड बंद करतो. परवा स्वारी म्हणाली, ' मला डॉक्टर व्हायचं असतं तर मी मेडिकल कॉलेजांतच गेलों असतों ! '

" मागच्या आठवड्यांत मीं सर्व शिक्षकांच्या समोर एक पाठ घेऊन दाखविला. ' बाहुल्या ' म्हणून गोष्ट आहे, ती मीं शिकविली. त्या गोष्टींत लहानपणापासून मुलींच्या मनांत वात्सल्य कसें उत्पन्न होतें हें सुंदर रीतीनें सूचित केलें आहे. माझा पाठ एकाशिवाय साऱ्यांना फारफार आवडला. ते एक गृहस्थ म्हणजे...काशीनाथ !

" संध्याकाळीं आम्ही दोघें फिरायला गेलों तेव्हा तो म्हणाला, ' तुझा आजचा पाठ मला मुळीच आवडला नाही ! '

" मीं उत्तर दिलें, ' नावडतीचं मीठ अळणी ! '

" तो हसत हसत म्हणाला, ' आवडतीचं मीठ असलं तरी तें खारटच लागतं ! म्हणे, मुलींच्या मनांत सुद्धा मातृत्वाची भावना उपजत असते ! कुठून शोधून काढलंस हें तत्त्वज्ञान ? '

" ' इथून ! ' हृदयावर हात ठेवून मीं त्याला उत्तर दिलें.

" तो एकदम गंभीर झाला.

" त्याचें माझ्यावर प्रेम आहे; पण तें पुरुषाचें प्रेम आहे. माझ्या डोळयांनी भविष्यकाळाकडे त्याला पाहतांच येत नाही. मला मात्र उघड्या डोळयांनी सुद्धा पुढचीं सुखस्वप्नें पाहतां येतात– काशीनाथ प्रोफेसर झाला आहे; त्याच्या इतका हुशार आणि प्रेमळ नवरा मिळाल्यामुळे मैत्रिणी माझी नेहमी थट्टा करीत आहेत; तुम्ही आमच्या बंगल्यांत आरामखुर्चीवर कांही तरी वाचीत पडलां आहां आणि दोन गोजिरवाणीं पिलें ' आजोबा, आजोबा ' म्हणून तुमच्या हातांतून पुस्तक काढून घेऊन तुमच्या मांडीवर चढत आहेत...

" किती वाहवलें मी !

" काशीनाथ असा थोडासा विचित्र असला तरी त्याच्या—माझ्या किती किती आवडी एक आहेत म्हणून सांगू ? मी सुट्टींत तुमच्याकडे आलें होतें तेव्हां शेजारच्या हेडमास्तरांच्या घरीं 'पिया मिलन को जाना' हें गाणें ऐकलें. इथें आल्याबरोबर मीं तें रेकॉर्ड विकत घेतलें. माझ्याइतकेंच काशीनाथालाहि तें आवडतें. माझ्या खोलींत पाऊल टाकलें रे टाकलें, कीं तो म्हणतो, ' पुष्पा, पिया मिलन को जाना ! ' अशा वेळीं माझ्या मनांत येतें—आपणहि त्याला म्हणावं, ' हें गाणं नुसतं ऐकायचं नाही. तसं वागायला हवं ! '

" पण कांही केल्या हे शब्द माझ्या तोंडांतून बाहेरच पडत नाहीत.

" माझ्यासारखीच त्याला अस्मानी रंगाची आवड आहे. मला जशी गुलाबापेक्षा रातराणी आवडते तशी त्यालाहि—

" किती किती गोष्टींत त्याचें नि माझें जुळतें म्हणतां ! पण. . .

" तुम्ही म्हणाल— ज्या गोष्टींत तुझें नि त्याचें जमत नाही, त्यांत मी काय करणार ?

" दादा, तुम्हांला ठाऊक नाही—काशीनाथाची तुमच्यावर फार भक्ति आहे. कालच त्याचें एक रहस्य कळलें मला. तो तुम्हांला गुरु मानतो. काल मी त्याच्या खोलींत गेलें तेव्हा त्यानें झटकन् टेबलावरलें कांही तरी उचलून ड्रॉवरमध्ये घातलें आणि तो घाईघाईने किल्ली फिरवूं लागला. मी धावतच गेलें आणि म्हटलें, ' कुणाचीं तरी प्रेमपत्रं आहेत वाटतं ? '

" त्याने होकारार्थी मान हालविली.

" तो माझी थट्टा करतोय् हें माझ्या लक्षांत आलें. नाही असें नाही; पण संशय हा कुसरड्यासारखा असतो. त्याचा ओझरता स्पर्श झाला तरी माणूस अस्वस्थ होतें.

" मीं हट्टच धरला तेव्हा त्याने ड्रॉवर उघडला. आंत एक छोटें आल्बम होतें. त्याच्यावर लिहिलें होतें —' माझे गुरु ! '

" मीं काशीनाथाला म्हटलें, ' चांगलाच लबाड आहेस हं ! आंत नटीचे फोटो ठेवून वर ' माझे गुरु ' म्हणून मथळा दिला आहेस वाटतं ?''

" तो नुसता हसला.

" मीं तें आल्बम उघडलें; आणि—

" आश्चर्याचा केवढा मोठा धक्का बसला मला !

" त्या आल्बममधला पहिलाच फोटो तुमचा होता. शाळेंतल्या कुठल्या तरी संमेलनाच्या फोटोंतून काशीनाथाने तो कापून घेतला होता. इतके दिवस ही गोष्ट त्याने लपवून टेवली होती माझ्यापासून. पण—"

* * *

वाचतां वाचतां दादांच्या डोळ्यांपुढलें पत्र नाहीसें झालें. त्या जागीं काशीनाथ पटवर्धन या तेराचौदा वर्षांच्या मुलाची मूर्ति उभी राहिली. त्या वेळीं गावांत नुकतेच एक सहभोजन झालें होतें. त्यांत भाग घेतल्यामुळे दादांच्यावर गावांतल्या पुष्कळ लोकांनी बहिष्कार टाकला होता. पण दादा त्या बहिष्काराने डगमगून गेले नाहीत. उलट त्यांनीं बहिष्कार घालणारांचा समाचार घेणारें एक जोरदार जाहीर व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानाच्या शेवटीं दादा म्हणाले होते, ' प्रत्येक रूढि कांही तरी कारणाने उत्पन्न होते; पण तें कारण नाहीसें झाल्यावर ती रूढि कायम ठेवणें हें मूर्खपणाचें लक्षण आहे. देवाच्या भंगून गेलेल्या मूर्तीची कुणी पूजा करीत नाही ! भंगलेली मूर्ति गाडून टाकून तिच्याऐवजी नव्या मूर्तीची स्थापना करणें हेंच अशा वेळीं प्रत्येकाचें कर्तव्य असतें ! '

एकाद्या डोंगराजवळ जाऊन ओरडल्यावर आपल्या बोलण्याचा मोठा प्रतिध्वनि जसा ऐकूं येतो, त्याप्रमाणे त्या व्याख्यानाच्या दिवशीं ' देवाच्या भंगून गेलेल्या मूर्तीची कुणी पूजा करीत नाही ! ' हें वाक्य पुनः पुन्हा दादांच्या कानांत घुमत होतें.

त्या दिवशीं रात्रीं आणखी एक चमत्कार घडला. काशीनाथ पटवर्धन या नांवाचा दादांच्या वर्गातला एक नादार मुलगा त्यांच्या घरीं फुलें घेऊन आला. त्याच्या तोंडांतून शब्द उमटत नव्हते; पण त्याने तीं फुलें मुकाट्याने दादांच्या पायांवर वाहिलीं. काशीनाथाला वेडबीड तर लागलें नाही ना अशी दादांना शंका आली. तो घरचा अगदी गरीब होता. एका भिकार खाणावळींत तो जेवत असे हें दादांना ठाऊक होतें. रात्रीची वेळ उपाशी राहायचें ठरवून त्याने तीं फुलें विकत घेतलीं हें जेव्हा दादांना कळलें तेव्हा त्यांचें अंतःकरण गहिंवरून आलें. काशीनाथ वेड्यासारखा त्यांच्याकडे पाहत

बसला होता. दादांनी त्याला कांहीं खायला दिलें. त्यांचा निरोप घेऊन जातांना तो दादांना म्हणाला होता, " मास्तर, आजचं तुमचं तें वाक्य मीं मनावर कोरून ठेवलं आहे अगदी. कध्धी कध्धी विसरणार नाहीं मी तें– ' भंगून गेलेल्या मूर्तीची कुणी पूजा करीत नाहीं !' "

त्या रात्रीचा हा प्रसंग दादांना वारंवार आठवे. पण तोच काशीनाथ पटवर्धन पुष्पेच्या शाळेंत मास्तर असेल ही कल्पना मात्र तिचें आजचें पत्र वाचीपर्यंत त्यांच्या मनांत आली नव्हती !

त्यांना वाटलें–दैवाचा खेळ हा बुद्धीबळाच्या डावासारखा आहे. शेवटच्या डावाची तयारी किती तरी आधी सुरू होत असते. आपल्याविषयी विलक्षण भक्ति बाळगणाऱ्या काशीनाथाचें व पुष्पेचें प्रेम जडावें ही केवढी आनंदाची गोष्ट ! पुष्पा चांगल्या रीतीने पदवीधर व्हावी म्हणून आपण जवळची सर्व शिल्लक खर्च केली. पण त्यामुळे तिच्या लग्नाचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच बिकट झाला. सुदैवानेच तिची आणि काशीनाथाची गाठ पडली म्हणायची ! पुष्पा म्हणते तसा तो थोडासा लहरी असेलहि; पण तो कांही आपल्या म्हणण्याबाहेर जाणार नाही. त्याने भक्तिपूर्वक आपल्या पायांवर ठेवलेलीं तीं फुलें—

पलीकडच्या हेडमास्तरांच्या घरांत कुणी तरी ग्रामोफोन लावला. त्या पदाच्या पार्श्वसंगीतानेच दादांना रोमांचित केलें. त्यांचें आवडतें गाणें होतें तें—' पिया मिलन को जाना ! '

गाणें ऐकत दादा खिडकीपाशी उभे राहिले.

अभिसारिकेला कुणी तरी मैत्रीण म्हणत होती—

" चल, चल–लवकर पाऊल उचल...प्रियकराला भेटायला चल... असतील ?...तुझ्या वाटेंत काटे पसरलेले असतील . . असेल, मुसळधार पाऊस कोसळत असेल ! . . पण प्रीति काट्यांना भीत नाही–पावसाला भीत नाही– " दादा मनांत म्हणाले, ' माझी पुष्पा मोठी भाग्यवान् आहे. काशीनाथ कांहीं माझ्या शब्दाबाहेर जाणार नाही ! '

* * *

मुंबईला जाऊन दादांनी काशीनाथाला पुष्पेची इच्छा, तिच्या अपेक्षा, सारें सारें सांगितलें. त्यांना वाटलें होतें—काशीनाथ हसत हसत म्हणेल,

" पुष्पेनं उगीच तुम्हांला इथं यायचा त्रास दिला. हें सारं तिनं मला सांगितलं असतं तरी— "

पण काशीनाथ असें कांहीच बोलला नाही. उलट दादांचें बोलणें ऐकल्यावर त्याची मुद्रा अधिकच गंभीर झाली.

दादांना वाटलें–तो लाजत असावा! आणि त्याने हसत हसत 'तुमच्या प्रश्नाचं संध्याकाळीं उत्तर देतों' म्हणून जेव्हा सांगितलें तेव्हा तर त्यांची खात्रीच झाली, की संध्याकाळीं काशीनाथाचा होकार येणार. त्या होकारानंतर दोघांना एकान्त मिळावा म्हणून आपण कुठल्या मित्राकडे जाण्याचें नाटक करावें हेंसुद्धा त्यांनी मनांत योजून ठेवलें.

* * *

संध्याकाळीं काशीनाथ आला. अस्मानी पातळ नेसलेल्या पुष्पेने चहा दिला तो त्यानें घेतला आणि दादांच्या हातांत एक पत्र देऊन तो ग्रामोफोनकडे वळला.

त्यानें लावलेली रेकॉर्ड गात होती—' पिया मिलन को जाना... '

पण पुष्पेचें लक्ष त्या गाण्याकडे नव्हतें; दादांच्या हातांतल्या त्या पत्राकडे होतें— त्यांच्या चेहऱ्यावर जो निराशेचा काळोख पसरला होता त्याच्याकडे होतें.

दादांनी दिलेलें पत्र तिनें हातांत घेतलें.

काशीनाथाने लावलेली रेकॉर्डची दुसरी बाजू गाऊं लागली-'यू दर्द भरे...' आपल्या अंतःकरणांतूनहि तेच करुण स्वर निघत आहेत असें पुष्पेला वाटलें.

काशीनाथानें पत्रांत लिहिलें होतें—

" दादा,

" पुष्पेला मीं फसविलें नाहीं; जें प्रेम मी तिला देऊं शकणार नाहीं तें देईन असें मीं कधी म्हटलें नाहीं.

" आमचें एकमेकांवर प्रेम आहे. पण भावी आयुष्याचीं आमचीं स्वप्नें! तीं अत्यंत भिन्न आहेत. तिला बंगल्यांत आयुष्य काढण्यांत आनंद वाटेल, मला गोरगरिबांच्या खुराड्यांत काम करण्यांत आनंद वाटतो. गोजिरवाणीं मुलें आणि श्रीमंत नवरा एवढें मिळालें की ती सुखी होईल; प्रेमळ पत्नी आणि गोजिरवाणीं मुलें एवढ्याने माझें समाधान होणार नाही.

" पुष्पा मला रात्रीं दहाच्या शोला चल म्हणते; पण मीं चालवीत असलेला रात्रीचा वर्ग–त्यांत येणारीं फाटक्यातुटक्या कपड्यांचीं पण जिवंत मनाचीं माणसें—आमच्या उद्याच्या सुखी जगाच्या कल्पना— या साऱ्या गोष्टी सिनेमांतल्या लुटुपुटीच्या प्रेमकथेपेक्षा मला अधिक आवडतात.

" मला रूक्ष जीवन कंठायचें नाहीं; अरसिक राहायचें नाहीं. मला गाणें आवडतें, फुलें आवडतात. अस्मानी पातळ नेसून पुष्पाने रातराणीचीं फुलें केसात खोवलीं म्हणजे वाटतें–आपण कवि असतों तर फार बरें झालें असतें! पण रूक्ष आणि अरसिक जीवनाइतकेंच विलासी आणि रंगेल आयुष्य मला नको आहे. संसारसुखाकरिता समाजसेवेचें ध्येय सोडायची मला इच्छा नाही.

" दादा, तुम्ही मला उपदेश कराल—' पैसे मिळवून काय समाजसेवा करतां येत नाही ! मी साधा मास्तर असूनसुद्धा हरिजनांच्या हक्काकरिता झगडलों; तुलाहि तसं कांही तरी करतां येईल. '

" माझ्या आयुष्याला वळण लावणरे पहिले गुरु तुम्ही आहांत. पण. . .

" दहाबारा वर्षांपूर्वी तुम्हीं जी समाजसेवा केली ती योग्य असेल. पण आज—

" दादा, मुंबईतलीं लाखो माणसें खुराड्यांतल्या कबुतरांसारखीं जगताहेत ! खेड्यांपाडयांतलीं कोट्यवधि माणसें रस्त्यावर सोडलेल्या मांजराच्या पिलांप्रमाणे तडफताहेत—हें काय असेंच चालूं द्यायचें ?

" तुमचें तें वाक्य अजून माझ्या कानांत घुमत आहे–' भंगलेल्या मूर्तीची कुणी पूजा करीत नाही. '

समाजसेवेची तुमच्या पिढीची कल्पना ही अशीच भंगलेली मूर्ति आहे. पुष्पेची सुखी संसाराची कल्पना हीसुद्धा एक भग्नमूर्ति आहे. या मोडक्या तोडक्या मूर्तींची पूजा करायला माझें मन घेत नाही. मी नव्या मूर्तीची–"

पुष्पेने आसवांनी भरलेल्या डोळ्यांनी वर पाहिलें.

पंकज मलिक मधुर स्वराने गात होता आणि काशीनाथ मान डोलावीत होता.

" असतील, तुझ्या वाटेंत काटे पसरलेले असतील...असेल, मुसळधार पाऊस पडत असेल, पण प्रीति काट्यांना भीत नाही, पावसाला भीत नाही. चल, पुढे चल. "

# दरी आणि डोंगर

आंबोलीच्या घाटांतून मोटार भरभर वळणें घेत उतरूं लागली. एका बाजूला भव्य खडकाळ डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल विशाल दरी यांच्यामधून जाणाऱ्या त्या मोटारींतल्या पतिपत्नीच्या मनांत कांहीं तरी गंभीर विचार घोळत असावेत! कारण मैलामागून मैल मागे पडूं लागला तरी, एरवीं भाटासारख्या बडबडणाऱ्या सौ. वैजयंतीबाईच्या तोंडून एक अक्षरहि बाहेर पडलें नाहीं! आणि बायको एक मिनिट गप्प बसली तर लगेच आपल्यावर रागावली आहे अशी समजूत करून घेऊन तिची समजूत घालायला जाणाऱ्या प्रभाकरपंतांनीहि पत्नीच्या अबोल्याचें कारण तिला विचारलें नाहीं. सृष्टीसौंदर्यांत एक प्रकारचें मधुर संगीत असतें. तें ऐकतां ऐकतां तीं दोघें देहभान विसरलीं होतीं की काय कुणाला ठाऊक!

घाट संपतां संपतां प्रभाकरपंत आपल्या तंद्रींतून जागे झाले. त्यांनी पत्नीला विचारले.

"अजून वेंगुर्लें किती लांब आहे?"

"पंचवीस मैल तरी असेल!"

"मघापासून तूं अगदी गप्प आहेस तेव्हा मला वाटलं—तें अगदीं जवळ आलंय्. कसला विचार चाललाय् एवढा?"

पतीचा प्रश्न ऐकून वैजयंतीबाई नुसत्या हसल्या.

प्रभाकरपंत म्हणाले, " मी ओळखूं ? "

" दुसऱ्याचं मन म्हणजे कांही शेअर-बाजार नाही ! तिथल्या उलाढाली निराळ्या नि दुसऱ्याच्या मनांतल्या उलाढाली निराळ्या ! "

" तें कांही का असेना ! तुझ्या मनांत काय चाललय् तें सांगितलं तर मला काय बक्षीस देशील ? "

" माझ्यासारखी नर्स कसलं बक्षीस देणार ? फार तर एखादं कडू औषध—"

" नर्सपाशी सुद्धा गोड औषधं असतात हं ! "

गाडी चालवणाऱ्या ड्रायव्हरच्या डाव्या गालावर हास्याचा लहानसा तरंग उठलेला वैजयंतीबाईंना स्पष्ट दिसला. पतीकडे कृत्रिम कोपाने पाहत त्या उद्गारल्या—

" अय्या ! एक गोष्ट विसरलेंच की ! "

" कुठली ? ती हिऱ्याची पीन–की ती सेंटची नवी बाटली ! "

" तें सारं माझ्या बॅगमधे आहे; पण— "

" मग विसरलीस काय ? "

" एक कुलूप ? "

" कशाला ? माझ्या तोंडाला घालायला ? "

वैजयंती प्रभाकरपंतांच्याकडे मिस्किलपणाने पाहत हसली.

प्रभाकरपंत गंभीरपणाने म्हणाले, " तं कुलूप राहिलं तर राहिलं ! दुसरं आहे की आपल्यापाशी ! "

प्रभाकरपंतांचा रोख कशावर आहे तें चटकन् न कळल्यामुळे वैजयंती-बाईंनी भोळेपणानें प्रश्न केला, " कुठलं ? "

प्रभाकरपंतांनी हळूच त्यांच्या ओठांकडे बोट दाखविलें आणि ते बाहेर पाहूं लागले.

वैजयंतीबाईंच्या मनांत आलें–यांनी आपल्या ओठांकडे बोट दाखविलें त्या वेळी ड्रायव्हरचें लक्ष मागे नव्हतें म्हणून बरें ! नाही तर मुंबईला परत गेल्यावर त्यानें स्वयंपाकीणबाईपासन माळ्यापर्यंत साऱ्यांना ही गोष्ट सांगितली असती ! आणि मग—

प्रभाकरपंतांना नेहमीच असली थट्टा करण्याची सवय होती; आणि वैजयंतीबाईंना असल्या थट्टेचा क्षणभर राग आला, तरी मागाहून तिच्या आठवणीने त्यांना गुदगुल्याच होत असत. त्या मनांत नेहमी म्हणत, समुद्राच्या लाटांचें पाणी नाकातोंडांत गेलें की मनुष्याला गुदमरल्यासारखें होतें. पण त्याच लाटेवर चढून त्याला पोहतां आलें तर त्याला एखाद्या झोपाळ्यावर बसल्यासारखें वाटतें. थट्टेचेंहि तसेंच आहे. बाळपण दुःखांत गेल्यामुळे आपल्याला थट्टेची गोडी चटकन् चाखतां येत नाही हा कांही प्रभाकरपंतांचा दोष नाही. नि ते म्हणतात तें अगदी अक्षरशः खरें आहे, नाही का? फार उकाडा होऊं लागला की मनुष्य पंख्यानेच काय, पण मिळेल त्या वस्तूने–हातरुमालाने, वर्तमानपत्राने, कशानेहि वारा घेऊं लागतो. शेअरबाजारांतल्या दररोजच्या उलाढालींनीं डोकें भणाणून गेलें म्हणजे ते घरीं येतात नि आपली थट्टा करून त्या आनंदांत सारा त्रास विसरून जातात. यांत वावगें असें काय आहे?

प्रभाकरपंत अजूनहि बाहेरचें सृष्टिसौंदर्य पाहण्याचें ढोंग करीतच होते. त्यांच्या खांद्याला हळूच स्पर्श करून वैजयंतीबाई म्हणाल्या, "एक माणूस मघाशी अगदी मनकवडं झालं होतं! पण आतां..."

प्रभाकरपंत मान वळवून म्हणाले,

"ती कांही माझी थाप नव्हती नुसती!"

"मग सांगा पाहूं घाटामधे मी अगदी गप्प कां बसलें होतें तें?"

"तुझी तयारी चालली होती!"

"कसली?"

"व्याख्यानाची! हळदीकुंकवाला जायचं असलं तरी बायका इंग्लंडला जाण्याची तयारी करण्याइतका वेळ घेतात. तेव्हां वेंगुर्ल्यांचा अनाथबालिकाश्रम तो केवढा व त्याच्या वार्षिक समारंभाला येऊन येऊन किती लोक येणार? पण घरांत चार पाहुणे यायचे असोत नाही तर चाळीस यायचे असोत, बायकांची धांदल ही उडायचीच! तुझ्यासारख्या शिकलेल्या नि मुंबईत दहा वर्षे काढलेल्या स्त्रीनं एका साध्या व्याख्यानासाठीं इतकं गडबडून जायचं काय कारण आहे? नि तूं जर या संस्थेची माजी विद्यार्थिनी नस-

तीस तर हा व्याख्यानाचा प्रसंगसुद्धा तुझ्यावर आला नसता! पण . . . अग, व्याख्यान देण्याइतकं सोपं जगांत दुसर कांहीच नाही! जगाच्या बाजारांत उपदेशच अधिक स्वस्त असतो!"

वैजयंतीबाईंना हें छोटेसें व्याख्यान सुनावून प्रभाकरपंत मनःपूर्वक हसले. पण त्यांच्यावर मात करण्याकरिता वैजयंतीबाई म्हणाल्या,

" मघाशी मी व्याख्यानाचा विचार करीत होतें हें खरंच नाही मुळी!"

" मग काय घाटांतलं सृष्टिसौंदर्य पाहून नर्सबाई काव्य करीत होत्या?"

" हं! पण हें काव्य कल्पनेंतलं नाही, अनुभवांतलं आहे!"

प्रभाकरपंतांनी भुवया किंचित् मुरडून पत्नीकडे पाहिलें. मूक प्रश्न विचारण्याची त्यांची ठराविक लकब होती ती!

वैजयंतीबाई म्हणाल्या, " ती दरी नि तो डोंगर पाहून एकसारखं माझ्या मनांत येत होतं."

" काय येत होतं?"

" दादांनीं वीस वर्षांपूर्वी जर वेंगुर्ल्याला अनाथ बालिकाश्रम काढला नसता तर मी आज या वेळीं मोटारींतून समारंभाची अध्यक्ष व्हायला निघालें नसतें— खेड्यांतल्या त्या पडक्या घरांत या वेळीं खरकटीं भांडीं घाशीत बसलें असतें! दुर्दैवानं मला दरींत लोटून दिलं होतं. पण दादांनी मला आपल्या हाताचा आधार दिला नि मी डोंगरावर चढलें, अगदी शिखरावर जाऊन बसलें. दादा माझ्या आयुष्यांत आले नसते तर— "

वैजयंतीबाईंचा स्वर सद्गदित झाला. त्यांच्या डोळ्यांत पाणी तरंगूं लागलें. पाण्यांत बुडणाऱ्या मनुष्याला एखाद्याने वांचवून काठावर आणल्यावर त्याच्या डोळ्यांतून जी कृतज्ञता ओसंडून वाहत असते, तीच या वेळीं वैजयंतीबाईंच्या डोळ्यांत दिसत होती.

पत्नीच्या या भावनावशतेने प्रभाकरपंतांच्या डोळ्यापुढे तिचें पूर्वचरित्र उभें राहिलें. कोकणांतल्या एका खेड्यांतली बालविधवा सासरच्या जाचाला कंटाळून बाहेर पडली— जीव द्यावा, भीक मागावी यापेक्षा दुसरें कांहीच तिला सुचत नव्हतें. भटकतां भटकतां ती वेंगुर्ल्याला आली. तिथे दादांनी कर्व्यांना गुरु मानून एक अनाथ-बालिकाश्रम सुरू केला होता. त्या आश्र-

माने या बालविधवेला सांभाळलें. शिष्यवृत्त्या मिळवून देऊन नर्स केलें. मोटार अपघातांत सापडून नर्सिंग होममध्यें आलेल्या प्रभाकरपंतांची शुश्रूषा या नर्सने केली आणि आंब्याच्या मोहोराचें हळूहळू रसाळ फळांत रूपांतर व्हावें त्याप्रमाणें दोघांच्या त्या परिचयांतून प्रीति—

वैजयंतीबाई डोळे पुसून बोलूं लागल्यामुळें प्रभाकरपंतांच्या डोळ्यांपुढून जात असलेली चित्रमालिका मध्येच तुटली.

वैजयंतीबाई म्हणत होत्या,

" दादांना पाहण्याची आपली फार फार इच्छा होती नाही ? "

प्रभाकरपंत हसत उद्‌गारले, " वर्तमानपत्रांत केव्हा तरी त्यांचा फोटो पाहायला मिळाला असता तर ही इच्छा इतकी तीव्र झाली नसती ! पण आपला फोटो कुठेहि येऊं द्यायचा नाही ही त्यांची प्रतिज्ञा ऐकल्यापासून-"

" मोठीं माणसं अशींच विक्षिप्त असतात ! " वैजयंतीबाईंनी हसत हसत उद्‌गार काढले.

* * *

आपल्या पत्नीच्या उद्‌गारांतला उत्तरार्ध अक्षरशः खरा आहे अशी प्रभाकरपंतांची लवकरच खात्री झाली. वेंगुर्ल्याबाहेरच्या दादांच्या आश्रमाच्या फाटकापाशी मोटार उभी राहतांच एक बुटकी मूर्ती पुढे आली. त्या स्वारीचा पंचा जेमतेम गुडघ्यापर्यंत पोंचत होता. दाढी बरीच वाढली होती इतकेंच नव्हे, तर काळ्या-पांढऱ्या केसांच्या मिश्रणामुळें ती वाढलेली दाढी अगदी विचित्र दिसत होती, आणि पुढलेच दोन दात पडले असल्यामुळे त्या व्यक्तीचें स्मित विकट हास्यासारखें भासत होतें.

वैजयंतीबाईंनी दादांना वाकून नमस्कार केला. अर्थात् प्रभाकरपंतांनाहि त्यांना नम्रतेने नमस्कार करावा लागला. पण नमस्कार करतां करतां एक गोष्ट त्यांच्या मनांत आल्यावाचून राहिली नाही. दादांनी आपला फोटो कुठेहि येऊं द्यायचा नाही अशी जी प्रतिज्ञा केली आहे तिच्या मुळाशी विनय नाही तर कुरूपपणा आहे. असल्या गृहस्थाचा फोटो कुठे छापून आला तर त्याच्या आश्रमाला देणगी देण्याची इच्छासुद्धा कुणाला होणार नाहीं.

मुंबईबाहेर कधीहि न पडलेल्या प्रभाकरपंतांना दादांच्या मूर्तीइतकेंच

आश्रमांतलें जीवनहि सौंदर्यशून्य वाटलें. फराळाच्या वेळीं पत्रावळीची एक चोय घासाबरोबर तोंडांत गेल्यामुळे तर ते अधिकच अस्वस्थ झाले.

आश्रमाच्या साऱ्या इमारती मातीच्याच होत्या. इतकेंच नव्हे तर कोट नसल्यामुळे फाटक्या सदऱ्याने एखाद्या दरिद्र्याची दुःस्थिति जशी चटकन् नजरेला यावी त्याप्रमाणें गिलावा नसल्यामुळे त्या मातीच्या भिंतींना पडलेल्या भेगा आश्रमाच्या परिस्थितीवर पूर्ण प्रकाश पाडीत होत्या.

प्रभाकरपंतांच्या मनांत आलें—आपण डोंगर पाहायला आलों नि दरींत पडलों हेंच खरें ! दादांच्यामध्ये आकर्षक असें कांहीच नाही ! या माणसाला मुंबईत नेऊन सोडलें तर—

त्यांनी वैजयंतीकडे पाहिलें ती दादांच्याशीं बोलण्यांत रंगून गेली होती. दादा चालतां चालतां लहानसहान गोष्टी तिला दाखवीत होते; नि नवें खेळणें मिळालें की एखादें लहान मूल जसें आनंदाने नाचतें त्याप्रमाणें वैजयंती त्या पाहून मोठ्या उत्साहाने फुलून जात होती.

गोठ्यापाशी येतांच डोक्यावर गंधासारखी एक पांढरी रेघ असलेल्या काळया गायीकडे बोट दाखवीत दादा म्हणाले, " हिची आठवण तूं कांही विसरली नसशील ? "

खो-खो हसत पतीकडे वळून वैजयंती म्हणाली, " या गाईची पूजा करायला हवी तुम्हीं ! "

प्रभाकरपंतांनी रूक्षपणानें विचारलें, " इथं गोशाळाहि आहे वाटतं ? "

त्यांच्या बोलण्यांतली खोच त्यांच्या पत्नीच्या लक्षांत आली नाही. आपल्या आश्रमजीवनांतल्या अनंत मधुर आठवणींच्या झोल्यावर बसून तिचें मन झोके घेत होतें. ती हसत हसत म्हणाली, " मी आश्रमांतून गेले तेव्हा ही मारकट कालवड दादांनी नुकतीच आणली होती. एके दिवशीं ही माझ्यामागं लागली नि मला पळतां भुई थोडी झाली. त्या दिवशीं हिनं माझा प्राण घेतला नाही म्हणून मी तुम्हाला मिळालें, नाही तर..."

वैजयंतीबरोबर दादा हसले, पण प्रभाकरपंत मात्र घुमेच राहिले.

पलीकडेच माडांचीं दहावीस झाडें होतीं. वैजयंती त्यांच्याकडे मोठ्या आपलेपणाने पाहूं लागली. दादांच्याकडे पाहत ती म्हणाली, " हे सारे माड

लहान होते तेव्हा मीं पाणी घातलंय यांना—तेव्हा यांनी आतां मला शहाळयांतलं गोडगोड पाणी द्यायला हवं. "

प्रभाकरपंत मनांत म्हणत होते–माणसाचें मन रबरी फुग्यासारखें आहे. एरवीं तें कसें सुरकुतून पडलेलें असतें. पण आंत कसलें तरी वारें शिरलें, की त्याच्या सुरकुत्या कुठल्या कुठे नाहीशा होतात—जणू कांही जादूने एखाद्या मोडक्या बैलगाडीचें विमान व्हावें तसा चमत्कार मग घडून येतो. आज वैजूचें तसेंच झालें आहे. ती काय करील आणि काय नाही—!

प्रभाकरपंतांची ही शंका सभेच्या वेळीं पूर्णपणें खरी ठरली. आश्रमाला देणगी म्हणून शंभर रुपये द्यायचे असें मुंबईहून निघतांना दोघेंहि ठरवून आलीं होतीं. पण सभेत बोलतां बोलतां वैजयंती आपलें भान विसरून गेली; आणि टाळयांच्या कडकडाटांत तिनें पांचशे रुपयांची देणगी जाहीर केली !

* * *

साऱ्या दिवसाच्या श्रमाने असो अगर खेळून खेळून मूल झोंपी जातें तशी स्थिति झाल्यामुळे असो, रात्रीं खोलींत पाऊल टाकतांच वैजयंतीने अंथरुणावर अंग टाकून डोळे मिटले.

प्रभाकरपंतांनी विचारलें, " इतक्यांत झोप आली तुला ? "

वैजयंतीच्या जांभईनेच त्यांच्या प्रश्नाचें उत्तर दिलें.

प्रभाकरपंत म्हणाले, " आपल्याला नाही बुवा झोप येत ! इथं धड एक कॉटसुद्धा नाही ! समोर भिंतीकडे पाहावं तर साऱ्या भेगाच भेगा ! "

वैजयंती मृदु स्वराने म्हणाली,

" हळू बोलावं जरा ! पलीकडेच दादांची खोली आहे ! "

" असेना ! " प्रभाकरपंत मघापेक्षांहि मोठ्या स्वराने उद्गारले, " तुझे दादा म्हणजे कांही हिटलर किंवा मुसोलिनी नव्हेत ! "

आता मात्र वैजयंती अंथरुणांत उठून बसली. प्रभाकरपंतांकडे खट्याळपणाने पाहत तीहि मोठ्याने उद्गारली, " दादांचा आपल्याला इतका राग कां आलाय् तें मला ठाऊक आहे ! त्यांनी आपली चोरी केली आहे ! "

भिंतीकडे पाहत प्रभाकरपंत म्हणाले,

" जरा हळू बोल. पलीकडच्या खोलींत हें दादांना ऐकूं गेलं तर–"

" गेलं तर गेलं ! दादा म्हणजे कांही हिटलर किंवा मुसलोनी नव्हेत ! "

आता मात्र प्रभाकरपंतांना हसूं आवरेना. ते हसत हसत म्हणाले, " दादांनी माझे चारशे रुपये नेले हें खरं. पण त्यांत त्यांचं असं कांहीच कौशल्य नाही. तूं जर फितूर झाली नसतीस—वेड्यासारखी सभेत एकदम पांचशे रुपयांची देणगी बोलून गेलीस ! "

" शंभर रुपये अगदीच कमी वाटायला लागले मला ! मी म्हणते, गेले तर गेले पांचशे रुपये. पावसाळ्यांत डोंगरावरलं पाणी दरींत वाहत जातं ना ? मन भरून आल्यामुळं मी ती देणगी तशीच बोलून गेलें. पुन: पुन्हा आपण इथं थोडींच येणार आहोंत ! तेव्हा..."

उकडत असल्यामुळे अंगावर पांघरूणसुद्धा न ओढतां वैजयंतीने डोळे मिटून घेतले. प्रभाकरपंतहि दिवा बारीक करून आपल्या अंथरूणावर लवंडले. पावसाळ्यांतल्या कुंद हवेने मनुष्य जसा उदास होऊन जातो तशी आश्रमांतल्या, सर्व दरिद्री दृश्यांनी त्यांची स्थिति झाली होती. निद्रेचा मधुर स्पर्श झाल्यावर तें मनांत म्हणाले, " डोंगर नि दरी यांच्यांत इतकं अंतर असायचंच ! "

सुमारें साडेअकरा वाजतां वैजयंती एकदम दचकून जागी झाली. झोपल्यापासून तिला एकसारखीं स्वप्नेंच पडत होतीं. तीं सारीं स्वप्नें म्हणजे तिच्या अंतर्मनाने पाहिलेला तिच्या गत आयुष्यांतला चित्रपटच होता. ती जागी झाली तेव्हा तिला असलेंच एक स्वप्न पडत होतें. त्या स्वप्नांत आपण नि आपली मैत्रीण भुताच्या भयाने एकमेकींना बिलगून कशा झोपत होतों, हें तिला दिसलें होतें. दादांनी गावाबाहेरच्या एका ओसाड जागीं—ती जागा फुकट मिळाली म्हणून—आपला आश्रम बांधला होता. पण त्या जागेची भुताटकीविषयी फार प्रसिद्धि होती. स्वप्नांत या साऱ्या जुन्या आठवणी मनांत घोळत असतांनाच वैजयंतीला कांही तरी वाजल्यासारखें वाटलें. तिनें दचकून डोळे उघडले. पलीकडे प्रभाकरपंत स्वस्थ झोपले होते. बाहेरहि सारें शांत होतें.

अंगावर पांघरूण ओढण्याकरिता ती किंचित् उठली—

इतक्यांत—

पांघरूणावरला तिचा हात जिथल्या तिथेंच राहिला.

बाहेर कुणाचीं तरी पावलें वाजत होतीं.

दहा वर्षांपूर्वी ऐकलेल्या भुतांच्या साऱ्या गोष्टी एका क्षणांत तिला आठवूं लागल्या.

ती कान देऊन ऐकूं लागली. पावलें एकसारखीं वाजत होतीं. एकदा तीं खोलीच्या दरवाजावरून उजव्या बाजूला गेल्यासारखीं वाटत, पुन्हा तीं थोड्या वेळानें दरवाजावरून डाव्या बाजूला जात.

तिच्या मनांत आलें—इतक्या अपरात्रीं ही विचित्र शतपावली कोण करीत बसणार ?—आजच्या समारंभाच्या दगदगीने सारे लोक दमून गेले आहेत. काल रात्रीं कुणालाहि झोप मिळाली नाहीं, असें त्या मास्तरीणबाई म्हणतच होत्या कीं ! मग—

बाहेरचीं पावलें अधिक जोराने वाजूं लागलीं. वैजयंतीचें मन भीतीने भरून गेलें.

प्रभाकरपंतांच्या अंथरुणाजवळ जाऊन त्यांना हालवून जागे करीत ती म्हणाली,

"ऐकलं का ?"

वैजयंती दररोज सकाळीं प्रभाकरपंतांना उठवायला जाई तेव्हा तिचें पहिलें वाक्य हें असे—"ऐकलं का ? सात वाजले !"

त्यामुळें इतक्यांत सात कसे वाजले याचें आश्चर्य करीतच प्रभाकरपंतांनी डोळे उघडले. पण वैजयंतीच्या मुद्रेकडे लक्ष जातांच ते एकदम उठून बसले.

त्यांनी प्रेमळ स्वराने विचारलें,

"काय होतंय् तुला ?"

वैजयंतीने दाराकडे बोट दाखविलें.

प्रभाकरपंत ऐकूं लागले—पावलें वाजत होतीं !

त्यांच्या मनांत आलें—गावाबाहेरच्या दरिद्री आश्रमांत आज दोन श्रीमंत पाहुणे आले आहेत, म्हणून कुणी चोरबीर तर आला नसेल ना ? लगेच त्यांना आपल्या शंकेचें हसूं आलें. चोरी करायच्या बेताने आलेला मनुष्य आपल्या पावलांचा आवाज ऐकूं येऊं नये म्हणून काळजी घेईल,

की खोलीवरून घोंगावणाऱ्या वाऱ्यासारखा एकसारखा फिरत राहील ?

प्रभाकरपंत हळूच उठून दाराजवळ गेले. वैजयंतीहि भीतभीत त्यांच्यामागून गेली. प्रभाकरपंतांनी कडी काढून दार उघडायला नि बाहेर फिरणारी ती व्यक्ति त्याच वेळीं. दारासमोर यायला गाठ पडली. पतिपत्नींच्या तोंडून एकदम आश्चर्याचा उद्‌गार बाहेर पडला–" कोण ? दादा ? "

दादा थांबले. लगेच दोघांकडे हसून पाहत ते म्हणाले, " माझ्या फिरण्यानं तुमची झोपमोड झाली वाटतं ? माफ करा हं ! दररोजच्या सवयीप्रमाणं मी फिरत होतों..."

वैजयंतीने आश्चर्याने विचारलें,

" म्हणजे ? दररोज या वेळीं तुम्ही असेच फिरत राहतां ? "

" नाही तर दुसरं काय करणार ? "

" पण दिवसां इतकं काम केल्यावर—"

" कितीहि काम केलं तरी मला झोप येतच नाहीं ! एकदोन वाजून गेले–पहाटेचा गार वारा सुटला म्हणजे मग माझा डोळा लागतो ! "

प्रभाकरपंतांनी सूचना केली, " मग उद्या आमच्या गाडींतनंच मुंबईला चला की, कुणा तरी चांगल्या डॉक्टरला प्रकृति दाखवूं या. "

दादा हसत म्हणाले, " हा शरीराचा रोग नाहीं प्रभाकरपंत-मनाचा आहे!"

पहिली बायको वारल्यावर पुन्हा स्वतःचा संसार मांडायचा नाहीं असा निश्चय करूनच दादांनी आश्रमाची स्थापना केली होती हें पत्नीकडून प्रभाकरपंताना कळलें होतें. त्यामुळें दादांची झोप कुठल्या तरी मानसिक काळजीमुळे नाहीशी झाली आहे हें कळतांच त्यांना विलक्षण आश्चर्य वाटलें. दादांच्या मनाचा रोग जाणून घेण्याचें कुतूहल मनांत उत्पन्न झाल्यामुळें ते म्हणाले, " रोग शरीराचा असो, नाही तर मनाचा असो, तो कांही उगीच होत नाही ! "

दादा नुसते हसले.

दादा आपणहून पुढे कांहीं बोलूं इच्छीत नाहीत हें ओळखून प्रभाकरपंत म्हणाले, ' पण तुमच्या या रोगाला कांहीं तरी कारण..."

"कारण?" दादा प्रभाकरपंतांच्याकडे रोखून पाहत म्हणाले. त्यांच्या दृष्टींत

एवढी तीव्रता असेल अशी आतांपर्यंत प्रभाकरपंतांना कल्पना आली नव्हती!

दादा शांतपणाने बोलूं लागले,

"रागावूं नका हं! माझ्या रोगाचं कारण तुमच्यासारखीं माणसं आहेत!"

आपण दिलेल्या पांचशे रुपये देणगीचे उपकार हा बावळट दाढीवाला लगेच फेडीत आहे असा एक विचित्र विचार प्रभाकरपंतांच्या मनांत येऊन गेला. पण—

दादांचा आवाज किंचित् मोठा झाला होता. ते म्हणाले, "वीस वर्षांपूर्वी मीं ही संस्था स्थापन केली. रक्ताचं पाणी करून मीं ती नांवरूपाला आणली. आईला आपल्या मुलाबद्दल वाटत नसेल इतकी माया या संस्थेबद्दल मला वाटते. पण–माझे हातपाय थकत चालले आहेत; संस्थेचा पसारा वाढत असला तरी तिला मिळणारी मदत मात्र कमी होत आहे." वैजयंतीकडे पाहत ते म्हणाले, "ही ज्या स्थितींत आश्रमांत आली त्याच स्थितींत असलेल्या मुली आज मला आश्रमाच्या दारांतून परत लावाव्या लागत आहे. द्रव्यबळ नाही नि मनुष्यबळ तर नाहींच नाहीं! संस्थेंतून बाहेर गेलेल्या मुलींपैकी पुष्कळांचं आयुष्य सुखाचं झालंय्. कुणाला चांगली नोकरी आहे, कुणी चांगला संसार थाटलाय्; पण संस्थेच्या संसाराकडे त्यांच्यापैकी एकीचंहि लक्ष नाही. आश्रमानं त्यांना खोल दरींतून उंच डोंगरावर जाण्याचा मार्ग दाखविला; पण तो कशाला? त्यानी दरींत पडलेल्या दुसऱ्या अनाथ जीवांना त्या वाटेनं वर न्यावं म्हणून! पण...पण जीं माणसं सुदैवानं डोंगरावर चढतात तीं पुन्हा खाली दरींत उतरतच नाहीत!"

दादांचें बोलणें ऐकतां ऐकतां वैजयंतीने तोंड फिरविलें. तें लक्षांत येतांच दादा तिच्याजवळ येऊन म्हणाले, 'मुली, तुला वाईट वाटावं म्हणून मी बोललों नाहीं हं! जा, स्वस्थ झोप जा."

पतिपत्नी आंत गेली. पण पहाटेपर्यंत त्या दोघांनाहि झोप आली नाहीं. त्यांच्या कानांत एकसारखें एकच वाक्य घुमत होतें—

"जीं माणसं सुदैवानं डोंगरावर चढतात तीं पुन्हां खालीं दरींत उतरतच नाहीत!"

# अनामिका

रविवारीं संध्याकाळीं दवाखान्याला सुटी द्यायचें आम्ही डॉक्टर लोकांनी ठरविल्यापासून रोग्यांचा फायदा झाला कीं तोटा झाला तें देव जाणे ! खुद्द मी आणि दवाखान्यांतील नर्स, कंपाउंडर वगैरे मंडळी या अर्ध्या सुटीवर बेहद्द खूप होतों. ते केविलवाणे चेहरे, तो औषधांचा उग्र दर्प, तो थर्मामीटर-मध्ये नेहमी चढणारा ताप, स्टेथॉस्कोमधून ऐकू येणारे ते धोक्याचे आवाज, ड्रेसिंग-रूममधलें तें कण्हणें—आठवड्यांतून साडेसहा दिवस या वातावरणांत काढणाऱ्या मनुष्याला अर्धा दिवस मित्रमंडळींच्या सहवासांत गप्पा नाही तर पत्ते झोडण्यांत किंवा आराम-खुर्चीवर निवान्त बसून सिगारेट ओढण्यांत केवढा आनंद वाटतो याची इतरांना कदाचित् कल्पनाहि येणार नाही. मला मात्र नेहमीच वाटतें—माणसाचा पोटाचा धंदा—मग तो किती का पवित्र असेना—हा एक प्रकारचा तुरुंगच असतो ! आणि तुरुंगांतून तात्पुरतें का होईना बाहेर पडणें कुणा कैद्याला नको असतें ?

मात्र या अर्ध्या दिवसाच्या सुटीविरुद्ध सर्व डॉक्टरांच्या घरांत एकेक व्यक्ति होती. ती व्यक्ति म्हणजे प्रत्येकाची पत्नी. रविवारीं संध्याकाळीं डॉक्टरमंडळी घरीं राहायला लागल्यापासून त्या दिवशीं प्रत्येकाचें घर म्हणजे एक छोटा क्लबच होऊन जाई. एरवीं दोन ते चारच्या दरम्यान चहाचे चारपांचच

जादा पेले लागतात ! पण रविवारीं संध्याकाळीं मात्र–आमच्या घरचीच गोष्ट सांगतो–दोनतीन वेळां मिळून साठसत्तर पेले तरी चहा होऊं लागला. माझी पत्नी वारंवार म्हणूं लागली, " रविवारीं संध्याकाळीं आपल्याकडे कपबशा एकसारख्या वाजत असतात, रस्त्यानं जाणाऱ्या येणाऱ्याला वाटायचं, डॉक्टरी चालत नाही म्हणून हॉटेलबिटल उघडलंय् की काय यांनी हल्ली ! "

तिच्या या टोमण्याच्या आड स्त्रीची संसारदक्षता मूर्तिमंत उभी आहे हें मला दिसे. त्यामुळे मी तिचें असलें बोलणें नेहमीच हशावारी नेई. पण विरुद्ध पक्षाने अहिंसेचें व्रत स्वीकारलें म्हणून हिटलरसारखीं माणसें थोडींच गप्प बसतात ! रविवारीं माझ्याकडे येणाऱ्या मंडळींची यादी हातांत असल्या प्रमाणें ती एकेकाचें नांव घेई आणि म्हणे, " हा तुमचा कधीपासनं मित्र झाला ? याची नि तुमची केवढी मैत्री आहे सांगूं ? चहापुरती ! हा आपल्या आळींत राहतो म्हणून याची ओळख झाली, नाही तर..."

हिंदुस्थानांत दोन टकळ्या अशा आहेत, की त्यांना विरोध करणें सर्वथैव अशक्य आहे ! पहिली गांधींची नि दुसरी बायकोची !

रविवारच्या आगंतुक मित्रांची यादी वाचतां वाचतां तिने दामुअण्णाचें नांव काढलें, की मग मात्र माझ्याच मौनव्रताचा भंग होई. दामुअण्णा दरिद्री होता, कुठल्या तरी पुस्तकाच्या दुकानांत काम करून महिना पंधरा वीस रुपये मिळवणारा कारकून होता, आमच्या आळींतल्या अगदी पडक्या घरांत तो राहत होता, त्याची एकुलती एक मुलगी कसला तरी विटका परकर नेसूनच शाळेला जात असे, त्याच्या वाढलेल्या दाढींतलें काळ्या आणि पांढऱ्या केसांचें मिश्रण कसेंसेंच दिसें, हें सारें खरें होतें. पण रविवारीं संध्याकाळीं तो आमच्या घरच्या मैफलींत सामील होई तो चहा प्यायला, पत्ते खेळायला किंवा डॉक्टरांशी आपली दोस्ती आहे हें दाखवायला नव्हे ! तर रविवारचीं सर्व वर्तमानपत्रें वाचायला इलस्ट्रेटेड विकली, चित्रा, नवयुग, धनुर्धारी वगैरे वर्तमानपत्रें जवळ घेऊन तो माडीवरल्या कोपऱ्यांत वाचायला बसला की मला देवळाच्या कोपऱ्यांत पोथी वाचीत बसलेल्या संन्याशाची आठवण होई. पत्ते खेळणाऱ्या मंडळींत ' मॅरेज ' चा आनंद साजरा होई, ' लग्न मोडलं ' म्हणून कुणी तरी रुक्मीच्या आवेशाने ओरडे, सिगारेटच्या

धुरामुळे आपण पावसाळी हवेंत खंडाळ्याच्या घाटांतून चाललों आहों असा भास उत्पन्न होई, पण दामुअण्णाचे यांपैकी कशाकडेहि लक्ष नसे. फार आग्रह केला तरच तो चहा घेई! आणि तो सुद्धा एकदा!

आणि म्हणूनच आमच्या घरीं रविवारीं संध्याकाळीं जमणाऱ्या भुतावळांत माझी पत्नी त्याचें नांव घालूं लागली की मी म्हणे, "हें भूत नाही. हा देवमाणूस आहे!" माझा उद्गार ऐकून ती हसली की दामुअण्णाचें कर्णोपकर्णी ऐकलेलें पूर्वचरित्र मीं तिला सुनावीत असे. तो मॅट्रिक झाला तेव्हा त्याला कारकुनाची चांगली नोकरी मिळत होती म्हणे! पण कांही तरी समाजसेवा करायची म्हणून तो कोकणांतल्या आपल्या खेड्यांत गेला. तिथे तिनचार यत्तांची इंग्रजी शाळा त्याने सातआठ वर्षे चालविली. शाळा मोडल्यावर त्याने एक लहानसा छापखाना काढला. देशी कागद आणि देशी शाई वापरण्याच्या निश्चयामुळे त्याच्या छापखान्याला धंदा या दृष्टीने कधीच बरकत आली नाही. शेवटीं छापखाना विकून त्याने पोटासाठी एका पुस्तकांच्या दुकानांत नोकरी धरली.

दामुअण्णा देवमाणूस आहे हें सिद्ध करण्याकरितां मीं हें व्याख्यान सुरू केलें, की माझी पत्नी एकाच वाक्याने त्याचा समारोप करी, "असल्या माणसाला बावळट म्हणतात जगांत!"

* * *

तिचें हें मत मधूनमधून मलाहि खरें वाटे. कालचीच गोष्ट! आमच्या रविवार-मंडळाने दामुअण्णावर चारी बाजूंनी कुचेष्टेचा हल्ला चढविला नि दामुअण्णा त्या हल्ल्याला तोंड देऊं लागला, तेव्हा बायकोचें हें वाक्य आठवून मीं मनांत म्हटलें, "हा गृहस्थ बावळट आहे हेंच खरं!"

तें असें झालें!

एक अवघड बाळंतपण संपवून दुपारी तीन वाजतां मी घरीं परत आलो होतों. सारें अंग दुखत होतें. मनावर एक प्रकारची ग्लानि आली होती. त्यामुळें चार घास खाऊन मी माडीवर आलों नि खेळण्यासाठी माझी अपेक्षा करीत बसलेल्या मंडळींना म्हटलें, "अगदी कंटाळलोंय् मी आज! आराम खुर्चीत जरा स्वस्थ पडतों."

खिडकीजवळच्या आरामखुर्चीतून भरून आलेलें बाहेरचें आभाळ मला दिसत होतें. किती मलूल ! प्रसूतिवेदना सोसणाऱ्या दुपारच्या स्त्रीच्या चेहऱ्याची मला एकदम आठवण झाली. तिचें तें कण्हणें—बाहेर ढग केवढ्यानें गडगडत होते ! मधूनमधून ती दुपारची बाई अशी थरथर कांपे— अंगाला झोंबणारें वारें बाहेर नुसतें भिरभिरत होतें.

मीं मुद्दाम उठून पाहिलें. वीज कुठेंच चमकत नव्हती ! आभाळ नुसतें घुंगट घालून बसलें होतें.

मीं वळून पाहिलें.

मला खेळावेंसें वाटत नसल्यामुळें आमचें मंडळहि बाहेरल्या आभाळा-प्रमाणेंच उदास झालें होतें.

मीं आंत मान वळवितांच सर्वजण ओरडले, " डॉक्टर ! तें कांहीं नाही, फक्त एकच गडी हवाय आम्हांला ! "

कोपऱ्यांत दामुअण्णा एका मासिकाचा ताजा अंक वाचीत बसला होता. त्याच्याकडे मीं हळुच बोट दाखविलें.

लगेच साऱ्या मंडळींनीं दामुअण्णाला वेढा घातला.

पण पानपतच्या युद्धांत एकट्यानें लढणाऱ्या सदाशिवरावभाऊप्रमाणें दामुअण्णानें शांतपणानें आपलें वाचन सुरू ठेवलें.

त्याला खेळांत ओढणें अशक्य आहे हें दिसतांच एकानें विचारलें, " काय वाचताय हो दामुअण्णा ? "

दुसऱ्यानें उत्तर दिलें, " प्रेमकथा असेल एखादी. त्यानं तिचा लुसलुशीत हात आपल्या हातांत घेतला आणि तिच्या रसरशीत—"

" थूः ! " असा आवाज आला. एकदम मला मोठा हशा उसळला.

" थूः ! " हा त्या प्रेमकथेचा निषेध नव्हता ! पान खाणारे मंडळाचे एक सभासद खिडकींतून बाहेर थुंकत होते.

हशा ओसरतांच सर्वांनीं दामुअण्णावरील हल्ला पुढें सुरू केला.

" कसलं वाचन चाललंय एवढं दामुअण्णा ? "

मान वर न करतांच दामुअण्णानें उत्तर दिलें, 'अविस्मरणीय व्यक्ति !'

भुताच्या हातांत कोलीत द्यावे तसें झालें. दामुअण्णाच्या आयुष्यांतली

अविस्मरणीय व्यक्ति कोण असावी, याचीच चर्चा सुरू झाली. एक म्हणाला, "कोकणांत शाळा काढली होती ना यांनी? त्यांतलं एखादं शेंबडं पोर हीच यांच्या आयुष्यांतली अविस्मरणीय व्यक्ति!"

दुसऱ्याने शंका काढली, "शेंबडं पोर या शब्दानं घोटाळा होतोय्! शेंबडा मुलगा की शेंबडी मुलगी तें दामुअण्णांनी स्पष्ट सांगायला हवं!"

तिसरा म्हणाला, "यांचा छापखाना होता ना? त्यांतला एखादा कंपॉझिटर हीच यांच्या आयुष्यांतली अविस्मरणीय व्यक्ति असेल!"

चवथा उद्गारला, "छट्, ज्या नाटक मंडळीच्या जाहिराती दामुअण्णा छापीत होते, तिच्यांतली एखादी नटी."

पांचव्याने आगींत तेल ओतलें, "नाही तर हल्ली दुकानावर पुस्तकं विकत घ्यायला येणारी एखादी कॉलेज-कुमारी! दामुअण्णा, तुमच्या आयुष्यांतल्या अविस्मरणीय व्यक्तीचं वर्णन ऐकायलाच हवं बुवा!"

हातांतलें मासिक मिटून मान वर करीत दामुआण्णा उद्गारला, "तुमची विनंती मी मान्य करतों!"

राग हा एका दृष्टीने चिखलासारखा असतो! त्याच्यांत सापडलेला मनुष्य बाहेर पडण्याकरितां धडपड करूं लागला की तो अधिकच बरबटून जातो.

"तुमची अविस्मरणीय व्यक्ति कोण आहे?" चारपांच जणांनी दामुअण्णाला एकदम प्रश्न केला.

"एक स्त्री!" त्याने शांतपणाने उत्तर दिलें.

सर्वांच्या चेहऱ्यावर आतां दामुअण्णाची खूप गंमत करायला मिळणार अशा अर्थाचें हसें उमटलें.

हा साधाभोळा गृहस्थ आयुष्यांत क्षणभर चुकून आलेल्या एखाद्या परस्त्रीची हकीकत मनमोकळेपणाने सांगेल आणि ही चटोर मंडळी तिचा भलताच अर्थ करतील अशी मला भीति पडली. 'गप बैस' असें मीं दामुअण्णाला डोळ्यांनी खुणावलेंसुद्धा! पण प्रेम आणि युद्ध या दोन्हींतहि मनुष्य आंधळा होतो हेंच खरें! "तुझ्यासारख्याच्या आयुष्यांत मनाला चटका लावणारी व्यक्ति कुठून येणार?" असा उपहासाचा प्रश्न करून बाकीच्यांनीं त्याला चिडविलें होतें! त्या चिडक्या मनःस्थितींत हा भाबडा

गृहस्थ एकादें भलतेंच रहस्य बोलून तर जाणार नाही ना, या शंकेने माझें मन व्याकुळ होऊन गेलें.

कोणी तरी दामुअण्णाला विचारलें, " तुमच्या या सत्यकथेंतला नायक कोण ? "

" मी ! "

" आणि नायिका ? "

" एक वेश्या ! "

सारे स्तंभित होऊन दामुअण्णाची हकीकत ऐकूं लागले.

* * *

" मी मॅट्रिक झालों तेव्हा माझ्या चुलत्यांच्या वशिल्यानं कारकुनाची एक चांगली जागा मला मिळत होती. पण ती मी पतकरली नाहीं हें तुमच्यांपैकीं पुष्कळांना ऐकून ठाऊक असेल. पुण्याला शाळेंत असतांना मला टिळक पाह्यला मिळाले. अगदी म्हातारे झाले होते तेव्हा ते. त्यांचीं व्याख्यानं ऐकायला मिळालीं. देशासाठीं प्रत्येकानं कांही तरी केलं पाहिजे एवढं मी त्या व्याख्यानांतून शिकलों.

" मॅट्रिक झालेल्या माझ्यासारख्या सामान्य मनुष्याच्या हातून देशाची मोठी सेवा कसली होणार ? पण गणपतीची पूजा जशी गुलाबांनी होते तशी दुर्वांनीहि होते, नाही का ? "

खूप वाचून मनुष्य थोडाफार लेखक होत असला पाहिजे असा विचार या वेळीं माझ्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं !

" कोकणांतल्या एका खेडयांत माझं वडिलोपार्जित घर होतं. दोन पिढ्यांत तिथं कुणी राहिलं नव्हतं. मीं मनांत म्हटलं, वाडवडिलांच्या जन्मभूमींत एखादी तीनचार यत्तांची इंग्रजी शाळा आपण काढली तर तिथल्या गोरगरिबांना शिक्षण मिळेल नि आपल्या घरांतहि दिवा लागेल. खेडयांत माणसाला विशेष असं काय लागतं ? दोन वेळचं जेवण नि अंगभर वस्त्र. "

ऐकणारी मंडळी चुळबुळ करूं लागली. दामुअण्णाच्या गोष्टींत वेश्या केव्हा प्रवेश करते असें त्यांना झालें असावें ! पण आपले श्रोते अस्वस्थ झाले आहेत याची दामुअण्णाला जाणीवच नव्हती !

" खेड्यांत शाळा काढणं हें संन्याशाचं लग्न करण्याइतकंच कठीण आहे. पण पहिल्या उत्साहाच्या भरांत मी पडेल तें काम आनंदानें करीत गेलों. मीं डोक्यावरनं बाकं नेलीं, शाळा सारवली, झाडली, मदतीला घेत-लेल्या मास्तरांनी नाखूष राहूं नये म्हणून दोन-दोन महिने स्वतःला पगार घेतला नाहीं—"

" मग ही शाळा मोडली कशी ? "

" खेड्यांतल्या भानगडी तुम्हां शहरांतल्या लोकांना कळायच्या नाहीत. तिथल्या जमीनदाराच्या मुलीला मीं फुकट शिकवायचं नाकारलं, सावका-राला शाळेचा अध्यक्ष केलं नाहीं, शिमग्यांतल्या रोमटांत भाग घेऊं नये म्हणून मुलांचीं मनं वळविलीं, एक गावगुंड जत्रेंत जुगार खेळून पैसे मिळवी त्याची पोलिसांना वर्दी दिली—माझी शाळा मोडायला या सर्व सज्ज-नांनीं हातभार लावला ! "

" तें जाऊं दे हो ! " एक अधीर श्रोता मध्येंच म्हणाला, " गोष्ट निम्मी होत आली, पण तुमच्या नायिकेचा पत्ताच नाहीं अजून ! "

दामुअण्णा हसला आणि पुढें बोलूं लागला—

" सात वर्षें झाल्यावर शाळा अगदीं डबघाईला आली. त्याच वेळीं माझं लग्न ठरलं. जवळ तर फुटकी कवडी शिल्लक नाहीं ! नाही म्हटलं तरी बायकोच्या अंगावर दोन दागिने घालावे लागतात. कापडचोपड, आप्तेष्टांचा जाण्यायेण्याचा खर्च—कमींत कमी चारपांचशे रुपयांची गरज होती मला! नाइलाजानं सावकाराच्या दारांत गेलों. भलतंच व्याज सांगितलं त्यानं ! जरूर पडली तर जमिनीचा तुकडा विकून रक्कम परत करतां येईल; असं मनांत म्हणत मी तें व्याज कबूल केलं. लग्नासाठीं चार दिवसांनी मी निघणार होतों. निघण्याच्या आदल्या दिवशीं रक्कम द्यायचं सावकारानं कबूल केलं ! "

दामुअण्णा क्षणभर स्तब्ध बसला. अनेक वर्षांपूर्वीचें पुसट होऊन गेलेलें तें चित्र त्याच्या डोळ्यांपुढं स्पष्ट उभें राहिलें असावें !

लगेच तो हसून म्हणाला,

" त्या सावकारानं आयत्या वेळीं मला दगा दिला हा तर्क तुम्ही केला

असेलच. मी मोठ्या पेचांत पडलों. सातआठ वर्षांत त्या खेडयाबाहेर मी पाऊल टाकलं नव्हतं. त्यामुळं एकदम एवढी रक्कम कुठून नि कुणाकडून उभी करायची हा प्रश्न पडला मला! आई बहुतेक मामांच्याकडेच रहात असे. पण ते फार गरीब होते. पैशाची तयारी आहे म्हणून मी आईला पत्र पाठवूनमुद्धां चुकलों होतों, तिनं दागिने करायला दिले असतील, कापडचिपड विकत घेतलं असेल, आतां मी हात हालवीत गेलों तर...त्या वेळीं जीव द्यायचा विचारसुद्धा क्षणभर माझ्या मनांत येऊन गेला! ती आठवण झाली की अजून हसू येतं मला.

" शेवटीं खूप विचार करून मीं माझ्या भावी सासऱ्यांना एक तार लिहिली–' टायफॉईडनं आजारी आहे. लग्न लांबणीवर टाका. '

" ही तार करायला स्वत: पोस्टांत जावं तर मास्तर विचारतील, 'टायफॉईड' झालेला मनुष्य तार करायला पोस्टांत येतो वाटतं? नि तोहि चालत!

" काय करावं या विचारांत मी पडलों. इतक्यांत तिसऱ्या यत्तेंतला बाळकृष्ण शिरोडकर भाजी आणायला जात असलेला दिसला. एका भाविणीचा मुलगा होता तो. त्याचा थोरला भाऊ हा माझ्या शाळेचा अगदी पहिलाबहिला विद्यार्थी! मॅट्रिक होऊन मुंबईला नोकरीला सुद्धा लागला होता तो!

" मी बाळकृष्णाच्या हातांत तार आणि पैसे दिले. तो दृष्टीआड होतांच दार लावून विचार करीत मी अंथरुणावर पडलों.

" दोनतीन मिनिटांतच दारावर कुणी तरी टकटक केलं. दार उघडून पाहतों तों धापा टाकीत असलेला बाळकृष्ण उभा!

" काय रे? " मीं प्रश्न केला.

" कांहीं न बोलतां माझा हात त्यानं आपल्या हातांत घेतला आणि तो आनंदानं उद्गारला, ' अंग तर ऊन लागत नाही! '

" आता माझ्या लक्षांत आलं. इंग्रजी तिसरी शिकणाऱ्या मुलाच्या जिज्ञासेनं बाळकृष्णानं ती तार वाचली. आपले मास्तर टायफॉइडनं आजारी आहेत हें वाचतांच त्या बालजीवाचा धीर सुटून तो तसाच परत धावत आला.

" बाळकृष्णाचं समाधान करण्याकरिता तारेच्या मागं असलेलं रहस्य त्याला सांगणं प्राप्तच होतं. चार शब्दांत तें सांगून मीं त्याची बोळवण केली आणि पुन्हा दार लावून अंथरुणावर अंग टाकलं.

" त्या वेळीं माझं मन किती अंधारून गेलं होतं याची कुणालाहि कल्पना करतां येणार नाही ! या कुग्रामांत शाळा काढून आयुष्याची सातआठ वर्षं आपण फुकट घालविलीं असं मला वाटूं लागलं. त्याग, परोपकार, सेवा वगैरे शब्दांना कोशांत अर्थ असेल; पण व्यवहारांत ते अगदी निरर्थक आहेत अशी त्या वेळीं माझ्या मनाची खात्री होऊन चुकली ! ज्या गांवांत निःस्वार्थीपणानं मीं सातआठ वर्षं काम केलं, त्या गावांत माझ्या मदतीला धावून येणारं एकहि माणूस असूं नये ! माझ्या हाकेला ओ देणारी एकहि व्यक्ति असूं नये !—

" दारावर पुन्हा कुणी तरी टक्‌टक् करूं लागलं. असा राग आला मला त्या माणसांचा ! कदाचित् बाळकृष्ण तारेची पावती घेऊन आला असेल असं मनांत म्हणत मीं दार उघडलं.

" दारांत बाळकृष्ण तर उभा होतांच; पण त्याच्यामागं एक बाईहि — तिचे केस, ओठ, नजर—कुठल्याहि वेश्येला मीं इतक्या जवळून पाहिलं नव्हतं त्यामुळं—

" ही माझी आई. बाळकृष्ण म्हणाला.

" भर दिवसा एक वेश्या माझ्या दारांत उभी होती ! भित्र्या नजरेनं मीं रस्त्याकडे पाहिलें. कुणाचंच लक्ष माझ्याकडे नव्हतं. मी घाईनं तिला म्हणालों, ' या ना आंत ! '

' त्या बाईला मीं बसायला सांगितलं. पण ती कोपऱ्यांत उभीच राहिली. आपल्या हातांतली मोटली बाळकृष्णाच्या हातांत देऊन ती म्हणाली, ' मास्तरांच्याकडे दे ! '

" कोकणांतल्या बायकांना फुलांची आवड फार ! आज मी लग्नासाठी जाणार म्हणून ही बाई भेटीदाखल अबोलीचे वळेसर घेऊन आली असेल अशी कल्पना ती मोटली पाहून माझ्या मनांत आली.

" बाळकृष्णानं आणून दिलेल्या रुमालाची गाठ मीं याच कल्पनेनं सोडली. पण...

" रुमालांत अबोलीचे वळेसर नव्हते, सोन्याचे दागिने होते.

" मी भांबावून उद्गारलों, ' हें काय ? '

" तिनं हळूच उत्तर दिलं, ' मास्तरीणबाईचे दागिने ! '

" ते दागिने परत करण्याकरिता मी उठलों. पण काय बोलावं हेंच मला कळेना. मीं खुणेनं बाळकृष्णाला ते दागिने आईकडे परत नेऊन देण्या-विषयी सांगितलं.

" लगेच ती म्हणाली, 'चारपांचशेंचेच आहेत हे! माझ्यापाशीं आणखी असते तर ते देखील—'

" ' पण—पण...'

" तिनं मला पुढं बोलूंच दिलं नाहीं! ती म्हणाली, 'तुम्ही इथं येऊन शाळा काढली म्हणून माझीं दोन्ही पोरं शिकलीं-चांगलीं मार्गाला लागलीं. तुम्ही शाळा काढली नसती तर...! थोरला आता ऐशी रुपये महिना मिळवतोय-तो दशावतारी खेळांत नाचत राहिला असता; नि हा—हा कुदत, काजींनी खेळत नि विडया फुंकीत गावभर भटकला असता ! माझ्या मातीचं सोनं केलंत तुम्ही...'

कंठ दाटून आल्यामुळं तिला पुढं बोलवेना !

" माझ्याहि डोळयांत पाणी उभं राहिलं. तें तिला दिसूं नये म्हणून मीं तोंड फिरवलं. डोळयांतलं पाणी पुसून मीं वळून पाहिलं तों ती निघूनहि गेली होती ! "

दामुअण्णा बोलायचा थांबला. पण त्याची दृष्टि कांही तरी विलक्षण रम्य दृश्य पाहत आहे असा सर्वांनाच भास झाला. बाळकृष्णाच्या आईची मूर्ति त्याच्या डोळयांपुढे उभी राहिली असावी !

मीं कुतूहलाने दामुअण्णाला विचारलें,

" ह्या बाईचं नांव काय ? "

तो हसून उत्तरला, " नांव ? तें मलाहि ठाऊक नाही !

देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार,
पुणें २.

मूल्य ३ रुपये

---

पुढील प्रकाशन

बुद्ध आणि हिटलर
—वि. स. खांडेकर

---